**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव)**

**पृ.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ

**मु.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, या विषयावर सर्वश्री माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, धनंजय मुंडे, शरद रणपिसे, राजेंद्र मुळक, चंद्रकांत रघुवंशी, अमरसिंह पंडित, आनंदराव पाटील, रामहरी रुपनवर, अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही ज्या कुटुंबांना भेटी दिल्या होत्या त्या संदर्भातील वस्तुस्थिती मी काल मांडत होते. अनेक ठिकाणी भेटी दिल्यानंतर लक्षात येते की, काही कारणे ही तात्कालीक स्वरुपाची वाटतात. काहींना बँकांची नोटीस आली होती तर काहींना घरामध्ये वेगळी अडचण होती. अवेळी पाऊस व नापिकीमुळे आज शेतकऱ्यांच्या मनावर तणाव आहे. ग्लोबल वॉर्मिंग आणि पाण्याचे नियोजन या दोन बाबी तर दूर पल्ल्याच्या वाटतात. यासंबंधात ताबडतोब उपाययोजना न झाल्यामुळे शेतकऱ्यांना तत्कालीन परिस्थितीवर अवलंबून रहावे लागते ही वस्तुस्थिती आहे. आम्ही जालना जिल्ह्यातील श्री.पवार कुटुंबाला भेट दिली तेव्हा जास्तीत जास्त ताण कुटुंबातील वृद्ध लोकांवर, भाऊ, पत्नी यांच्यावर येत असल्याचे आढळून आले. त्यांच्यावर वाढत चाललेल्या ताणामुळे ही सर्व माणसे मानवाधिकारापासून वंचित होत आहेत ही वस्तुस्थिती आहे. आपण दरवर्षी या प्रश्नावर विदर्भामध्ये आवाज उठवत असतो. या प्रश्नासंबंधी आम्ही माननीय राज्यपाल महोदयांना भेटून निवेदन दिले आहे. त्यातील काही मागण्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात देखील उपस्थित केल्या आहेत. ज्या मागण्यांसंबंधात सभागृहात चर्चा झालेली नाही त्यावर मी आपले लक्ष वेधणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A -2

BGO/ 10:00

डॉ.नीलम गोऱ्हे....

महोदय, त्यापैकी एक मागणी म्हणजे म्हणजे कर्ज वसुली ही ताबडतोब थांबवली पाहिजे. कर्जमाफी संबंधी आमची शासनाकडून अपेक्षा आहे. तसेच कापलेल्या वीज जोडण्या पुन्हा जोडून दिल्या पाहिजेत. एवढेच नव्हे तर वीज बिलामध्ये सवलत मिळाली पाहिजे. नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक व्यक्तींना, पदाधिकाऱ्यांना समावून घेणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, शेतकऱ्यांना देण्यात येणारी सर्व आर्थिक मदत शेतकऱ्यांच्या जनधन खात्यावर जमा करण्याकडे देखील मी लक्ष वेधत आहे. जे सिंचन प्रकल्प दीर्घकाळ रखडलेले आहेत ते पूर्ण करण्यासंबंधातील उत्तर शोधले पाहिजे. जायकवाडीचे पाणी आता सोडले असले तरी त्या पाण्यावरून संघर्ष उभा राहिला आहे. पाणी वाटपासंबंधातील जलनीती आखण्यात आली असून पाणी वाटपाचे निवाडे हे मंत्रिमंडळापुरतेच मर्यादित राहिले. परंतु, त्या त्या विभागातील आमदारांना बरोबर घेऊन तेथील जनतेला विश्वासात घेऊन निर्णय व्हायला पाहिजेत. पण असे झालेले नाही असे मला निश्चितपणे वाटते.

महोदय, मला अवैध सावकारीकडे देखील आपले लक्ष वेधावयाचे आहे. राज्यात सावकारी सुधारणा कायदा लागू झाला आहे. सदर कायदा करण्यासाठी मोठा विलंब लागला याची आपल्याला कल्पना आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी ज्या सावकरांनी लाटल्या आहेत त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. मुळात कायदा झाला असला तरी त्याचे नियम तयार झालेले नाहीत. नियम बनवत असताना मधल्या काळात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण पडल्या आहेत त्या शेतकऱ्यांना आपण कशा प्रकारे संरक्षण देणार आहात, त्यासंबंधी पावले उचलली गेली पाहिजेत. आता माननीय सहकार मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आज सावकारांमुळे जे शेतकरी पीडित आहेत त्यांनी देखील येथे मोठी धरणे धरली होते. गेल्या अनेक वर्षापासून ही संघटना काम करीत आहे. माझी अशी सूचना राहील की, नवीन सावकारी सुधारणा कायदा लागू करताना त्या घटकातील सदस्यांना सामावून घ्यावे. आपण अनेक कायद्यांमध्ये त्यांच्याशी संबंधित असलेल्या सदस्यांना सामावून घेतले आहे. सावकारग्रस्त समितीने काही सूचना केल्या असून त्या लक्षात घेऊन त्या त्या भागातील सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यात सदर समितीच्या सदस्यांना सहभागी करून घेण्याची सूचना करावी. अनेकदा शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसून परत पाठविण्याचे प्रकार देखील

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आपल्याला मोठ्या प्रमाणावर पहायला मिळतात. असा अनुभव बऱ्याच ठिकाणी येतो. मी स्वत: सहकार सचिव व आयुक्तांना सावकारग्रस्त समितीला घेऊन भेटले होते. मी जवळ जवळ सहा महिन्यांपूर्वी विनंती केली होती की, आपण जे नियम बनवत आहात त्यामध्ये या समितीचे मत विचारात घ्यावे. परंतु, दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी होताना आम्हाला दिसत नाही. आजच्या कामकाजपत्रिकेवर माझी तिसरी लक्षवेधी सूचना ही पतपेढ्यांसंबंधातील आहे. आज पतपेढ्यादेखील डबघाईस आल्या आहेत. आज आपल्याला मदत करणारे कोणीच नाही हे लक्षात आल्यानंतर तो शेतकरी मानसिकदृष्ट्या निराधार झाल्यामुळे शेतकरी आत्महत्यांकडे वळतात.

महोदय, सभागृहात वेगवेगळ्या पक्षाचे आमदार बसलेले आहेत. आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवू शकत नाही तो माणुसकीला कलंक आहे. आत्महत्या थांबविण्यासाठी जगामध्ये काम केले जाते. त्यांचा अनुभव असा आहे की, अशा क्षणी त्या माणसाला आपल्या मदतीसाठी कोणी नाही असे वाटते. तेव्हा त्याच्या मित्राने मारलेली हाक किंवा देवाचे भजन किंवा नातेवाईकांनी प्रेमाने संभाषण केले तर तो शेतकरी आत्महत्येपासून परावृत्त होऊ शकतो.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सदनामध्ये एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू असताना माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय मदत व पुनवर्सन मंत्री यापैकी कोणीही सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता सभागृहात माननीय महसूल राज्यमंत्री उपस्थित आहेत.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, माननीय महसूल राज्यमंत्र्याचा परिचय देखील झालेला नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये माननीय महसूल राज्यमंत्र्याचा परिचय झालेला आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती हुस्नबानू खलिफे यांनी जो पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला आहे त्यावर मला पूरक बोलावयाचे आहे. माननीय महसूल राज्यमंत्री श्री.संजय राठोड यांच्याकडे मदत व पुनवर्सन विभाग नाही. त्यांच्याकडे मदत व पुनर्वसन खाते दिले असेल तर त्यांनी या प्रश्नावर तत्काळ उत्तर दिले तरी चालेल. राज्यातील

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ 10:00

श्री.माणिकराव ठाकरे....

शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा प्रश्नावर सभागृहात चर्चा सुरू असल्यामुळे माननीय मदत व पुनर्वसन मंत्री किंवा माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहिले पाहिजे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण सर्वोच्च ठिकाणी आहात. मी त्यावर भाष्य करू इच्छित नाही. आपल्या अनुमतीशिवाय सन्माननीय सदस्यांनी उभे राहून बोलणे ही बाब योग्य नाही. माननीय सभापतींनी अनुमती दिल्यानंतरच सन्माननीय सदस्यांनी आपला मुद्दा मांडावयाचा असतो. कोणीही उठून कुठलाही मुद्दा माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या अनुमतीशिवाय मांडू नये. सभागृहाचे कामकाज हे नियमाने चालले पाहिजे.

सभापती महोदय, मी शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भातील मुद्दा मांडत होते. महाराष्ट्रात दोन्ही सभागृहाचे मिळून 350 आमदार आणि 48 लोकसभा सदस्य आहेत. पूर्वीच्या काळामध्ये दुष्काळावर उपाययोजना करताना सर्वांचा सहभाग घेण्याची प्रथा होती. आम्हाला काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांच्या मतदार संघामध्ये 18-18 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. मला येथे कोणावरही टीका करावयाची नाही. महाराष्ट्रात दोन वर्षापूर्वी दुष्काळ पडला होता. त्यावेळी तत्कालीन माननीय मंत्र्यांनी ठराविक मतदार संघांमध्येच दौर केले होते. पूर्वी सर्वांचा समावेश करुन काम करण्याची प्रथा होती. परंतु आता मात्र ती प्रथा बाजूला पडली आहे. आज सरकारने सावकार विरोधी कायद्यामध्ये समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला पाहिजे अशी माझी सूचना आहे. मागच्या कालखंडात लातूर येथे विनाशकारी भूकंप झाला होता. त्यात हजारो लोक दगावले होते. त्यावेळी मला 400 महिल्या भेटल्या होत्या. प्रत्येक महिला मला सांगत होती की, आता आम्हाला जगण्याची इच्छा नाही. आमची नातवंडे, तरूण मुले दगावली आहेत, त्यामुळे आम्हाला सामूहिक आत्महत्या कराव्याशा वाटतात. त्यावेळी आम्ही त्यांना जगण्याचे एक कारण विचारले होते. त्यावेळी बऱ्याच महिलांनी सांगितले होते की, आमची पंढरपूरच्या विठ्ठलाची दर्शन घेण्याची एकच इच्छा आयुष्यात पूर्ण झालेली नाही.

यानंतर श्री.जुन्नरे....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .. .. ..

त्यावेळेस आम्ही त्यांना सांगितले की, आम्ही फार मोठे कार्यकर्ते नाहीत. तरी सुध्दा आम्ही तुम्हाला येणाऱ्या पंढरपुरच्या वारीत नक्की नेऊ. परंतु तुम्हाला या वर्षापासून तुमच्या कुटुंबाच्या मागे धिराने उभे राहून काम करावे लागणार आहे. सरकार जी काही मदत देईल त्याला सामोरे जा. मला स्तोम माजवायचे नाही. परंतु लोकांना धीर देण्यासाठी सरकार जनतेला जे आवाहन करते ते आवाहन जनतेपर्यंत पोहचत नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, मागील वर्षी गारपीट झाली होती त्यावेळेस शासनाने आम्हाला सांगितले होते की, आम्ही गारपिटीच्या संदर्भात शेतकऱ्यांना संदेश दिले होते. माननीय तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव त्यावेळेस सभागृहात उपस्थित होते त्यांनी त्यावेळेस सांगितले होते की, नाशिकच्या शेतकऱ्यांना गारपीट कधी होणार आहे या संदर्भात कोणतीही माहिती मिळाली नव्हती. गारपिटीच्या संदर्भात शेतकऱ्यांना माहिती न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना उपाययोजना करता आली नाही.

सभापती महोदय, एका बाजूला विमा कंपन्यांवर नुकसानीची जबाबदारी टाकली जात असते. शासन विम्याचे हप्ते सुध्दा भरत असते. परंतु आपण जेव्हा आर्थिक पाहणी अहवाल वाचतो त्यावेळी किती तालुक्यातील शेतकऱ्यांना विम्याचा फायदा झाला हे दिसून येते. शेतकऱ्यांना फार कमी प्रमाणात विम्याचा फायदा झाल्याचे दिसून येते. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे अशा सर्व शेतकऱ्यांना विम्याचा फायदा मिळत नाही हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, अवैध सावकारीच्या नियमांमध्ये काम करणारे शेतकरी आणि स्थानिक प्रतिनिधींना यामध्ये सामावून घेण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचवण्यासाठी किंवा शेतकऱ्यांना जो आधार मिळणार आहे तो कोणा मार्फत मिळणार आहे याची स्पष्टता होणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाने असे उत्तर दिले होते की, आम्ही शेतकऱ्यांना एसएमएसवर माहिती दिली होती, तहसिलदारांनाही यासंदर्भातील माहिती दिली होती. परंतु मला यासंदर्भात अशी सूचना करावयाची आहे की, शेतकऱ्यांना जी काही माहिती दिली जाणार आहे ती दंवडी पध्दतीने दिली तर त्याचा शेतकऱ्यांना चांगला उपयोग होऊ शकेल. आपण म्हणतो की, आता व्हॉट्सअप आलेले आहे, मोबाईल नेटवर्क आलेले आहे. परंतु गावातील किती लोक मोबाईलवरचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .. .. ..

मेसेज वाचतात ? त्यामुळे जनतेपर्यंत सरकारचा धीराचा हात पोहचवण्यासाठी मी असे सुचवू इच्छिते की, सन्माननीय मंत्री महोदय, श्री. दिवाकर रावते यांनी कपाशीच्या संदर्भात शेतकरी दिंडी काढली होती तसेच सरकार मार्फत शेतकऱ्यांच्या जनजागृतीसाठी, शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी, सरकार शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहचले आहे याचा विश्वास येण्यासाठी असे काही उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ज्यावेळेस आम्ही दौरा करतो त्यावेळी बहुतेक अधिकारी सर्व रेकॉर्ड तयार करुन येत असतात. परंतु जेव्हा मी पवार कुटुंबियांच्या संदर्भात तेथील तलाठी आणि तहसीलदारांना विचारले की, यासंदर्भातील रिपोर्ट तुम्ही कधी केला आहे ? तेव्हा त्यांनी सांगितले की, आम्ही काल रिपोर्ट केलेला आहे. आमचा दौरा निश्चित होणार असल्याची खात्री झाल्यानंतर फाईल तयार करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत याचा अर्थ शेतकऱ्यांचा माणुसकीवरील तसेच आपल्याला कोणी तरी मदत करेल यासंदर्भातील विश्वास डळमळला की, काय याबद्दल माझ्या मनात शंका येते आहे. आज दुष्काळाच्या संदर्भात वेगवेगळया घोषणा करीत असतांना मी असे सांगू इच्छिते की, जे 183 अपूर्ण प्रकल्प आहेत ते पूर्ण करणे तसेच ऊजनी धरणातील 21 टीएमसी पाणी मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विदर्भात शेतकऱ्यांनी भीषण पध्दतीने आत्महत्या केलेल्या आहेत. तसेच आज सुध्दा आत्महत्येच्या बातम्या येत आहेत. त्यामुळे चांगले अधिकारी आत्महत्याग्रस्त भागामध्ये पाठवून, त्यांच्यावर जबाबदारी सोपवून काम करु शकलो तर त्याचा फायदा होऊ शकेल.

सभापती महोदय, महसूल राज्यमंत्री माननीय श्री. संजयजी राठोड यांना यवतमाळ येथील शेतकरी आत्महत्येचा प्रश्न खूप चांगल्या प्रकारे माहिती आहे. त्यांनी आत्महत्येच्या संदर्भात बरेच काम केलेले आहे. या संदर्भात माननीय ठाकरेसाहेब सुध्दा सहमत होतील असा मला विश्वास आहे. त्यामुळे यासंदर्भात माझी मागणी अशी आहे की, विदर्भ, मराठवाडयात एवढया प्रमाणात ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या ठिकाणच्या आत्महत्याग्रस्त कुटुंबातील ज्या महिला आहेत त्या महिलांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आजही अनेक ठिकाणी त्या कुटुंबातील महिलांना जमिनीचा ताबा मिळालेला नाही. मला काही आत्महत्याग्रस्त कुटुंबातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .. .. ..

सुनांनी सांगितले की, मला माझ्या सासू-सासऱ्याबरोबरच रहावयाचे आहे. मी जर माहेरी गेली तर माझ्या सासूऱ्सासऱ्यांना कोणीही सांभाळणार नाही त्यामुळे मी यांच्या बरोबरच राहणार आहे. त्यामुळे असे जे कुटुंब आहेत त्यांच्या पुनर्वसनाची किंवा त्यांच्या विकासाची योजना सरकारने लाँगटर्म चालविण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन या कुटुंबाची दुरवस्था होणार नाही. राज्यवर जेव्हा मोठे संकट येते त्यावेळी आपण सर्व एकत्र येऊन काम करतो तसेच या प्रश्नाच्या संदर्भातही आपण एकत्र येऊन काम केले तर निश्चितच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकतील एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते. धन्यवाद. जयभीम, जय महाराष्ट्र.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात बोलण्याची संधी दिल्याबद्दल प्रथमत: मी आपले आभार मानतो.

मराठवाडयासाठी आता दुष्काळ नवीन राहिलेला नाही. मराठवाडयात सातत्याने तिसऱ्या वर्षीही दुष्काळ पडलेला आहे. दुष्काळाच्या तिसऱ्या वर्षाला सामोरे जात असताना मराठवाडयातील शेतकरी आज कोणत्या परिस्थितीतून जात आहेत याची आपण कल्पना सुध्दा करु शकणार नाही. 1972 च्या दुष्काळापेक्षा या वर्षाचा दुष्काळ भयानक आहे. 1972 च्या दुष्काळानंतर दुसऱ्या वर्षी फार चांगले पीक आले होते. 1972 च्या दुष्काळानंतरचे जे पीक आले त्या पिकाला शेतकरी "मढं पीक" आले असे म्हणत होते. त्यावेळी अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून शेतकरी बाहेर निघाला होता. दुष्काळामध्ये मोठया प्रमाणात जमीन भाजून निघाल्यामुळे पीक चांगले आले होते. मराठवाडा तिसऱ्या वर्षीही दुष्काळाला सामोरे जात आहे. या वर्षी मराठवाडयात पाऊस पडला नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु मराठवाडयाकडे अगोदरच अधिकचे लक्ष शासनाने दिले असते तर मराठवाडयावर आजची परिस्थिती उदभवली नसती असा माझा शासनावर स्पष्ट आरोप आहे.

सभापती महोदय,मराठवाडयातील दुष्काळाचा आढावा घेण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री तसेच अनेक मंत्र्यांनी औरंगाबाद येथील कमिशनरेट येथे बैठक घेतली होती. औरंगाबाद येथे दुष्काळाच्या संदर्भात व्यापक बैठक घेतली होती. त्या बैठकीला बरेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते. बैठक संपल्यानंतर मी आणि माझे मित्र माननीय श्री. धनंजय मुंडे आम्ही दोघांनी शेवटच्या बाकावरुन माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली की, आम्ही गावाकडे गेल्यानंतर या बैठकीतील कोणता मुद्दा गावातील लोकांना सांगायचा, दुष्काळाच्या संदर्भात शासनाच्या कोणत्या उपाययोजना आहेत, मराठवाडयातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या हेतूने कोणती उपाययोजना शासन आखणार आहे याची माहिती दिली तर आम्हाला आमच्या लोकांना यासंदर्भात काही तरी सांगता येईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या बैठकीत तुम्ही जे जे काही ऐकले ते सर्व गावामध्ये जाऊन सांगा. आम्ही हेच ऐकले होते की, दुष्काळाच्या संदर्भातील आढावा घेऊन त्यांची माहिती केंद्राला कळविणार आहोत व त्यानंतर केंद्राची समिती येईल. केंद्राची समिती आल्यानंतर आम्ही दुष्काळाच्या संदर्भातील निर्णय जाहीर करु. या दुष्काळाची दाहकता, भीषणता या नवीन सरकारला आहे की, नाही याबद्दल माझ्या सारख्या नवीन कार्यकर्त्याच्या मनात शंका आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .. ...

त्याच त्याच उपाययोजना, दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी आम्ही जन्माला आलो की, काय अशा प्रकारची शंका आम्हाला वाटू लागली आहे. आमच्या मराठवाडयातील जनतेच्या जीवनात काहीच फरक पडत नाही. दुष्काळामध्ये पिण्यासाठी टँकरने पाणी पुरवठा करता, सार्वजनिक विहीर देता. परंतु आम्ही याच उपाययोजनेच्या ओझ्याखाली दबून जगायचे काय ? त्यावेळेस मी माननीय महसूल मंत्री श्री. खडसे साहेबांना विचारले होते की, तुम्ही आम्हाला टँकरने पाणी देता, विहीर देता,परंतु आम्ही शेतीच्या पाण्याच्या संदर्भात बोलायचेच नाही काय ? त्यावेळेस माननीय खडसे साहेब म्हणाले की, ही फक्त दुष्काळाच्या संदर्भात बैठक असल्यामुळे दुष्काळ आणि पिण्याचे पाणी या विषयापुरतेच बोलायचे.

सभापती महोदय, आम्हाला संसार नाही, आम्हाला लेकीबाळीचे लग्न करावयाचे नाही, लेकी बाळींचे शिक्षण करावयाचे नाही. आमच्या घरात आजार नाही, आम्हाला संसाराचा गाडा नाही, संसाराचा गाडा बाकीच्या लोकांनाच आहे काय ? आम्ही आमच्या संसाराच्या संदर्भात तुमच्या अनुदानावर अवलंबून राहावयाचे का ? तुमचे अनुदान आले की, आमच्या लेकराबाळांचे शिक्षण होतील, आमच्या लेकीबाळींची लग्ने होतील, आम्ही केवळ तुमच्या अनुदानावरच जगायचे का ? यासंदर्भात तुम्ही आमचा कोणत्याही पध्दतीने विचार करणार नाही काय ?

यानंतर श्री. अजित...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

सभापती महोदय, आज मराठवाड्यातील शेतकरी अक्षरश: नागवला गेला आहे. मराठवाड्यातील गेवराई तालुक्यामध्ये 1 लाख 29 हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकविला जातो. माननीय मुख्यमंत्री बीड जिल्ह्यामध्ये आले होते. त्यावेळी तहसीलदारांनी अहवाल दिला की, गेवराई विधानसभा मतदारसंघामध्ये फक्त एक गाव 50 पैशांपेक्षा अधिकचे होते. त्यांनी ती आकडेवारी कशी काढली हे मला माहीत नाही, मला त्याचा शोध घ्यावा लागेल. गेवराई तालुक्यामध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी आहे. मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, पुन्हा चौकशी करण्यात आली तेव्हा त्या ठिकाणी 30 पैशांमध्ये कमी आणेवारी निघाली. आम्ही इतक्या भयानक परिस्थितीतून जात आहोत.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांनी जे स्टेटमेंट केलेले आहे त्याचा रेकॉर्ड माझ्याकडे आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात सर्वाधिक आत्महत्या होत आहेत आणि त्यातही गेवराई तालुक्यात जास्त आत्महत्या होत आहेत. आमच्याकडे पाच-सहा टक्क्यांपेक्षा जास्त रब्बी पीक होत नाही. आम्ही मार्च महिन्यापर्यंत कापसाचा खोडवा घेत असतो. आज त्या कापसाचे उत्पन्न एकरी 41 ते 45 किलोपेक्षा कमी आहे. कुठे 25-30 क्विंटल कापूस आणि कुठे 40-45 किलो कापूस ? आम्ही कालपर्यंत कापूस 6 हजार रूपयांपर्यंत विकला. आज तो दर आता 3900 रूपयांवर आला आहे. सीसीआयचा भाव 4100 रूपये आहे. आमच्याकडे 3900 रूपये भाव कसा ते सांगतो. सीसीआय 4100 रूपये भाव देते पण कापसाचे पेमेंट 15 दिवसांनी होईल असे त्यांच्याकडून सांगण्यात येते. शेतकऱ्यांना तातडीने पैशांची गरज असल्यामुळे ते 3900 रूपये दराने कापूस विकतात. आपल्याकडे कापसाचा काय भाव आहे हे मला माहीत नाही. आता आम्हाला वेचणी परवडत नाही. आज वेचणीसाठी मजूर 200 रूपये घेतात. आपला कापूस 3200 ते 3400 क्विंटल रूपयांनी विकला जात आहे. सोयाबीनचा भाव कालपर्यंत 3700 रूपये होता, तो 2600 रूपयापर्यंत आला होता , पुन्हा तो 3200 रूपयांपर्यंत गेला. दुधाचे दर 26 ते 27 रूपये होते. आज ते दर 16 ते 17 रूपयांपर्यंत आले आहेत. आमचे नेते माननीय श्री.अजित पवार साहेब हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी एका शेतकऱ्यांने त्यांच्या समोर एका हातामध्ये पाण्याची मिनरल बॉटल आणि दुसऱ्या हातामध्ये दुधाची बाटली



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

पकडून सांगितले की, तुम्ही दोन्हीपैकी काहीही घ्या. प्रत्येकाची किंमत 15 रुपये आहे. पाण्याचे आणि दुधाचे भाव सारखेच आहे.पाण्याच्या भावाने दूध विकले जात आहे. आपण हे पाप कुठे फेडणार आहात, हे सर्व करण्यासाठी आपला हट्ट होता काय, याचसाठी सत्तेवर आलात काय, आज शेतकऱ्यांना वाली राहिला आहे काय ?

सभापती महोदय,माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते येथे उपस्थित आहेत. ते विरोधी पक्षामध्ये असताना त्यांचे काम मी जवळून पाहिले आहे. मी त्यांची विविध विषयांवरील भाषणे ऐकली आहेत. आज ते सत्ताधारी पक्षामध्ये बसले आहेत. मला त्यांचा पूर्वीचा कणखरपणा आणि कठोरपणा ऐकायचा आहे. माननीय श्री. दिवाकर रावते यांनी मराठवाड्याच्या प्रश्नाच्या संदर्भात सातत्याने येथे आवाज उठविला आहे. मराठवाड्यातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केलेले आहे. आज ते त्यांचे कर्तव्य पार पाडत असताना त्यांच्यातील कठोर प्रशासक मला पहावयाचा आहे. आज आमच्यापेक्षा आपल्याकडे मराठवाडा आशेने पाहत आहे असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सदस्यांची भाषणे झाली. त्यांनी आपापल्या भागातील व्यथा मांडल्या. कोणी शेतीमालाचे भाव सांगितले, कोणी पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात प्रश्न मांडले. परंतु माझे म्हणणे आहे की, आता आपण तात्पुरती उपाययोजना न करता दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे. आमच्या भागातील शेतकऱ्यांना सन 2012-2013 मधील ड्रीपची सबसिडी अजून मिळालेली नाही. एक एकरासाठी 1 लाख रुपयांच्या संचाची आवश्यकता असते. त्यासाठी शासन 40 हजार रुपयांची सबसिडी देते. परंतु दुकानदार शेतकऱ्यांकडून 40 हजार रुपयांची मागणी करतो आणि सांगतो की, सबसिडी मिळाल्यानंतर आम्ही ती तुम्हाला परत करु आमच्याकडे पैसे नाहीत आणि शासनाकडून कधी पैसे मिळतील याची माहिती नाही. तेव्हा तू पहिले पैसे भर. म्हणजे सर्व पैसे त्या शेतकऱ्याला भरावे लागतात. आज शेतकऱ्यांकडे पैसे नाहीत. शेतजमीन गहाण ठेवायची म्हटली तर ती अगोदरपासूनच गहाण ठेवलेली असते. शेतकऱ्यांनी सोने गहाण ठेवून पैसे घ्यायचे म्हटले तर त्या कर्जाच्या व्याजाची रक्कम 40 हजारापेक्षा अधिकची होते. तेव्हा सोने गहाण ठेवून शासनाची सबसिडी आम्हाला परवडते काय ? आपण विदर्भाला ड्रीपची सबसिडी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

पॅकेज म्हणून दिली. तशाच पद्धतीचे 100 कोटी रुपयांचे पॅकेज मराठवाड्याला द्यावे अशी माझी मागणी आहे. ज्या ठिक्राणी शेतकऱ्यांच्या सबसिडी संदर्भातील निर्णय प्रलंबित आहे त्या ठिकाणी ती सबसिडी जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करावी.

सभापती महोदय, मराठवाडा हा दुष्काळी भाग आहे. मराठवाड्यात सातत्याने तीन वर्षे दुष्काळ पडत आहे. तेव्हा मराठवाड्याकरिता खास बाब म्हणून सलग तीन वर्षाकरिता 75 टक्क्यापर्यंत सबसिडी वाढवावी अशी माझी सरकारला विनंती आहे.

सभापती महोदय, शेततळ्याच्या संदर्भात एनआरएचएमच्या अनेक अटी आहेत. आपल्याकडे फळबाग किती आहे, आंबा पीक किती आहे, डाळींब पीक किती आहे असे अनेक प्रश्न आम्हाला विचारण्यात येतात. ज्या भागांमध्ये दुष्काळ आहे त्या ठिकाणी पाणी साठवण वाढण्याकरिता शेततळे दिलेले आहेत. असे असताना शेततळे देण्यासाठी अटी कशासाठी घालता ? आम्ही शेततळ्यातील पाणी कापासासाठी वापरु किंवा गुरांना पाणी देण्यासाठी वापरू, पण त्यासाठी अटी कशाला घालता ? माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, 5-10 एकराच्या आतील शेतकऱ्यांना शेततळे मंजूर करताना ते पॉलीथीनसहीत मंजूर करावे. एमआरईजीएसमध्ये काही मर्यादेपर्यंत शेततळे मंजूर होते आणि ते शेततळे करणे आज परवडत नाही. आपण आज मराठवाड्याच्या संदर्भात धाडसी निर्णय घ्यावा की, मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शेततळे मंजूर करताना त्या बाबतीत कोणत्याही अटी लावण्यात येणार नाहीत. शेततळ्यातील पाण्याचा उपयोग कापसासाठी किंवा गुरांना पाणी देण्यासाठी करण्यात येईल असे सांगावे.

सभापती महोदय, हवामानावर आधारित कृषी विमा योजना आहे. आमच्याकडे हवा कशी होती आणि मान कसे होते हे आम्हाला कधी कळले नाही. शासनाने नगर जिल्ह्याला ती कृषी विमा योजना लागू केली. इतर विभागांना ती योजना लागू केली,परंतु मराठवाड्यातील एकाही जिल्ह्यास ही कृषी विमा योजना लागू केलेली नाही. आपणास मराठवाड्यातील हवामान बाधते काय ? ती कृषी विमा योजना लागू करण्यास शासनास अडचण काय आहे ? तेव्हा हवामानावर आधारित असलेली कृषी विमा योजना संपूर्ण मराठवाड्यास लागू करावी अशी माझी विनंती आहे.

..4..

श्री.अमरसिंह पंडित....

सभापती महोदय, आमच्या बीड जिल्ह्यातील केवळ आठ महसुली मंडळात सोयाबीन पिकाचा विमा काढला जात आहे. आमच्या भागात मागील दोन वर्षापासून सोयाबीन पीक घेतले जात आहे. तीन हेक्टर क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रावर सोयाबीन पीक झाले नाही. गेल्या वर्षी साडेतीन हजार हेक्टरपर्यंत सोयाबीन पीक घेण्यात आले. मरावाड्यातील गेवराई तालुका आणि बीड जिल्ह्यातील केज व अंबेजोगाई भाग वगळला तर उर्वरित भागामध्ये सोयाबीन पिकाची नव्याने लागवड करण्याची गरज आहे. आपण त्या संदर्भात आयुक्तांना आदेश दिले तर आम्हाला सोयाबीन पिकाच्या संदर्भात विमा भरण्याची परवानगी मिळेल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

सभापती महोदय, एमआरईजीएसच्या संदर्भात राज्य सरकारने काही नवीन निर्णय घेणे गरजेचे आहे. या योजनेंतर्गत तेच तेच रस्ते, त्याच त्याच खाजगी विहिरी घेण्यापलीकडे आपली झेप कधी गेली नाही. भूमिगत बंधाऱ्यांबाबतचे लाईन डिपार्टमेंट तहसीलदार यांच्याकडे सोपविले. मुळात तहसीलदार हे टेक्नीकल कॅडरचे नसतात. मग त्यांनी मोजमाप कसे करावे ? या यनिमित्ताने निदर्शनास आणून देतो की, भूमिगत बंधाऱ्याशिवाय अन्य दुसरे चांगले काम असू शकत नाही. एका पावसाचे पाणी वाहून गेले की लगेच भूमिगत बंधाऱ्याचे रिझल्टस् मिळतात. भूमिगत बंधाऱ्याचे लाईन डिपार्टमेंट तहसीलदार आणि टेक्नीकल बॅकअप जिऑलॉजिस्ट आहेत. जिऑलॉजिस्टच्या बाबतीत सांगायचे झाल्यास ते म्हणतात की, मी केवळ पाण्याची जागा दाखवून देणार, त्याचे अंदाजपत्रक तुम्ही जिल्हा परिषदेकडून करुन घ्यावे आणि अंमलबजावणी तहसीलदारकडून करुन घ्यावी. त्यामुळे या संदर्भातील निकष आणि निर्णयांमध्ये बदल करणे गरजेचे आहे. शिवाय यासाठी 60:40 असा रेशियो निश्चित केलेला आहे. या निमित्ताने मी विचारतो की, एखाद्या वाडीमध्ये आपण 60:40 हा रेशियो कसा लावणार ? एमआरईजीएस अंतर्गत ज्या ठिकाणी कामच झाले नाही त्या ठिकाणी 60:40 चा रेशियो कशासाठी लावता ? या निमित्ताने माझी विनंती आहे की, तालुका हे युनिट गृहीत धरुन तसेच दुष्काळी भागाच्या बाबतीत वेगळे निकष ठरविले पाहिजेत. माझी विनंती आहे की, या बाबतीत किमान तालुका स्तरावर 50:50 रेशियो मेंटेन केला पाहिजे.

महोदय, आता मी जी मागणी करणार आहे ती केल्यानंतर कदाचित उद्याच्या वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने छापून येतील. पण ही मागणी करणे काळाची गरज असल्यामुळे ती मागणी करणे आवश्यक आहे. महोदय, आमच्या भागासारख्या दुष्काळी भागात बोअर घेण्यावर बंदी आणली पाहिजे. ज्याची परिस्थिती चांगली असते तो 800-900 फूट खोल बोअर घेतो आणि शेजारच्या व्यक्तीच्या 150-200 फूट बोअरमधील पाणी खेचून घेतो. या माध्यमातून तो आजूबाजूच्या परिसरातील पाणी शोषून स्वत:ची शेती पिकवितो. या निमित्ताने मी विचारतो की, अशा प्रकारे बोअरवर बंदी घालण्याबाबतचा धाडसी निर्णय शासन घेणार काय ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

महोदय, बोअर रिचार्ज करण्यासंदर्भातील नवीन पुस्तिका आली आहे. या संदर्भातील नियम कोण तयार करतात हे आम्हाला माहीत नाही. उद्या गेवराई तालुक्यात मी 100 रिचार्ज पीट करण्याचे ठरविले तर त्या बाबतचा रेशियो 39:61 निश्चित केलेला आहे. हा रेशियो कसा मेंटेन करायचा हे निर्णय करणाऱ्या लोकांनी तालुक्याच्या ठिकाणी येऊन समजून सांगावे. केंद्रामध्ये हाच रेशियो 50:50 निश्चित केला असून राज्यामध्ये मात्र तो 39:61 ठरविण्यात आला आहे. या निमित्ताने मी नम्रपणे विनंती करतो की, हा निकष बदलणे अतिशय गरजेचे आहे.

महोदय, नाल्यांचे रुंदीकरण, खोलीकरण आणि लांबीकरण करण्याची परवानगी एमआरईजीएसमधून द्यावी अशी मी विनंती करतो.

महोदय, एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा मी निदर्शनास आणून देतो. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना जगवायचे असेल किंवा मी सांगत असलेली गोष्ट सरकारच्या सदसद्‌विवेकबुध्दीला पटत असेल तर त्यांनी ते करावे. आपण म्हणत असाल की, आम्ही नेहमी मराठवाड्यासाठी काहीना काही माफ करण्याची मागणी करीत असतो. पण कृपया मला माफ करा. मी सांगू इच्छितो की, या मराठवाड्यातील शेतकरी अतिशय मानाने जगणारे आहेत. निधड्या छातीच्या शेतकऱ्याला कष्ट करण्याशिवाय दुसरे काही सुचत नाही. परंतु आम्हा लोकांना पुरेशी साधने आणि संधी कधी मिळालीच नाही. ती संधी आणि साधने ज्यांना मिळाली ती लोकं आमच्याकडे येऊन व मानेला झटका देऊन हात वर करुन म्हणतात की, पश्चिम महाराष्ट्रातील आणि या भागातील संस्था कशा चालवायच्या हे आमच्याकडून शिका. माझे असे म्हणणे आहे की, मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पुरेशी साधने आणि संधी उपलब्ध करुन दिली तर, या भागातील शेतकरी शेती कशी करायची आणि संस्था कशा चालवायच्या याचे धडे राज्याला दिल्याशिवाय राहणार नाही.

महोदय, आमच्या भागातील शेतातील मोटारपंप गेल्या तीन वर्षांपासून कधीच चालू झालेच नाहीत. परंतु वीज बिल मात्र 50 हजार रुपये, 75 हजार रुपये, 1 लाख रुपये येते. मुळात जे मोटारपंप चालू झालेच नाहीत त्यांचे वीज बिल कसे येते ? या संदर्भातील निर्णय करीत असताना मराठवाड्याला पॅकेज देण्याचा यदाकदाचित राज्य सरकारचा प्रामाणिक उद्देश असेल तर मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या वीज बिलाबाबत निश्चितपणे विचार करुन त्यांचे वीज बिल माफ केले पाहिजे.

..3..



श्री.अमरसिंह पंडित....

महोदय, मी मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी मागितली नाही तरी माझ्यावर आरोप होणारच आहेत. आज मी जबाबदारीने सांगतो की, आपण आमच्या भागातील पीक कर्जाच्या हप्त्याचे आणि व्याजाचे पुनर्गठन करणार. पण हे पुनर्गठन करीत असताना ही रक्कम वाढत चालली आहे. मराठवाड्यातील पीक कर्जाच्या संदर्भात निश्चित विचार करावा आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पुन्हा उर्जितावस्थेत आणण्यासाठी त्यांचे पीक कर्ज माफ करावे. विदर्भातील राज्यकर्ते हा धाडसी निर्णय मराठवाड्याच्या संदर्भात घेतात काय याची वाट मराठवाड्यातील जनता आशेने पाहत आहे.

महोदय, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत या राज्यकर्त्यांना मराठवाड्याने भरभरुन यश दिलेले आहे. मराठवाड्यातील शेतकरी राज्य सरकारकडे मोठ्या आशेने पाहत असेल तर त्यात गैर वाटण्याचे काहीच कारण नाही. सरकार पीक कर्जाच्या संदर्भात निर्णय घेते. आम्ही एमटीओ घेतो, पण तो कशासाठी वापरतो ? वास्तविक पाहता एमटीओचे कर्ज शेतीसाठी वापरले जाते. सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख सभागृहात बसलेले आहेत. ते त्यांचा कारखाना अतिशय चांगल्याप्रकारे चालवित आहेत. एमटीओ कर्ज शेतीसाठी वापरलेले असताना सुध्दा त्या कर्जाच्या हप्त्याचे आणि व्याजाचे पुनर्गठन होत नाही. कारण राज्य सरकार केवळ पीक कर्जाचे पुनर्गठन करते. त्याचा परिणाम असा होतो की, बँक म्हणते की, आम्ही केवळ पीक कर्जाचे पुनर्गठन केले आहे, एमटीओचे पुनर्गठन केलेले नाही. त्यामुळे बँकाकडून शेतकऱ्यांना नोटीसा पाठविल्या जातात. कलम 101 अंतर्गत कारवाई करताना शेतकऱ्यांच्या जमिनी आणि घरे ताब्यात घेऊन त्यांच्या संसाराची राखरांगोळी झाल्याचे आम्ही स्वत: पाहिलेले आहे.

महोदय, मराठवाड्याला 18 टीएमसी पाणी देण्याबाबतचा निर्णय तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी घेतला होता. जायकवाडीचे तुटीचे खोरे आहे, आम्हाला कमी पडलेले 18 टीएमसी पाणी आणि जे प्रकल्प झालेच नाहीत त्याचे 18 टीएमसी पाणी मराठवाड्याला उपलब्ध करुन दिले आहे. आता त्या संदर्भातील निर्णय घेणे गरजेचे आहे. आमच्या भागात दोन-अडीच कोटी रुपयांचे अतिशय छोटे छोटे प्रकल्प आहेत. या प्रकल्पांसाठी भूसंपादनाची आवश्यकता नाही. गेवराई आणि बीड तालुक्यात असे प्रकल्प उभे केले तर 27 हजार हेक्टर शाश्वत शेती निर्माण

..4..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 10:30

श्री.अमरसिंह पंडित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होऊ शकते. हल्लीच्या युगात आम्ही 'शाश्वत शेती' हा शब्दच विसरून गेलो आहोत. शाश्वत शेती आम्ही कधी पाहिलेली नाही. आमच्या पिढीतील लोकांना ही शेती पाहू द्या. गेल्या वर्षी लावलेल्या ऊसाच्या शेतीमध्ये या वर्षी नांगर घालण्याची वेळ आली आहे. गोदावरी नदीच्या पात्रातील बॅरेजेसमध्ये पाणी सोडण्यास शासन तयार नाही. सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, तुम्ही शेतीच्या पाण्याबद्दल नव्हे तर पिण्याच्या पाण्याबद्दल बोला. महोदय, मला माफ करा. या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्र्यांच्या उत्तरात आले पाहिजे. त्यांनी सांगितले पाहिजे की, या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शेती करण्याचे काही कारण नाही, त्यांचे संसार उभे करण्याचे कारण नाही, भविष्यात लेकीबाळीचे लग्न करायचे असेल, त्यांचे शिक्षण करायचे असेल तर आमच्या मेहेरबानीने आणि आमच्या अनुदानावर करा. तुमच्या नातेवाईकांना दवाखान्यात घेऊन जायची वेळ आली तर आमच्या अनुदावर उपचार करा. असा फतवा एकदा काढा. आम्ही गप्प बसतो, तुमच्याकडे पुन्हा काही मागणार नाही. तुम्ही आमचे मन का पाहता ? आम्ही कालही जगत होतो, आजही जगत आहोत आणि उद्याही जगू. आज मराठवाड्यातील जवळपास 44 टक्के शेतकरी ऊस तोडणीसाठी जात होते. ती आकडेवारी वाढत जाऊन भविष्यात 70-75 टक्के होईल, या पलीकडे अजून काय होणार आहे. नवीन आलेल्या सरकारकडे आम्ही आशेने पाहत आहोत. या सरकारकडून आम्हाला ऐकायचे आहे की, मराठवाड्याच्या संदर्भात हे सरकार नेमके काय निर्णय करणार आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून सरकार अमुक गोष्टी करणार आहे हे माननीय मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावयास पाहिजे. पाण्याच्या बाबतीत सांगतो की, आम्हाला टँकर नको, आम्हाला एमआरईजीएसची कामे नको. परंतु या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना शाश्वत शेतीच्या संदर्भात काही स्पेसिफिक उत्तर मिळाले तर मराठवाडा निश्चितपणे दोन पाऊल पुढे येऊन सरकारचे स्वागत करील.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

परंतु, तो प्रामाणिपणा तुमच्यात आहे का, हे एकदा पहायचे आहे. सभापती महोदय, मी अधिकचा वेळ घेणार नाही. आपण मला अतिशय महत्त्वाच्या विषयावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आणि सभागृहाचेही आभार मानतो. धन्यवाद !

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे. सभागृहात अत्यंत महत्त्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. मी मुद्दे रिपिट करणार नाही. माझी शासनाला विनंती आहे की, पूर्वीच्या विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची बैठकीची व्यवस्था बदलली असल्याने त्यांनी आपले विचार बदलू नयेत. ते बदलणार नाहीत, अशी अपेक्षा आहे. मी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांचे विरोधी पक्षात असताना केलेले भाषण वाचत होतो. त्यांनी सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांना त्यावेळी सांगितले होते की, शेतकऱ्यांसाठी मगरमच्छ के आसू बहाना बंद कर दो, त्यांना प्रामाणिकपणे मदत करा. मी म्हणतो की, हेच जर तुम्ही अंगीकृत केले तर महाराष्ट्राने तुमच्याकडून ज्या अपेक्षा ठेवल्या आहेत त्या शंभर टक्के पूर्ण होतील, असे आम्हाला वाटते. आम्ही कापसाच्या संदर्भात वृत्तपत्रांतून वाचले आहे. आमच्या खानदेशामध्ये सर्वात जास्त महत्त्वाचे पीक कापसाचे आहे. कापूस, केळी, मिर्ची ही सगळी पिके अत्यंत महत्त्वाची आहेत. कापूस महत्त्वाचे पीक असताना सुध्दा सीसीआयकडून कापसाची खरेदी उशिरा सुरू झाली. त्यामुळे शेतकऱ्यांनी खेडा खरेदीला कापूस दिला. सरकार आदेश काढत आहे की, ज्यांनी सीसीआयला कापूस दिला, त्यांनाच बोनस देणार आहोत. सभापती महोदय, सीसीआयला कापूस देणारे शेतकरी 10-15 टक्के आहेत. बाकी 80 टक्के शेतकऱ्यांनी खेडा खरेदीमध्ये व्यापाऱ्यांना कापूस दिला. ज्यांच्या 7/12 वर कापूस आहे, ज्याने कापूस लावला आहे, त्या प्रत्येक शेतकऱ्याला न्याय दिला पाहिजे अशी सर्वसामान्य शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. माझी देखील शासनाला या संदर्भात विनंती आहे.

सभापती महोदय, माझी दुसरी एक विनंती आहे. आम्ही दीड-दोन महिन्यांपासून जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी करीत आहोत. आमचा जिल्हा बॉर्डरवर आहे. गुजरात व राजस्थान या राज्यांना लागून असलेला हा जिल्हा आहे. तिकडच्या भागामध्ये सधन शेतकरी आहे. तो चाऱ्याला 6 हजार रूपये एकरी देत आहे. आमचा गरीब शेतकरी दुष्काळामध्ये सापडला आहे म्हणून तेथील शेतकऱ्यांना जास्त रक्कम मिळते. आमच्याकडून भरवाड चारा घेऊन जातात आणि त्यांना 6 हजार रूपये एकराने चारा विकतात. आम्ही त्यावेळीसुध्दा मागणी केली होती. परंतु, त्या संदर्भात अजूनही निर्णय झालेला नाही. माझी विनंती आहे की, बॉर्डरवरील जिल्ह्यांच्या ठिकाणी चाऱ्याच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ....

राज्य बंदी किंवा जिल्हा बंदी तत्काळ केली पाहिजे. चाऱ्याच्या संदर्भात जिल्हा बंदी किंवा राज्य बंदी केली नाही तर आमचा चारा ज्यांच्याकडे पैसे आहेत ते घेऊन जातील. परिणामी, आमची जनावरे उपाशी राहतील. हा अत्यंत गंभीर विषय आहे. माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, त्या संदर्भातील निर्णय याच सभागृहात आताच जाहीर करावा. आमची मंत्री महोदयांकडून तशी अपेक्षा राहील.

महोदय, एमआरईजीएसमध्ये असंख्य कामे सुरू आहेत. सरकारने नवा आदेश काढला आहे की, ज्या गावात 5 कामे जुनी, अपूर्ण असतील तर तेथे पुन्हा एमआरईजीएचे काम मंजूर करू नये. एखाद्या गावामध्ये 10-20 विहिरी मंजूर आहेत. मात्र त्या 5 अपूर्ण असतील तर गावाला नवीन कामे मंजूर करीत नाहीत. सांगितले जाते की, मागच्या वर्षीची 5 कामे अपूर्ण आहेत. एक विहीर म्हणजे एक काम असे धरले तर एकाही गावाला भविष्यात एमआरईजीएसचे काम मंजूर होईल, असे मला वाटत नाही. शासनाने त्या संदर्भातील खुलासा अधिकाऱ्यांना करणे गरजेचे आहे. गावात एक विहीर असते. गावामध्ये 50-100 विहिरी मंजूर केल्या तरी त्या अपूर्ण राहतातच. 60:40 च्या रेशोमध्ये बसताना गाव पातळीवर असंख्य अडचणी येतात. आपण त्या संदर्भातील खुलासा अधिकाऱ्यांना करावा. आमच्या खानदेशामध्ये पाणी थोडे जास्त दिसत आहे. 50 टक्क्यांवर पावसाळा झालेला आहे, असे वाटत आहे. रेकॉर्डवर 60-65 टक्के पावसाळा झाला आहे. माझी विनंती आहे की, आपण हे एकदा तपासून पहावे. 30 दिवसांच्या अंतरानंतर पावसाळा झाला आहे. 25, 28 30 दिवसांनतर पाऊस झाला. परिणामी, मध्यंतरी पावसाचा ताण पिकांवर पडला. पिकांची परिस्थिती अत्यंत वाईट झाली. कापसाचा उतारा फक्त मराठवाड्यात बसला नाही असे नाही तर आमच्याकडे सुध्दा 20-25 क्विंटल कापूस एकरी पिकायचा मात्र आज 3-4 क्विंटल कापसावर शेतकरी थांबला आहे. शेतामध्ये रोगराई पडायला पिकच नव्हते. आम्ही आतापर्यंत अनुभवले की, लिंबाचे झाडे हे निरोगी झाड असते. त्या झाडावर कधीच किड पडत नव्हती. यावर्षी आमच्याकडे सर्वांत जास्त किड लिंबाच्या झाडावर पडली आहे. झाडावर किडीने एकही पान शिल्लक राहू दिलेले नाही, अशी असंख्य गावे आहेत. आपल्याला असंख्य गावांमध्ये असे दिसेल की, लोकांनी घराच्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ....

समोरची लिंबाची झाडे काढून टाकली आहेत. कारण एवढ्या प्रमाणात अळ्या पडल्या की, झाड फक्त उभे होते, एकही पान किडीने ठेवलेले नव्हते. बिकट परिस्थिती असताना आपल्याकडून सरकार म्हणून शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण होणे गरजेचे आहे. आपणा सर्वांची ही जबाबदारी आहे. महोदय, उपसा सिंचन योजनांच्या संदर्भात देखील चर्चा झाली. आमच्या सरकारने मागे आमच्या भागात तापी नदीवर प्रकाशाचे, सारणखेड्याचे, सुलवाड्याचे बॅरेज बांधले. बॅरेजेस पूर्ण झाली. परंतु, दुर्दैवाने त्यामधून आम्ही पाणी उचलू शकलो नाही. आदरणीय श्री. एकनाथराव खडसे (पाटील) साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सुध्दा राजकीय मतभेद बाजूला ठेवून मागच्या वेळी आमच्या पक्षाच्या माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो आणि उपसा सिंचन योजना सुरू करा अशी मागणी केली. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे (पाटील) साहेबांनी 4 दिवसांपूर्वी जळगावमध्ये घोषणा केली की, आम्ही 20 उपसा सिंचन योजना या वर्षी सुरू करणार आहोत. मला सांगावयाचे आहे की, उपसा सिंचन योजना 20 नसून 64 आहेत, ज्या सहकाराच्या माध्यमातून सुरू झाल्या आहेत. धुळे, नंदुरबार व जळगाव या तीनही जिल्ह्यांच्या तापी काठावरच्या शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने सुजलाम, सुफलाम करायचे असेल तर आपण उपसा सिंचन योजना सुरू करा. सरकारने कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ केले. कर्जाचा उपयोग काही होत नाही, त्याचा विनियोग काही नाही. तापीमध्ये पाणी आहे आणि त्याचा उपयोग फक्त मासे धरण्यासाठी होत आहे. 5 वर्षांपासून ते आमच्या उपयोगी पडले नाही. आम्ही उपसा सिंचन योजनेचे 500 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. या उपसा सिंचन योजना ताबडतोब तापी महामंडळाच्या माध्यमातून सुरू केल्या पाहिजेत. तापी महामंडळानेच त्या दुरुस्त करून 5 वर्षे चालविल्या पाहिजेत, असे बंधन केले पाहिजे नाही तर तापी महामंडळाच्या माध्यमातून त्या दुरुस्त होतील आणि परत तुम्ही शेतकऱ्यांच्या ताब्यात द्याल. उपसा सिंचन योजना दुरुस्त करील त्याला त्या 5 वर्षे चालविण्यासाठी बंधनकारक केले पाहिजे नाही तर तापी काठावरच्या उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीमध्ये सुध्दा फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यशिवाय राहणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ....

नाही. दुरूस्त करणाऱ्यानेच 5 वर्षे त्या चालवाव्यात आणि त्यानंतरच शेतकऱ्यांच्या ताब्यात द्याव्यात. 64 उपसा सिंचन योजना तत्काळ सुरू करण्याच्या संदर्भात सरकारने नियोजन करावे, अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, ट्रान्सफॉर्मर जळाले तरी आम्हाला ते मिळत नाही. राज्य कोणाचेही असू द्या. आमच्या राज्यात सुध्दा अधिकाऱ्याला पैसे दिल्याशिवाय ट्रान्सफॉर्मर मिळत नव्हता. आज देखील तीच परिस्थिती आहे. दुष्काळात सापडलेला शेतकरी त्या भागातील शेतकऱ्यांना एकत्र करतो, वर्गणी काढतो आणि ट्रॅक्टरमधून ते स्वत:च ट्रान्सफॉर्मर घेऊन येतात. एकही अधिकारी त्यांच्याकडे पाहत नाही, रिपोर्टही लिहित नाही, जोपर्यंत तो त्यांच्याशी सौदा करीत नाही. 100 हॉर्स पॉवरचा ट्रॉन्सफॉर्मर पाहिजे असेल तर त्या क्षमतेचा शिल्लक नसल्याने 63 हॉर्स पॉवर क्षमतेचा घेऊन जावे असे सांगतात. 63 हॉर्स पॉवर क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर नेला तर तो संध्याकाळीच जळतो, कारण त्यावर लोड येतो. लोड वाढविणारे अधिकारीच आहेत. शेतकऱ्यांची त्यामध्ये चूक नाही. तसे अधिकारी करतात. पैसे देणाऱ्याला कनेक्शन दिले जाते. आज 100 हॉर्स पॉवर क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरवर 200 हॉर्स पॉवर इतका लोड आहे. त्यामुळे ट्रान्सफॉर्मर जळण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे पाणी असून सुध्दा उपयोगात नसते. विहिरीला 8 तासानंतर 2 तास उपसा होईल एवढे पाणी गोळा होते. परंतु तरी सुध्दा आज काही गावांमध्ये विजेच्या अभावी पाणी टंचाई आहे. लोडशेडिंग आहे हे आम्हाला मान्य आहे, आम्ही ते स्वीकारले आहे. लोडशेडिंग नसेल त्यावेळी मात्र शेतकऱ्याला सलग वीज दिली पाहिजे. तुकड्याने वीज दिली जाते. रात्री वीज सुरू होते आणि त्यानंतर बंद होते. एकही माणूस मेंटेनन्सला राहत नाही. कट आऊट टाकणे किंवा इतर कामे सर्वसामान्य शेतकरी करू लागला आहे. माझी विनंती आहे की, दिवसा वीज दिली तर असलेले पाणी शेतकऱ्याला त्याच्या शेताला देता येईल. रात्री असलेले पाणी सुध्दा त्याच्या शेतामध्ये पूर्ण जात नाही. तो रात्रीचा घरी झोपत नाही. थंडीच्या दिवसांमध्ये सुध्दा त्याला रोज शेतावर जावे लागते. आपण त्या संदर्भात नियोजन करून 8-10 तास वीज द्यावी. आपण म्हणतो की, गुजरातमध्ये 12 तास वीज आहे. आम्ही गुजरातच्या जवळ आहोत. 10 कि.मी. अंतरावर गुजरातचा तालुका आहे. गुजरातमधील खेड्याला 24 तास वीज आहे, हे मान्य आहे. पण गुजरातमध्ये शेतीला 6-7 तासांच्या वर वीज मिळत नाही, हे आपल्याला मान्य करावे लागेल.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी..........

आपले सरकार किमान 12 तास तरी वीज देत आहे. फक्त ही वीज सलगपणे द्यावी, अशी आमची विनंती आहे. सलग वीज उपलब्ध करुन दिली तर शेतकरी स्वत:चे नियोजन करु शकेल. आपल्यापेक्षा शेतकऱ्याचे नियोजन अतिशय चांगले असते. स्वत:चे दोन पैसे कसे वाचतील, खर्च कसा कमी होईल आणि शेताला पाणी कसे मिळेल, याचे अतिशय चांगल्या प्रकारचे नियोजन तो स्वत: करीत असतो. संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला मदत करण्याचे काम आपण सर्वांनी मिळून केले पाहिजे.

सभापती महोदय, मी आदिवासी जिल्ह्यातील आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विषय नेहमीच चर्चेला येत असतो. नंदुरबार जिल्हा 65 टक्के आदिवासी लोकवस्तीचा जिल्हा आहे. आपण असे कधीही वाचले नसेल की, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. एकवेळ आदिवासी शेतकरी उपाशी पोटी झोपेल पण तो आत्महत्या करणार नाही. आत्महत्यांसाठी लोकप्रतिनिधीही तेवढेच जबाबदार आहेत व त्यासाठी लोकप्रतिनिधींनी आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे. आपल्या भागातील शेतकरी आत्महत्या का करीत आहे, याचा विचार त्यांनी केला पाहिजे. आमच्या भागातील गरीब शेतकरी, आदिवासी शेतकरी, एक-दोन एकर शेती असलेला शेतकरी जंगलामध्ये, झोपड्यांमध्ये राहतो, काबाडकष्ट करतो पण आत्महत्या करीत नाही. स्वाभिमानाने जगणारा हा आदिवासी बांधव आहे. त्यालाही न्याय देण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासन आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत देते, असा विचार आमच्या भागातील शेतकऱ्याने केला तर हे आत्महत्यांचे लोण आमच्या भागातही येण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे आत्महत्यांपासून लांब असलेल्या या आदिवासी शेतकऱ्याला शासनाने सर्वतोपरी मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाकडे हजारो कोटी रुपयांचा निधी आहे. दरवर्षी 5 हजार कोटी रुपयांची तरतूद आदिवासी विकास विभागासाठी केली जाते. परंतु, हा सर्व निधी कोठे जातो, याचा विचार आपल्याला करावा लागेल. आदिवासी विभागात होत असलेल्या भ्रष्टाचाराच्या माध्यमातून हा निधी जर अन्य मार्गाने जात असेल तर त्याबाबत योग्य ती

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपाययोजना करुन हा सर्व निधी गरीब शेतकऱ्यावर, आदिवासी शेतकऱ्यावर जास्तीत जास्त कसा खर्च होईल, यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, सत्तारुढ पक्षाची विरोधी पक्षात असताना सातत्याने ही मागणी असायची की, शेतकऱ्यांसाठी कर्ज माफी करावी, त्यांची वीज बिले माफ करावीत. या सर्व मागण्यांचा विचार आता त्यांनी करणे गरजेचे आहे. आपण सत्तेत आला असला, सभागृहातील आपली आसन व्यवस्था बदलली असली तरी आपली पूर्वीची विचारसरणी आपण बदलवू नका. तुमची बांधिलकी सर्वसामान्य शेतकऱ्याशी आहे, हे दाखविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याची संधी आता आपल्याला मिळाली आहे, या संधीचे सोने करा, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

---------------

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3....

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, एका अतिशय जीवघेण्या प्रश्नावर आज आपण सभागृहात चर्चा करीत आहोत आणि या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दुष्काळाची भीषणता एवढी भयानक आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सन 2012 पासून कधी अवर्षण, कधी गारपीट, कधी दुष्काळ, कधी कमी पाऊस, अशी परिस्थिती असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे आणि तो वैफल्यग्रस्त होत चालला आहे. एवढी भीषणता असताना देखील महाराष्ट्र शासनाने अद्यापपर्यंत महाराष्ट्रात दुष्काळ घोषित केलेला नाही, याबद्दल मला अत्यंत दुःख वाटते.

सभापती महोदय, लोकसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय कृषी मंत्री महोदयांनी असे सांगितले की, महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असेल तर दुष्काळ घोषित करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. असे असताना महाराष्ट्र शासनाने दुष्काळ घोषित करण्यास विलंब का लावावा ? केवळ केंद्र सरकारचे पॅकेज येईल तेव्हा दुष्काळ निवारणाची कामे करु असे न करता राज्य शासनाने स्वतः पुढाकार घेऊन दुष्काळग्रस्त भागाला न्याय देण्याच्या दृष्टीने प्रयत्न का करु नयेत ? राज्य शासनाने याबाबत पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, खरीप किंवा रब्बी पिकांच्या बाबतीत शेतकऱ्याला दुबार, तिबार पेरणी करावी लागली आणि तीही वाया गेली. यासाठी जिल्हा सहकारी बँकेकडून किंवा खाजगी सावकारांकडून त्यांनी कर्ज घेतले आणि उत्पादन न निघाल्यामुळे या शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागत आहे.

सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्य, आमचे मित्र श्री.अमरसिंह पंडित यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. त्यांच्यामध्ये आमचे मित्र व माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते संचारल्यासारखे वाटले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर, दुष्काळी परिस्थितीबाबत सन्माननीय श्री.रावते साहेब ज्या पोटतिडीकीने बोलायचे तशाच पध्दतीने सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी देखील आपले विचार मांडले आहेत. सन्माननीय श्री.दिवाकर रावते यांनाही याचे बरे वाटले असेल की, माझा रोल निभावणारा एक सदस्य सभागृहात आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की, केवळ आसन व्यवस्था बदलली आहे, आपली धोरणे आणि नीती बदलू नका. त्यांची अपेक्षा आपण पूर्ण करावी, असे मला वाटते.

..4....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे............

सभापती महोदय, मी काही जास्त बोलणार नाही. एक गोष्ट निश्चित आहे की, मराठवाडा सातत्याने दुष्काळाशी सामना करीत आहे. राज्यातील अन्य भागांशी माझा संबंध आहे. त्यापेक्षाही मराठवाड्याशी जास्त संबंध आहे. मराठवाड्यातील सर्वच तालुके दुष्काळग्रस्त आहेत. विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील 20 तालुके, नागपूर जिल्ह्यातील 18 तालुके, पुणे जिल्ह्यातील 4 तालुके, रायगड जिल्ह्यातील 2 तालुके, नाशिक जिल्ह्यातील 14 तालुके म्हणजे जवळपास सर्व महाराष्ट्रात दुष्काळाचे थैमान सुरु आहे. जवळपास 19000 गावात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, आमच्या शिवसेनेच्या मित्रांना मला धन्यवाद द्यावयाचे आहेत. सत्तेत सहभागी होण्यापूर्वी शिवसेनेचे तत्कालीन विरोधी पक्षनेते श्री.एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली शिवसेनेची सर्व नेते मंडळी मुख्यमंत्री महोदयांना भेटली होती. तातडीने एकरी 10 हजार रुपये आणि हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत हिवाळी अधिवेशनापूर्वी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना द्यावी, अशा प्रकारची मागणी त्यांनी केली होती. आता त्यांची काय भूमिका आहे, हा त्यांचा प्रश्न आहे. पण आपल्या शब्दाशी त्यांनी प्रामाणिक रहावे. कारण, स्वत:ला ते शिवबांचे शिलेदार समजतात. त्यांनी प्रामाणिकता दाखवावी, अशी आमची विनंती आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले की, नंदुरबार जिल्हा, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, गडचिरोली जिल्हा या आदिवासी भागातील शेतकरी जंगलात राहतो, झाडे, झुडपे खाऊन जगतो. मात्र 4-5 एकराचा शेतकरी हवालदिल होऊन आत्महत्या करतो आणि आपण त्यांना आर्थिक मदत देतो. त्यांना आर्थिक मदत केलीच पाहिजे. शासनाने माणुसकी दाखवलीच पाहिजे. पण आदिवासी भागातील शेतकरी आत्महत्या करीत नाही म्हणून त्यांना मदत करावयाची नाही, ही भूमिका फुले, शाहू, आंबेडकरांच्या तत्त्वाने चालणाऱ्या महाराष्ट्राला शोभण्यासारखी नाही. त्यामुळे याचाही विचार आपण केला पाहिजे.

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे............

सभापती महोदय, जळणाऱ्याला विस्तवाची धग लागते, पण बघणाऱ्याला त्याची धग लागत नाही. सुदैवाने विदर्भात अधिवेशन होत आहे आणि विदर्भाला लागून असलेल्या मराठवाड्याच्या भूमीत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. रोज ही संख्या वाढते आहे. आत्महत्यांच्या बातम्या रोज वर्तमानपत्रात छापून येत आहेत. मराठवाड्याप्रमाणेच विदर्भातील कापूस उत्पादक, सोयाबीन उत्पादक शेतकरी देखील हवालदिल झाला आहे.

यानंतर श्री.मा.शिगम.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे.....

कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याच्या व्यथा मांडताना एका शेतकऱ्याचा कवी असलेला मुलगा म्हणतो की, "कापूस है तो दुनिया कपड़ा पहनती है, फिर क्यों मेरी लाश कफन के लिये तरसती है. हे शेतकऱ्याचे दु:ख आहे. हे असे किती दिवस चालणार आहे ? सी.सी.आय. कॉटन फेडरेशन, नाफेड, कापूस एकाधिकार योजना इत्यादीच्या माध्यमातून कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला मदत मिळत नाही. जी काही थोडी फार मदत कापूस एकाधिकार योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्याला मिळत होती त्या कापूस एकाधिकार योजनेची देखील आता वाट लागलेली आहे. कापूस एकाधिकार योजनेच्या माध्यमातून कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला दिलासा मिळत होता तो देखील या सरकारने आता हिरावून घेतलेला आहे. नापिकीमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. त्याला वेळीच मदत करण्याची आवश्यकता आहे. आग लागली की विहीर खोदणे हा मूर्खपणा आहे. सातत्याने मागील 3 वर्षे महाराष्ट्रामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. जनावरांना चारा नाही, माणसांना पिण्यास पाणी नाही, शेतीला पाणी नाही अशी अवस्था मागील 3 वर्षापासून आहे. सभापती महोदय, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या महाराष्ट्रामध्ये कितीही दुष्काळ पडला तरी चालेल परंतु माणुसकीचा दुष्काळ पडू देता कामा नये आणि ही माणुसकी सरकारने दाखवून शेतकऱ्याला उद्ध्वस्त होण्यापासून वाचविले पाहिजे. सतत पडणाऱ्या दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. जसे येणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी डिझास्टर मॅनेजमेंट केले जाते त्याप्रमाणे दुष्काळाच्या संदर्भात आपण कायमस्वरुपी व्यवस्था का करु शकत नाही ? मूठभर लोकांना लाभ होईल अशा प्रकारच्या योजना करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणे पुसण्याचे काम करु नका. मघाशी मी म्हटल्या प्रमाणे कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याचा मुलगा म्हणतो की, मी कापूस पिकवित असताना देखील कफनसाठी मला तरसावे लागते. यवतमाळ जिल्हयातील कापूस पिकविणाऱ्या दुसऱ्या एका शेतकऱ्याचा मुलगा आपल्या कवितेच्या माध्यमातून असे सांगतो की,

शिक पोरा शिक, शेतकऱ्याच्या पोरा आता लढायला शिक
मरु नको, आता मारायला शिक





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे.....

ज्याला निवडून आणले त्याला पाडायला शिक
शिक पोरा शिक, शेतकऱ्याच्या पोरा आता लढायला शिक

सभापती महोदय, हातामध्ये दगड घेण्याची परिस्थिती का निर्माण झाली, रस्त्यावर उतरण्याची परिस्थिती का निर्माण झाली याचे सत्ताधाऱ्यांनी आत्मचिंतन केले पाहिजे. आमच्या सहकारी भगिनी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या बद्दल मला नितांत आदर आहे. त्या तसेच त्यांच्या बाजूला बसलेले माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर हे शेतकऱ्यांचे मोठे कैवारी आहेत. मी सांगू इच्छितो की, सरकार नवीन असले तरी प्रशासन तेच आहे. या प्रशासनाचे कान तुम्ही का धरत नाही, त्यांच्या कडून काम का करुन घेत नाही ? सतत पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करण्याचा कृती आराखडा शासनाच्या माध्यमातून तयार करुन राज्यात केव्हाही दुष्काळ पडला तरी त्यावर यशस्वीरित्या मात करता येईल, शेतकरी आत्महत्या करणार नाही अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितले की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळी भागात दौरा करीत असताना त्यांनी अनेक गाडयांच्या मागील बाजूस "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" अशी ओळ वाचली. त्याप्रमाणे सरकारने शेतकऱ्याला काही दिले नाही तरी चालेल. पण अशा दुष्काळी परिस्थितीमध्ये "बळीराजा तू भिऊ नकोस, आत्महत्या करु नकोस, हे सरकार तुझ्या पाठीशी आहे" एवढे तरी या सरकारने सांगण्याची आवश्यकता आहे. शेतकरी बँकेच्या कर्जामुळे, सावकाराच्या कर्जामुळे नापिकीमुळे आत्महत्या करीत आहे. या शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहाण्याची हिंमत सरकारने दाखविली पाहिजे. सरकारमधील विविध विभागामार्फत शेतकऱ्याला मदत करण्याची आवश्यकता आहे. वीज विभागाने शेतकऱ्याला विजेचा शॉक न देता त्याचे वीज बिल माफ केले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी भाषणामध्ये सांगितले की, नियती क्रूर असते. पण मी सांगू इच्छितो की, ही नियती कितीही क्रूर असू दे, पण आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या संदर्भात हे सरकार मात्र क्रूर असता कामा नये एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

...3..



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 11:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सदनामध्ये नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, मागील दोन दिवसापासून या सदनामध्ये महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती बाबत चर्चा सुरु आहे. राज्यातील 346 तालुक्यांपैकी 125 पेक्षा अधिक तालुक्यांमध्ये दुष्काळी स्थिती निर्माण झालेली आहे. मराठवाड्यामध्ये 700पेक्षा अधिक गावामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. विदर्भातील एक हजार पेक्षाही अधिक गावामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. पूर्व आणि पश्चिम विदर्भ धरुन हजारापेक्षा अधिक गावामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पूर्व विदर्भाच्या नागपूर भागातील 18 तालुक्यांमध्ये तसेच अमरावती विभागातील 20 तालुक्यामध्ये शेतकरी बांधवांना भीषण दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. सत्तेत येऊन 40 दिवस झालेल्या सरकारकडून विरोधी पक्षाकडून ज्या अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या आहेत त्या अपेक्षांची पूर्तता हे सरकार निश्चितपणे करील असा मला विश्वास वाटतो. मागील 3 वर्षापासून राज्यामध्ये कधी अतिवृष्टी, कधी अवर्षण, कधी अल्प पाऊस तर कधी गारपीट अशा अस्मानी संकटाशी आणि त्यामुळे पडणाऱ्या दुष्काळाशी विदर्भातील शेतकरी सामना करीत आहे. या दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी विविध वर्षी विविध पॅकेजच्या घोषणा झाल्या. नेमीची येतो मग पावसाळा या प्रमाणे दरवर्षी दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याला मदत करण्याची वेळ सरकारवर येत आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे संवेदनशील आहेत. सत्तेत आल्यापासूनच्या 40 दिवसामध्ये त्यांनी अनेक बैठका घेतलेल्या आहेत, अनेक प्रश्न मार्गी लावलेले आहेत.सरकारने सातत्याने पडणाऱ्या दुष्काळाच्या संदर्भात कायमस्वरुपी योजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. वातावरणामध्ये होणाऱ्या बदलामुळे दुष्काळ पडतो आणि त्यामुळे मराठवाडा, विदर्भातील शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. तांत्रिकदृष्टया, वैज्ञानिकदृष्टया सांस्कृतिकदृष्टया प्रगत असलेल्या महाराष्ट्रामध्ये बळीराजाच्या आत्महत्या होत असतील आणि त्यासंदर्भात या सभागृहामध्ये दरवर्षी चर्चा करावी लागत असेल, पॅकेज घोषित करावे लागत असेल, तात्पुरत्या उपाययोजना कराव्या लागत असतील तर महाराष्ट्राच्या प्रतिमेला हे शोभणारे

..4..



श्री. अनिल सोले...

नाही. या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करावी अशी माझी सरकारला विनंती आहे.

सभापती महोदय, आता जी दुष्काळी परिस्थिती राज्यामध्ये निर्माण झालेली आहे त्यासंबंधी तत्काळ मदत घोषित करण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील अधिवेशन संपले की हा विषय संपला असे होता कामा नये. आज भूगर्भातील पाण्याची पातळी खूप खाली गेलेली आहे, राज्यातील सर्व नद्यांचे पाणी प्रदूषित झालेले आहे, पाणी साठवण करणाऱ्या तलावांमध्ये गाळ निर्माण झालेला आहे, वनांची मोठ्या प्रमाणावर कत्तल होत आहे. या सर्वांचा परिणाम वातावरणावर होत आहे.

..नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल सोले......

वातावरणातील बदलाचा फार मोठा परिणाम शेतकऱ्यांवर होत आहे. मी आपल्याला विनंती करु इच्छितो की, यापुढे शासनाकडून एक तंत्रशुध्द पध्दत निर्माण करण्याची गरज आहे. यापुढे या सदनामध्ये दुष्काळाच्या परिणामाची चर्चाच होऊ नये अशी परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. कास्तकार हवालदिल झाल्याशिवाय आत्महत्या करण्यास धजावत नाही. आत्महत्या करणे हे फॅड नाही. जेव्हा माणसाची चारही बाजूने कोंडी होते, कोणताही मार्ग उपलब्ध रहात नाही, आपल्या जीवनाला काही अर्थ उरला नाही असे ज्यावेळी वाटते त्याच वेळी तो माणूस आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

सभापती महोदय, आज वर्धा आणि यवतमाळ जिल्हयात शेकडो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद सरकार दरबारी झालेली आहे. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्त भागात कौन्सिलिंग टीम पाठविण्याची आवश्यकता आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांच्या पाठीवर मायेचा हात फिरविण्याची गरज आहे. त्याला हिंमत देण्याची गरज आहे. या दुष्काळावर सरकारने तातडीने उपाययोजना करण्याची आणि शॉर्ट टर्म व लाँग टर्म धोरण आखण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने मंत्री महोदयांनी घोषणा करावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आतापर्यंत मांडण्यात आलेल्या मुद्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु मराठवाडा, विदर्भ व खानदेश या तीनही भागांमध्ये अत्यंत कमी, उशिरा पडलेला पाऊस यामुळे पीक परिस्थितीची अवस्था बिकट झालेली आहे. दुबार, तिबार पेरणी करूनही पुरेशा पावसाअभावी शेतकरी अडचणीत आलेला आहे. विदर्भात मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. आता मराठवाड्यातही शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे सत्र सुरु झालेले आहे.

सभापती महोदय, वाशिम जिल्हयातील शहादतपूर गावाची लोकसंख्या 413 इतकी असून त्या गावात आतापर्यंत 25 ते 30 शेतमजूर व शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर तातडीने त्या गावाला भेट देऊन आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. यवतमाळ जिल्हयात गेल्या 7 दिवसात 12 शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 66 वर्षांचा काळ लोटला आहे. या पार्श्वभूमीवर आतापर्यंत दुष्काळाच्या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढलेला नाही. आज भूगर्भातील पाण्याची पातळी घटत चालली आहे. पाण्याचे, उपसा सिंचन योजनेचे योग्यप्रकारे नियोजन झालेले नाही. माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी म्हटले की, आमच्या भागातील आदिवासी शेतकरी स्वाभिमानी आहे, तो आत्महत्या करीत नाही. वास्तविक पाहता विदर्भातील शेतकरी सुध्दा स्वाभिमानी आहे. परंतु आज विदर्भाच्या शेतकऱ्यांवर जी परिस्थिती ओढवली आहे, जो प्रसंग ओढवला आहे त्याचा प्रत्यक्ष अनुभव माननीय सदस्यांनी घेतलेला नाही. अन्यथा त्यांनी असे वक्तव्य केले नसते अशी माझी धारणा आहे.

सभापती महोदय, गेल्या 3 वर्षापासून महाराष्ट्रावर सातत्याने दुष्काळाचे सावट पडलेले आहे. गारपीट, अतिवृष्टी, अल्पवृष्टीमुळे शेतकरी अडचणीत आलेले आहेत. तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार साहेबांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्राला मोठी आर्थिक मदत मिळवून दिली होती. आज राज्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे आणि केंद्रामध्ये देखील त्याच पक्षाची सत्ता आहे. भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी विरोधी बाकावर असताना शेतकऱ्यांबद्दल मोठा जिव्हाळा दाखविला होता. शिवसेनेच्या सदस्यांनी विरोधी पक्षात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया................

असतानाही चांगले काम केले. 24 दिवसांच्या काळात राज्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केला होता. त्याची नोंद घेऊनच भारतीय जनता पक्षाने शिवसेनेला सत्तेमध्ये सामील करुन घेतले. कारण त्यांना कल्पना होती की, आपल्या पक्षात दुष्काळग्रस्त भागात फिरणारे कोणी नाही. त्याचा परिणाम म्हणून शिवसेनेला सरकारमध्ये सहभागी होता आले.

सभापती महोदय, मी प्रामुख्याने तीन मागण्या करणार आहे. कापसाला 6500 रुपये प्रती क्विंटल दर दिला जावा. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्यांच्या वारसांना सरकारतर्फे 5 लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी. राज्यात कापूस पणन महामंडळाने 64 कापूस खरेदी केंद्रे सुरु केली आहेत ती अपुरी पडत असल्यामुळे खरेदी केंद्रांची संख्या 150 पर्यंत वाढविण्यात यावी. मध्यंतरी वृत्तपत्रात एक बातमी प्रसिध्द झाली होती. कापसाला बोनस जाहीर करु असे माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. या संदर्भात मी असे सांगू इच्छितो की, कापसाला बोनस जाहीर करुन काही उपयोग होणार नाही. कारण कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला माल खाजगी व्यापाऱ्यांना विकला असल्यामुळे बोनसचा फायदा त्या खाजगी व्यापाऱ्यांना होईल आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडणार नाही.

सभापती महोदय, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत विशेष निकष लावून शेतीच्या कामामध्ये शेतमजुरांना काम देण्यात यावे आणि त्यांनाच पैसे द्यावेत. शेतमजुरीचा दर 50 टक्के वाढवून दिला तर शेतकऱ्यांचे भले होईल आणि नरेगा योजनेचा निधी प्रत्यक्षपणे शेतकऱ्यांच्या कामासाठी वापरता येईल. धान उत्पादक शेतकऱ्यांचे यावर्षी फार मोठे नुकसान झाले आहे. केंद्र सरकारने आधारभूत किंमतीमध्ये 50 टक्के वाढ केली आहे, ही वाढ अत्यंत अपुरी आहे. राज्य सरकारकडून प्रती क्विंटल 200 रुपये बोनस दिला जात होता. ही बोनस देण्याची योजना बंद झालेली असून ती पुन्हा सुरु करावी अशी मी मागणी करतो. धानाची आधारभूत किंमत पुन्हा नव्याने निश्चित करण्यात यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार साहेबांनी 2006 मध्ये राज्यातील सर्व शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी केली होती. तसा निर्णय यावर्षी सुध्दा जाहीर करण्यात यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतकऱ्यांसाठी शासनाने जाहीर करावयाचे आर्थिक मदतीचे पॅकेज याबाबत अनेक वक्त्यांनी आपापले मुद्दे मांडले आहेत. मी एका महत्वाच्या गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. निसर्ग आणि पावसाचा दुष्काळाशी फार जवळचा संबंध नाही. शासनाने 1994 साली महाराष्ट्रामध्ये 87 तालुके कायमस्वरुपी अवर्षणग्रस्त असल्याचा अहवाल दिलेला आहे. आज 20 वर्षांचा कालावधी उलटूनही त्यामध्ये काही बदल झालेला नाही. परंतु पावसाच्या अंदाजामध्ये फार मोठा बदल झाला आहे. त्यामुळे पुन: सर्वेक्षण करुन अवर्षणग्रस्त तालुक्यांची संख्या निश्चित करण्यात यावी व त्या संदर्भात ठोस उपाययोजना करण्यात यावी.

नंतर आय.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामहरी रुपनवर ........

दुष्काळाच्या संदर्भात आपण केवळ मराठवाडा आणि विदर्भाचा उल्लेख करतो पण पश्चिम महाराष्ट्रामध्ये 25 तालुके असे आहेत की तेथे 12 महिने व 18 काळ सरासरीपेक्षा देखील कमी पाऊस पडत असतो पण त्या भागातील शेतकरी त्या परिस्थितीशी मिळते-जुळते घेत असल्याने त्या भागातून तक्रारी येत नाहीत. वास्तविक या तालुक्यांमध्ये आज एवढी बिकट अवस्था आहे की, दुधाचा धंदा पूर्णत: कोलॅप्स झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या न करण्याचे कारण म्हणजे त्याच्याकडे शेतीला जोड म्हणून दुधाचा व्यवसाय होता पण आज याच दुधाचे दर 25 रुपयावरुन 18 रुपयावर आलेले आहेत. माझा स्वत:चा दूध संघ असून आम्ही तेथे फलक लावला आहे की, कोणीही दूध आणू नये. पूर्वी दुधासाठी आम्ही शेतकऱ्यांना आगाऊ रकमा देत होतो. पण आज अशी परिस्थिती निर्माण होण्याचे कारण म्हणजे केंद्र सरकारने दुधाच्या भुकटीवर बंदी घातलेली आहे. त्यामुळे लाखो लिटर दूध ॲक्सेस झालेले आहे, त्या दुधाचे काय करावयाचे हा प्रश्न शेतकऱ्यासमोर पडला आहे. दुधाच्या उत्पादनासाठी प्रयत्न करावयाचे, शेतकऱ्यांना गायी आणि चाराही पुरविला पाहिजे. पण सरकार मात्र या शेतकऱ्याला मदत करण्यास तयार नाही. एक वेळ निसर्गाचा पाऊस पडला नाही हे समजू शकतो पण शासनाच्या धोरणामुळे अथवा चुकीच्या निर्णयामुळे शतकऱ्यांना अशा परिस्थितीला तोंड देण्याची वेळ येत असेल तर ते चुकीचे आहे. सभागृहात चर्चेच्या दरम्यान असे सांगण्यात आले की, पाण्याची बाटली 20 रुपयाला आणि दुधाची बाटली मात्र फक्त 15 रुपयाला अशी आज राज्याची परिस्थिती असून शासनाने यात तातडीने बदल केला पाहिजे.

महोदय, मागील वर्षी देखील दुधाच्या भुकटीवर केंद्र शासनाने अशीच बंदी घातली होती त्यावेळेस मोठा हल कल्लोळ झाला होता पण आदरणीय श्री. शरद पवार हे केंद्रात कृषी मंत्री असल्याने त्यांनी तातडीने ही बाब केंद्राच्या लक्षात आणून दिली आणि त्यातून मार्ग काढला. खरे तर आपल्या राज्यातील दुधाच्या भुकटीची क्वॉलिटी चांगली असल्याने संपूर्ण जगातून त्याला मागणी आहे पण तरी देखील अशी निर्यातबंदी करणे योग्य नाही, त्याचाही शासनाने विचार करावा अशी माझी मागणी आहे.

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामहरी रुपनवर ........

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रात सर्वात महत्वाचे व उत्पादनाचे पीक म्हणजे कांदा पण त्याच्या निर्यातीस देखील बंदी घालण्यात आली आहे. त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातील दुसरे महत्वाचे पीक डाळिंबाचे आहे. पण त्यावर देखील "तेल्या" नावाचा रोग पडल्याने शेतकऱ्यांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे अधिकार शासनाकडे असताना शासन तसा योग्य निर्णय घेत नाही, ही खेदाची बाब आहे. सभागृहात दुष्काळ व त्यावरील चर्चा हा विषय आता कायमचाच झालेला आहे पण त्यासंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना मात्र आखल्या जात नाहीत, त्याचाही विचार होणे आवश्यक आहे.

महोदय, उद्योग आणि एलबीटीच्या संदर्भात शासन ज्याप्रमाणे धोरण ठरवून कायमस्वरुपी निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहे तसाच निर्णय दुष्काळाच्या बाबतीत देखील घ्यावा. आज जो शेतकरी या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो तोच मोडण्याची वेळ आली असून दरवर्षीच ही मागणी होत आहे, काल आपल्याकडून होत होती आणि आज आमच्या बाजूने होत आहे म्हणून माझी अशी विनंती आहे की, यातील राजकारण बाजूला ठेवून विचार करावा व शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन त्याबाबतचे धोरण ठरविणे आवश्यक आहे व त्यासाठी विशिष्ट तरतूद करणे आवश्यक आहे. असा निर्णय घेत असताना विदर्भ, मराठवाडा किंवा पश्चिम महाराष्ट्र अशा प्रकारचा भेदभाव न करता प्रत्येक विभागातील प्रश्नाचे स्वरुप वेगवेगळे असते त्या सर्व बाबींचा विचार करुन सर्वंकष असा निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच दुग्ध व्यवसाय जो शेतीसाठी पूरक आहे त्याला उद्योगाचा दर्जा देऊन योग्य प्रकारे नियोजन केले तरच यातून मार्ग काढता येईल आणि त्यावर कायमस्वरुपी मार्ग निघू शकेल आणि ते शासनाने करावे अशी मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------

........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>माननीय ऊर्जा मंत्र्यांनी वाहिनीवर केलेल्या वक्तव्यासंबंधी हरकतीच मुद्दा.</u>**

श्री. सुनील तटकरे : महोदय मी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु असताना या चर्चेला माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय महसूल मंत्री उत्तर देणे अपेक्षित आहे. पण काल एका विषयावर बोलत असताना माननीय ऊर्जा मंत्र्यांनी सांगितले होते की, दुष्काळाच्या संदर्भातील नस्ती अजून खालच्या स्तरावर आहे. म्हणजे यासंदर्भातील खुलासा होणे आवश्यक आहे की, शासनाच्या कक्ष अधिकाऱ्याकडे किंवा त्याखालील टेबलवर ही नस्ती आहे की केंद्र सरकारमध्ये आपली पत संपलेली आहे त्यामुळे ही नस्ती तशीच पडून राहिली आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा रोख माझ्या माहितीप्रमाणे वाहिनीच्या संदर्भातील आहे, त्यासंदर्भात मला सभागृहात विचारण्यात आले होते की, राज्यात दुष्काळ जाहीर केलेला नसल्यामुळे केंद्राकडून निधी देण्याचा प्रश्न नाही, असे केंद्रीय कृषी मंत्र्यांनी सांगितले. त्यावर मी सांगितले होते की आम्ही 19 हजार गावांमध्ये दुष्काळ जाहीर करुन ही संपूर्ण नस्ती केंद्र सरकारकडे गेली आणि केंद्र शासनाचे संबंधित अधिकारी 14 तारखेला राज्यात येऊन सर्व्हेक्षण करतील व त्यानंतर सादर केलेल्या अहवालाच्या आधारे केंद्रीय कृषी मंत्री निधी जाहीर करतील असे माझ्या सांगण्याचे तात्पर्य होते. पण माझ्या या बोलण्याचा विपर्यास करण्यात आला व गैरसमजामुळे तसे वर्तमान पत्रातून छापून आले आहे.

श्री. सुनील तटकरे : वर्तमानपत्रात छापून आल्यानुसार आपण बोलला नसाल तर संबंधित वर्तमान पत्रावर आपण हक्कभंग दाखल करणार काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ लावून केवळ गैरसमजातूनच हे छापून आलेले आहे.

श्री. भाई जगताप : महोदय, वाहिनीवर मंत्री महोदय जे बोलले तेच दाखविले जात आहे आणि त्यांनी जी वाक्ये वापरली तीच दाखविली जात आहेत. तसेच हे संपूर्ण दृश्य स्वरुपात असल्याने मंत्री महोदय सांगत आहेत तसे म्हणता येणार नाही. माझी आपणास अशी विनंती आहे

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ......

की, वाहिनीवरील बातमी आपण स्वत: पहावी आणि नंतरच उत्तर द्यावे. राज्यात पडलेल्या दुष्काळाच्या संदर्भात राज्यातील व केंद्रातील सरकार किती गंभीर आहे हेच यातून दिसून येते. कारण केंद्रातील मंत्री सांगत आहेत की, महाराष्ट्रात दुष्काळच जाहीर केलेला नसल्याने मदत देऊ शकत नाही आणि आपले मंत्री म्हणतात की, राज्यात दुष्काळ जाहीर करुन केंद्राकडे पाठवून, याचा अर्थ आम्ही पहिल्याच दिवसापासून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करीत असून शासनाने अद्यापही दुष्काळ जाहीर केलेला दिसत नाही. दुष्काळी परिस्थितीत देखील राज्यातील शेतकऱ्याची अशा प्रकारे चेष्टा मंत्री महोदय करीत असतील तर ते राज्याला भूषणावह नाही.

श्री. हेमंत टकले : महोदय, कालपासून सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु असून त्याबाबत शासनाचे काय म्हणणे आहे हे उत्तरातून येणारच आहे. पण त्यापूर्वीच प्रसार माध्यमातून राज्य मंत्रिमंडळातील सदस्यांनी वेगवेगळी विधाने करणे आणि त्याचा कोठेही ताळमेळ नसणे व सभागृहात आल्यानंतर सांगण्यात येते की, माझ्या विधानाचा विपर्यस्त अर्थ काढला जातो. हे खरे असेल तर त्या वाहिनीविरुध्द हक्कभंग आणणार आहात काय याचेही स्पष्ट उत्तर हवे आहे.

........जे-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जे पूर्वी सत्तेत होते त्यांना दुष्काळ जाहीर करण्याची पद्धत माहीत आहे. दुष्काळासंबंधी केंद्र सरकारने नियम आखून दिलेले आहेत, पद्धती आखून दिलेली आहे. राज्याने दुष्काळसदृश परिस्थिती संबंधातील अहवाल केंद्र शासनाला पाठवावयाचा असतो. त्यांचे पथक आल्यानंतर त्यांच्याकडून दुष्काळ जाहीर केला जातो ही पद्धत आहे. या शासनाने जे काही काम केले आहे ते मी आपल्या मुद्दाम निदर्शनास आणतो. दुष्काळसदृश्य परिस्थिती पाहण्यासाठी पंचनामे करावे लागत होते. त्यात दोन-तीन महिन्यांचा कालावधी जायचा. गेल्या वेळी जी परिस्थिती होती त्यावेळी आपणाला पंचनामे करण्यासाठी 3 महिन्यांचा कालावधी लागला. त्यानंतर मग केंद्राकडे अहवाल पाठवला जात असे. यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केंद्र शासनाला या सर्व गोष्टी टाळण्याची विनंती केली. ती विनंती मान्य केल्यामुळे 19000 गावात दुष्काळसदृश परिस्थिती असल्याचे जाहीर करण्यात आली. ती नस्ती केंद्र शासनाकडे गेली आहे. आता एका महिन्यामध्ये केंद्र शासनाचे पथक येत आहे. त्याला पूर्वी चार महिन्यांचा कालावधी लागायचा. तेव्हा या सरकारने तडफेने पावले उचलली आहेत. पूर्वी आपण तसे करायला पाहिजे होते. हे त्यावेळी देखील आपल्या सरकारला करता आले असते. पण हे काम आता आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. राज्य शासनाकडून तातडीने अहवाल गेल्यामुळे येत्या 14 तारखेला केंद्र शासनाचे पथक राज्यात येत आहे. यावेळी पंचनामे न करता सगळीच्या सगळी 19000 गावे दुष्काळसदश म्हणून घोषित करुन तत्संबंधातील अहवाल केंद्र शासनाला पाठविला आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी केंद्र शासनाकडे प्रस्ताव गेला असून केंद्र शासन दुष्काळ जाहीर करणार असल्याचे सांगितले आहे. आपल्या राज्यात दुष्काळ जाहीर करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. तो अधिकार केंद्र शासनाला नाही. आमचा अहवाल केंद्र शासनाकडे गेल्यानंतर केंद्र सरकार दुष्काळ जाहीर करील असे सन्माननीय श्री.रावते साहेबांनी सांगितले आहे. केंद्रीय कृषी मंत्री लोकसभेच्या सभागृहात सांगतात की, हरियाणा राज्याने दुष्काळ जाहीर केला. त्यामुळेच माझी हरकत आहे. दुष्काळ जाहीर करण्याचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

अधिकार हा राज्य सरकारला आहे. तो अधिकार केंद्र सरकारला नाही. किती महिन्यांनी पथक येणार आहे हा काही आजचा चर्चेचा विषय नाही. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळणे हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. तेव्हा यासंबंधी वेगळे काही बोलून विनाकारण वेगळी बाजू मांडण्याचा प्रयत्न करू नये. काल सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे दूरचित्रवाणीच्या वाहिनीवर बोलत असताना म्हणाले की, 50 टक्के वीज माफी आम्ही देणार आहोत. हा सुद्धा विशेषाधिकाराचा भंग आहे. हे आपणाला सभागृहामध्ये घोषित करायला पाहिजे होते. वाहिनीवर त्यांनी स्पष्टपणाने सांगितले की, 50 टक्के वीज बिलामध्ये माफी देण्यात येणार आहे. सभागृहामध्ये माननीय महसूल मंत्री, माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत की, माननीय ऊर्जा मंत्री यासंबंधातील भूमिका मांडणार आहेत हे सुद्धा स्पष्ट होणे गरजेचे आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, येथे दोन ज्येष्ठ,जबाबदार माननीय मंत्र्यांनी काही वक्तव्ये केलेली आहेत. त्यांनी सरकारची तत्परता दाखवताना या सरकारने नुकसानाचे पंचनामे न करण्याचे ठरविले असल्याचे सांगितले. त्यांनी पंचनाम्याची अडचण दूर केली आहे. त्याचे आम्ही स्वागत करतो. आता सभागृहात माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे (पाटील) नाहीत. आपल्या मार्फत मला एका गोष्टीकडे सदनाचे लक्ष वेधावयाचे आहे. एका महिला तलाठीने शेतकऱ्याचे नाव दुष्काळग्रस्तांच्या यादीमध्ये येण्यासाठी पैसे घेतल्याचे स्टिंग ऑपरेशन देखील याच वाहिनीने केले आहे. आपण जे काही म्हणत आहात ते सर्व वाहिनीवर दिसत आहे. त्यामुळे वाहिनीवर केलेल्या वक्तव्याचा देखील विशेषाधिकाराचा भंग होऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जे वक्तव्य केले आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आणि भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, माझ्या विभागामार्फत कृषी संजीवनी योजनेला मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव कॅबिनेट समोर घेऊन जाणार आहोत असे सांगितले होते. मी कुठेही असे म्हटलेले नाही की, वीज बिल माफ करण्यात येईल. मला विचारण्यात आले होते की, आपण काय करणार आहात ? त्यावेळी आम्ही कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय घेऊ असे सांगितले होते. ती फाईल केंद्र शासनाकडे गेली आहे आणि 14 तारखेला पथक येत आहे. यामध्ये समजण्यात काही तरी फरक झ ाालेला आहे. एवढेच यातील गांभीर्य आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ

**मु.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, या विषयावर सर्वश्री माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, धनंजय मुंडे, शरद रणपिसे, राजेंद्र मुळक, चंद्रकांत रघुवंशी, अमरसिंह पंडित, आनंदराव पाटील, रामहरी रुपनवर, अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरू.....

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कालपासून या सभागृहामध्ये दुष्काळावर गंभीरपणाने चर्चा सुरू आहे. दुष्काळ हा काही आज पहिल्यांदा आलेला नाही. या महाराष्ट्रामध्ये दर दोन वर्षांनी शेतकऱ्यांवर अशी आपत्ती येते. त्यावर थातूरमातूर इलाज करून तो काळ निभावला जातो. मी आपला फार वेळ घेणार नाही. मी फक्त 2-3 गोष्टीच सांगणार आहे.

यंदाच्या वर्षी महाराष्ट्रामध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हा वेगळ्या पद्धतीचा दुष्काळ आहे. अजिबात पाऊस न पडल्यामुळे दुष्काळ निर्माण होतो. काही वेळा अतिवृष्टी प्रचंड झाल्यामुळे ओला दुष्काळ निर्माण होतो. यंदाचा महाराष्ट्रातील दुष्काळ अनियमित पाऊस झाल्यामुळे निर्माण झालेला आहे. सुरूवातीला बऱ्यापैकी पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापसाची पेरणी केली. नंतर पाऊस उघडला. त्यामुळे शेतकऱ्यांची पहिली पेरणी मोडित निघाल्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. त्यानंतर पाऊस उघडझाप करीत होता. त्यामुळे सोयाबीनसह कापसाचे पीक देखील नष्ट झाले. विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये कापूस पिकतो. ते पीक दिसायला लागल्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी त्यावर खर्च केला. फवारणी केली, खते टाकली. अर्ध्यावर पीक आल्यानंतर पुन्हा पावसाने पाठ फिरवली. त्यानंतर मात्र पुन्हा पाऊस आला नाही. त्यामुळे कापसाचे पीक देखील करपले. शेतकऱ्यांनी खत टाकले होते, महागडे बियाणे टाकले होते. पण पीक मात्र शेतकऱ्याला मिळाले नाही. त्यामुळे राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेल्या दोन महिन्यामध्ये 300 च्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे या सरकारचे पाप नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की, यात कोणीही राजकारण करू नये. ही जबाबदारी जशी आमची आहे तशी आपली देखील आहे. सभागृहाने याचा गांभीर्याने विचार करून महाराष्ट्रावरील दुष्काळाचा जो कलंक आहे तो कशा पद्धतीने पुसला जाईल त्या दृष्टीने चर्चा झाली पाहिजे. येथे कोणत्याही प्रकारचे राजकीय भाषण करून सोल्युशन निघणार नाही. 300 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या हे पाप आमचे नाही. ते आपले पाप आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवरु उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्हाला सत्तेवर येऊन केवळ 40 दिवस झाले आहेत. खरे म्हणजे आता ज्या काही आत्महत्या झालेल्या आहेत त्या 40 दिवसाच्या आत झालेल्या आहेत. ज्या प्रमाणे बटन दाबल्यानंतर लाईट लागतो त्या प्रमाणे हा प्रश्न सुटू शकूणार नाही. ही परिस्थिती फार पूर्वीपासून निर्माण झालेली आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या सभागृहात कालपासून दुष्काळावर अतिशय गांभीर्यपूर्वक चर्चा सुरु आहे. विरोधी बाकावरुन राजकारण करणारे एक वाक्यही बोलले गेले नाही. माननीय फुंडकरसाहेबांची अवस्था सांगताही येत नाही आणि सहनही करता येत नाही अशी झालेली आहे. माननीय फुंडकरसाहेब दु:खाच्या पोटी,वैफल्याच्या पोटी ते ज्या पध्दतीने बोलत आहेत ते आश्चर्यकारक आहे. विरोधी पक्षाने दुष्काळावर राजकीय अभिनिवेश ठेवून एक वाक्यही ऊच्चारलेले नाही हे आपण प्रोसिडींग काढून बघू शकता. आपल्या सारख्या ज्येष्ठ सदस्यांकडून आम्हाला अशा प्रकारच्या अपेक्षा नाहीत. या ठिकाणी भाजपचे कोणी ज्येष्ठ सदस्य असते तर मी तुमच्या दुखऱ्या बाबीवर बोललो असतो. परंतु आम्हाला आता हा विषय वाढवावयाचा नाही. आपण कृपया तारतम्य बाळगून बोलावे अशी आमची आपल्याला विनंती आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर हे ज्येष्ठ सदस्य असून त्यांनी विरोधीपक्ष नेते म्हणूनही काम केलेले आहे. ते जेव्हा विरोधी पक्ष नेते होते त्यावेळेस त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात, संवेदनशील पध्दतीने शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या होत्या परंतु ते सत्ताधारी बाकावर गेल्याबरोबर सर्व संवेदना हरवून बसले आहेत. दुष्काळाच्या संदर्भात आम्ही राजकारण करीत आहोत असा जो उल्लेख करीत आहात तो बरोबर नाही. आम्ही जेव्हा दुष्काळसदृश्य स्थिती असा शब्दप्रयोग केला होता त्यावेळेस आपण केलेली भलीमोठी भाषणे आजही आमच्याकडे आहेत. सरकारने दुष्काळ जाहीर करावा, पॅकेज जाहीर करावे यासंदर्भात विरोधी पक्ष सातत्याने मागणी करीत आहे. आमच्या भाषणात आम्ही दुष्काळाच्या संदर्भात राजकीय भाषण केले नाही. आपण जेव्हा विरोधी बाकावर होता तेव्हा आम्ही नवीन सदस्य म्हणून आपल्याकडून शिकत होतो. त्यामुळे दुष्काळाच्या प्रश्नावर राजकीय भाष्य करुन बळीराजाच्या जखमेवर मीठ चोळू नये एवढीच आमची विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर हे ज्येष्ठ सदस्य असून त्यांनी विरोधी पक्ष नेते म्हणून काम केलेले असल्यामुळे माझी त्यांना विनंती आहे की, या गांभीर्यपूर्वक चाललेल्या चर्चेमध्ये त्यांनी ज्या पध्दतीने या ठिकाणी रिमार्क्स पास केले आहेत ते आपण स्वत:हून मागे घ्यावेत. आपण या चर्चेमध्ये कोणत्याही प्रकारे राजकीय अभिनिवेश आणता कामा नये अशी माझी त्यांना विनंती आहे. जर त्यांनी ते शब्द मागे घेतले नाही तर माननीय सभापती महोदयांनी ते शब्द इतिवृत्तातून काढावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्या एका वाक्यामुळे सन्माननीय सदस्यांची मने दुखावली गेली असतील तर मी माझे ते वाक्य मागे घेतो.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगत होतो की, या वर्षी अतिवृष्टी झाली नाही तसेच अजिबात पाऊसही पडला नाही अशी स्थिती यावर्षी नाही. हे वर्ष शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय गंभीर असे वर्ष आहे. पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्याच्या खिशातील पैसे खर्च झाले परंतु शेतकऱ्याच्या खिशात पैसे आले नाहीत. ज्यावेळेला ही स्थिती निर्माण झाली त्यावेळेला नजरअंदाज आणेवारी काढण्याची प्रक्रिया सुरु झाली. नजरअंदाज आणेवारी काढल्यानंतर शेतकऱ्याच्या हातात काहीच पीक आले नाही असे लक्षात आले. त्यामुळे 50 टक्क्याच्या आत आणेवारी आली पाहिजे अशा पध्दतीची शेतकऱ्यांची मागणी सुरु झाली. काही ठिकाणी आणेवारी 50 टक्क्याच्या वर गेली तर काही ठिकाणी आणेवारी 50 टक्क्याच्या आत आली. नजरअंदाज आणेवारीचा अंदाज आला त्यावेळेला मराठवाडा, खानदेश आणि विदर्भामध्ये 19000 गावांची आणेवारी 50 टक्क्याच्या आत आल्यामुळे दुष्काळाचे गांभीर्य बाहेर आले.

सभापती महोदय, महाराष्ट्राला दुष्काळ नवीन नाही. आतापर्यंतचे नागपूर अधिवेशनाचे प्रोसिडींग काढले तर गेल्या 20 वर्षापासून नागपूर अधिवेशनामध्ये दुष्काळावर चर्चा झाल्याचे आपल्याला दिसून येईल. या सभागृहात मी 12 वर्षापासून काम करीत असून, विधानसभेतही दोनवेळा निवडून गेलो होतो. लोकसभेतही मी काम केलेले आहे. गेल्या 25 वर्षापासून महाराष्ट्रात दुष्काळाचे चक्र सुरुआहे. महाराष्ट्रात कधी अतिवृष्टी होते,गारपीट होते, कधी पाऊस पडत नाही

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

तर कधी रोगराई येते व या कारणामुळे महाराष्ट्रातील शेतकरी उद्ध्वस्त होत चालला आहे. आपल्या महाराष्ट्रात आतापर्यंत जवळपास 15 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचे भाषण सुरु होते त्यावेळेस मी ते काळजीपर्वूक ऐकत होतो. त्यांनी दुष्काळाच्या संदर्भात शेतकऱ्यांची सत्य परिस्थिती या सभागृहात मांडली. बाळापूर तालुका हा माझ्या मतदारसंघाच्या जवळचा तालुका आहे. बाळापूर तालुक्यातील एका शेतकऱ्याने स्वत:चे सरण स्वत: रचून ते सरण पेटवून त्या सरणात जाऊन बसला व क्षणात त्या शेतकऱ्याचा कोळसा झ ाला. आत्महत्येचे एक वेगळे उदाहरण या महाराष्ट्राला पहायला मिळाले ते आमचे दुर्दैव आहे. ज्यावेळेस मी 1978 मध्ये विधानसभेत होतो त्यावेळेस दुष्काळावर चर्चा सुरु असताना सुकथनकर समितीची घोषणा करण्यात आली. सुकथनकर समितीने महाराष्ट्रातील 84 तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले होते. त्यानंतर यासंदर्भात वेगवेगळया समित्या नेमल्या, त्यांनी अहवालही दिले परंतु त्या समित्यांचे अहवाल धूळ खात कोठे पडले ते आम्हाला समजले नाही. या वर्षाचा दुष्काळ अतिशय गंभीर आहे. दुष्काळाच्या संदर्भात सरकार कोणते निर्णय घेणार आहे हे मंत्री महोदयांच्या भाषणातून समजून येईल. दुष्काळाच्या संदर्भात राज्य सरकारने केद्र सरकारला अहवाल दिल्याबरोबर केंद्र सरकारचे पथक 14 डिसेंबरला येणार आहे.

सभापती महोदय, आपल्या सर्वांना कल्पना आहे की, 15 डिसेंबर रोजी शेवटची आणेवारी आल्याशिवाय सरकारला कोणताही निर्णय घेता येत नाही. त्यामुळे आम्ही 15 डिसेंबरची वाट पाहत आहोत. 15 डिसेंबर उलटल्यानंतर आम्ही सरकारला सांगू की, आता पथक येऊन गेले,15 डिसेंबर उलटून गेला, शेतकऱ्याच्या शेताची आणेवारी 50 टक्क्याच्या आत आल्यामुळे शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची आवश्यकता आहे. दुष्काळाच्या माध्यमातून शेतकऱ्याला ज्या काही सवलती द्यावयाच्या असतील त्या सवलती तातडीने या वर्षी दिल्या जाव्यात.

सभापती महोदय,माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती राहणार आहे की, सरकारने दुष्काळाच्या संदर्भात पुन्हा एकदा एक समिती गठीत करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील दुष्काळाचे चक्र थांबणार नसेल तर पुन्हा एकदा एखादी समिती गठित करण्याची आवश्यकता आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

आता राज्यातील 84 तालुक्यांपुरता दुष्काळ मर्यादित राहिलेला नाही. दुष्काळाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पुन्हा नव्याने या महाराष्ट्राचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आता निसर्गही बदलत चालला आहे. बदलता निसर्ग आणि कायम दुष्काळी तालुक्याच्या संख्येत होणारी वाढ यासंदर्भात पुन्हा एकदा फेर तपासणी होण्याची आवश्यकता आहे. यासाठी दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची समिती नेमण्यात यावी तसेच या समितीमध्ये राज्यातील कायम दुष्काळी तालुके किती आहेत याचा अधिक विचार न करता दुष्काळावर कायमची मात कशी करता येईल यावर विचार झाला पाहिजे व त्यासंदर्भातील अहवाल शासनाला द्यावा आणि शासनाने त्या पध्दतीने पावले उचलली तर महाराष्ट्रातील दुष्काळ कायमचा संपण्यात मदत होऊ शकेल.

सभापती महोदय, प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांचे भाषण मी मनापासून ऐकले आहे. माननीय कवाडे साहेब संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत असतात. ते शेतकऱ्यांमध्ये आणि दलितांमध्येही जात असतात. माझ्या जिल्हयात गेल्या महिन्याभरात 40 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्येची कारणे समजत नाहीत. मुलीचे लग्न होत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करतो आहे, पीक गेले म्हणून आत्महत्या करीत आहे. शेतकरी शेताच्या बांधावर जाऊन आत्महत्या करीत आहेत. मागील महिन्यात दीड एकरवाल्या शेतकऱ्याने गहू लावला होता परंतु गव्हावर गारपीट झाल्यामुळे या शेतकऱ्याने बांधावर जाऊन आत्महत्या केली. शेतकरी आत्महत्या का करीत आहे याची कारणे शोधण्याची गरज आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

विदर्भात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या झाल्या म्हणून त्या भागाकरिता 3750 कोटी रुपयांचे पंतप्रधान पॅकेज जाहीर करण्यात आले. परंतु हे पॅकेज जाहीर करुनही त्या भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. तेव्हा आता शेतकरी आत्महत्या का करतो याचे कारण शोधण्याची गरज आहे. त्यासाठी शासनाने ताबडतोब उपाययोजना करुन हा महाराष्ट्र आत्महत्यामुक्त करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, दुष्काळा संदर्भात सरकारकडून घोषणा करण्यात येईल. या ठिकाणी माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील उपस्थित आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, आपणास कापसाला बोनस द्यायचा असेल तर तो क्विंटलवर देण्यात येऊ नये. कारण आज शेतकऱ्यांच्या घरातील कापूस व्यापाऱ्यांनी विकत घेतला आहे. आज सीसीआयमध्ये कापूस विकला जात आहे तो कापूस शेतकरी घालत नसून तो कापूस व्यापारी घालत आहे. माझे गाव कॉटनसाठी आशिया खडांत प्रसिद्ध आहे. सीसीआयची दोन केंद्रे माझ्या भागात सुरु आहेत. मी सीसीआयच्या केंद्रावर गेलो त्यावेळी तेथे व्यापाऱ्यांकडील कापूस विकला जात असल्याचे पाहिले. तेव्हा आज आपण क्विंटलवर कापसाला बोनस दिला तर तो बोनस शेतकऱ्यांना न मिळता व्यापाऱ्यांच्या खिशात जाईल. आपणास शेतकऱ्यांना बोनस द्यायचा असेल तर तो हेक्टरी बोनस जाहीर करावा. आपण 7/12 उताऱ्यावर बोनस जाहीर केला तर तो शेतकऱ्यांच्या खिशात जाईल. अन्यथा आपण बोनस जाहीर करुन काही उपयोग होणार नाही. तेव्हा याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे. आज सीसीआय 4500 रुपये दराने कापूस खरेदी करीत आहे. हा दर वाढवून द्यावा अशी मी मागणी करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री राजेंद्र जैन(भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, नियम 260 के प्रस्ताव पर बोलने के लिए आपने मुझे मौका दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

सभापति महोदय, पिछले दस वर्षों में इस विदर्भ में निसर्ग का प्रकोप आया. सदन के सभी सम्माननीय सदस्यों ने किसान के प्रति अपनी भावना व्यक्त की. सभी के मन में किसानों के प्रति दुख है. सभी ने अपने अपने आँकड़े दिए और सरकार ने क्या करना चाहिए, वह बताया. लेकिन एक बात समझ में नहीं आती हैं कि जब विरोधी पक्ष में रहकर आदरणीय श्री दिवाकर रावते जी और श्री विनोद तावडे जी भाषण किया करते थे और किसानों की समस्याएं हाऊस में पेश करते थे और अब सरकार में जाने के बाद, उन्होंने केवल इतना ही काम कर दिया कि विपक्ष में बैठकर जितनी बात उन्होंने कही थी, उस बारे में सरकार में बैठकर किसानों के बारे में निर्णय ले लिया तो किसानों की आत्महत्याएं होना रुक जाएगी और किसानों को बहुत बड़ी राहत पहुंचेगी. जब हम विरोधी पक्ष में बैठकर बातें करते हैं और विरोधी पक्ष को यशस्वी रुप से रख रहे है तो आप कहते है कि हमारी सरकार 60 दिन की है, 40 दिन की है और केंद्र की सरकार केवल 180 दिन की है. "श्री मोदी जी की सरकार, किसानों की सरकार" आप रोज हमको टी.व्ही. पर दिखाते थे. अब अच्छे दिन आने वाले है. एक से एक ॲडव्हरटाईजमेंट बनाकर जनता को दिखाया गया. महोदय, जब राजा बनता है तो वह राजा एक दिन का हों, 40 दिन का हों या छ: महीने का हों, राजा की जबाबदारी होती है कि वह प्रजा को संभाले, प्रजा की बात सुने. उसको यह बात बताने की जरूरत नहीं कि तिजोरी खाली है. घर चलाने वाले की जबाबदारी होती है कि वह व्यवस्था करें. यदि किसान आत्महत्या कर रहा है तो सरकार को जबाबदारी लेनी पड़ेगी. अच्छे दिन तो धान उत्पादक किसानों के आए हैं. धान उत्पादक किसानों के लिए भारतीय जनता पार्टी ने बड़े बड़े मोर्चे हमारे जिले में निकाले. भंडारा, गोंदिया, चंद्रपुर और वर्धा में मोर्चे निकाले गए. सम्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस जी वरिष्ठ सदस्य है, उन्हें सब पता है. बड़े बड़े मोर्चे निकाले गए और इन मोर्चे के आधार पर उन किसानों ने आपको मतदान किया और आपकी सरकार आयी. अच्छे दिन कैसे आए ? धान की आधारभूत कीमत 1310 रुपये पर केंद्र सरकार ने 50 रुपये बढ़ाए व धान का भाव 1360 रुपये हो गया.

....3.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन.....

अखबार में बड़ी बड़ी खबर आयी कि केंद्र सरकार ने आधारभूत कीमत पर 50 रूपये बढ़ा दिए और दूसरे दिन खबर आयी कि राज्य सरकार ने बोनस के 200 रूपये छीन लिए. मेरे पास आँकड़ों की कमी है लेकिन मुझे जितनी जानकारी है, उसके माध्यम से मुझे मालूम पड़ा कि केंद्र सरकार ने कहा कि जो राज्य धान को बोनस देंगे उनका सेंट्रल पूल में चावल नहीं लिया जाएगा. केंद्र की बात अलग, राज्य की बात अलग है. थोड़ी देर पहले सम्माननीय सदस्य श्री तटकरे जी ने बताया कि ऊर्जा मंत्री महोदय पहले ही कुछ बोल देते है, इससे लगता है कि कहीं न कहीं सरकार में समन्वय की कमी है. आदरणीय श्री चंद्रकांत पाटील जी यहाँ पर उपस्थित है. वे सहकार विभाग के मंत्री है. मैं उनसे कहना चाहता हूं कि विदर्भ के कुछ बैंक जो अच्छी स्थिति में चल रहे है, उन बैंकों के ऊपर, कृषि कर्ज, बार बार अकाल, कर्जबाजारी किसान, आत्महत्या, दो-तीन बार पेरणी करके पैसा खर्च किया गया, लेकिन किसानों को उनके खर्च की वसूली नहीं होना, घर में अनाज का दाना नहीं, खाने के लिए पैसे नहीं, दोबारा पेरणी के लिए कुछ भी नहीं है, ऐसा किसान कर्ज कहाँ से चुकाएगा? बैंकों का एन.पी.ए. बढ़ रहा है. एन.पी.ए. बढ़ने के लिए डीडीआर और कमिश्नर बैठक लेते है और कहते है कि आरआरसी करो, वसूली करो. अब इस कॉन्ट्रावर्सी में बैंक ने क्या करना चाहिए और हमने किसानों को क्या मदद करनी चाहिए, इस बारे में गंभीरता से सोचना चाहिए. आज किसानों की समस्या बहुत गंभीर है. किसानों की यह स्थिति हम सभी मान्य करते है. इस सदन का हर सदस्य मान्य करता है कि 1972 से भी ज्यादा गंभीर परिस्थिति अकाल की है. इस सदन के प्रत्येक व्यक्ति ने यह बात कही है कि 1972 से भी ज्यादा गंभीर परिस्थिति से किसान जूझ रहा है. इस पर निर्णय लेने के लिए हमको एक दिन हाऊस बंद करना पड़ता है, रोज मोर्चे निकालने पड़ते है, ऐसा क्यों ? आपको तो सभी स्थिति मालूम है. आप सरकार में हैं. आदरणीय श्री दिवाकर रावते जी, आपने तो शिवसेना के सभी आमदारों के साथ दौरा किया हैं और सारी परिस्थिति से माननीय राज्यपाल जी को अवगत कराया है. इसलिए कोई विषय ही नहीं रहता. आपको तो इतना भाषण सुनने की आवश्यकता ही नहीं है. किसानों की समस्या गंभीर है. सरकार ने किसानों के प्रति सहानुभूति रखकर, केंद्र सरकार की राह न देखते हुए उनकी समस्या पर अति गंभीरता से निर्णय लेना चाहिए. हम रोज समाचार पत्र में खबर पढ़ते है. कल टी.वी. पर देखा कि सम्माननीय श्री अशोक चव्हाण और श्रीमती सुप्रिया सुले जी ने जब लोकसभा में प्रश्न उपस्थित

....4.



AJIT/नितनवरे पूर्वी श्री.जुन्नरे.. 11:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन.......

किया तो उसका उत्तर माननीय केन्द्रीय कृषि मंत्री ने किस तरह से दिया, यह आपको सभी पता है और हमें भी पता है. माननीय मुख्यमंत्री जी विरोधी पक्ष में थे तो उन्होंने किसानों की समस्याओं पर अनेक भाषण किए थे. लेकिन अब वे शासन में है. वे रोज समाचार पत्र में खबर देते है कि हमारी सरकार किसानों के लिए गंभीरतापूर्वक कायमस्वरूपी उपाय करेगी, सिंचन योजना पूर्ण करने के बारे में निर्णय लेगी. कल सम्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस जी और सम्माननीय सदस्य श्री राजेंद्र मुलक जी ने गोसीखुर्द प्रकल्प का विषय उपस्थित किया. विदर्भ के बारे में मैं केवल इतना कहना चाहता हूं कि यह अधिवेशन विदर्भ में हो रहा है. यदि आप विदर्भ में किसानों को मदद करना चाहते है, विदर्भ के किसानों की उन्नति और प्रगति करना चाहते है तो लोकशाही आघाडी सरकार ने गोसीखुर्द जैसे प्रकल्प का 90 प्रतिशत काम पूरा कर दिया, पहली बार राज्य की लोकशाही आघाडी सरकार ने 2000 करोड़ रूपये का पॅकेज पुनर्वसन के लिए दिया. केवल दस प्रतिशत का काम आपकी सरकार के लिए छोड़ा है. हम देखते हैं कि आप यह काम कितने दिनों में पूरा करते है. मेरा विश्वास है कि यह सरकार इस काम को अतिशीघ्र पूरा करेगी. हम सोचते है कि किसानों के लिए कायम स्वरूपी योजना बनानी है, हमको इरीगेशन की ओर ध्यान देना है. विदर्भ के ऐसे अनेक प्रकल्प है जिनका 90 प्रतिशत काम पूरा हो चुका है. विदर्भ के कुछ ऐसे प्रकल्प है जिनके लिए थोड़ी ही रकम की आवश्यकता है. कुछ प्रकल्प वन कानून के कारण रूके है. इस ओर सरकार ने जरूर ध्यान देना चाहिए.

मैं माननीय ऊर्जा मंत्री जी से विनती करना चाहूंगा कि पिछले दिनों अनुसूचित जाति - जमाति के जो किसान भाई है, उनके बिजली के कनेक्शन जोड़ने के बारे में सरकार ने एक घोषणा की थी. लेकिन हुआ क्या ? केवल 700 लोगों के कनेक्शन जोड़े गए. 4 हजार से भी ज्यादा आवेदन महावितरण के पास प्रलंबित है. यदि इस तरह से काम करेंगे तो कैसे चलेगा ? एक तरफ तो हम कई नियमों की घोषणा करते हैं, कई अध्यादेशों की घोषणा करते है, लेकिन उसका पालन होता है या नहीं, इस बारे में कोई भी व्यक्ति ध्यान नहीं देता है.

......यानंतर श्री बोर्डे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता दुपारचे 12.00 वाजलेले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन हे या प्रस्तावावरील चर्चेसाठी ऑनलेग राहतील.

मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, माझ्या दालनात झालेल्या चर्चेनुसार दुष्काळाच्या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर आज दुपारी 2.15 वाजेच्या दरम्यान व्हावे अशी शासनाची अपेक्षा आहे. या चर्चेवरील उत्तर दोन्ही सभागृहात होणार आहे. परंतु माझ्यासमोर प्रश्न असा आहे की, या प्रस्तावावरील चर्चेवर अजूनही 7-8 सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. त्यामुळे या सन्माननीय सदस्यांना द्यावयाच्या वेळेबाबत आपल्याला विचार करावा लागेल.

श्री.भाई जगताप :महोदय, प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करावी.

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, प्रश्नोत्तराचा तास कधीच तहकूब होत नाही. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास तहकूब होणार नाही. प्रश्नोत्तराच्या तासानंतर वेळेच्या बाबतीत ठरवू या.

आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.01 वाजता दुपारी 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

**रायगड जिल्हयातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन भत्ता अद्याप न दिल्याबाबत**

(**१) * ९४० अॅड.निरंजन डावखरे**: सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाचे धोरणानुसार राज्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील - खालापूर, सुधागड - पाली, रोहा, अलिबाग, मुरुड, उरण आणि पनवेल या तालुक्यातील आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना मागील वर्षाचा प्रोत्साहन भत्ता अद्याप देण्यात आला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ रोजी उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रोत्साहन भत्ता न मिळाल्याने सदर विद्यार्थ्यांवर विट भट्टयावर काम करुन शिकण्याची देखील वेळ आली असल्याचे त्याच सुमारास (ऑक्टोबर, २०१४) उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्ता तत्काळ देण्याची मागणी सहयाद्री आदिवासी ठाकूर-कातकरी समाज संघटनेसह अन्य संघटनांनी व विद्यार्थ्यांच्या पालकांनी शिक्षणाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, व प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१४ पासून सतत करुनही अद्याप कार्यवाही झालेली नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्ता न देण्यास जबाबदार कोण व त्यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली अथवा येत आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णू सवरा :** (१) हे खरे नाही. तथापि, राज्यात इयत्ता १ ली ते १० वी या वर्गात आदिवासी आश्रमशाळांव्यतिरिक्त इतर शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दि.३१.०५.२०१० अन्वये सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून सुरू केली आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१३-१४ या वर्षात रायगड जिल्हयातील सात तालुक्यातील १,०५५ शाळांकडून सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीबाबतचे प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्याकडे उशिराने प्राप्त झाले होते. सदरहू प्राप्त प्रस्तावानुसार एकूण २०,४३१ आदिवासी विद्यार्थ्यांना माहे जून, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत एकूण रु.२,६३,०५,०००/- इतकी रक्कम मंजूर करून विद्यार्थ्यांना अदा केली आहे.

(३) हे खरे नाही. (४) हे खरे नाही. अशा आशयाचे निवेदन आदिवासी विकास विभागास प्राप्त झालेले नाही. (५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.940....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, उत्तराच्या क्रमांक 2 मध्ये माननीय मंत्र्यांनी म्हटले आहे की, "....7 तालुक्यातील 1,055 शाळांकडून सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीबाबतचे प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्याकडे उशिराने प्राप्त झाले होते. माझा प्रश्न असा आहे की, हे प्रस्ताव वेळेवर न पाठविणाऱ्या अधिकारी कोण आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ?

उत्तराच्या क्रमांक 4 मध्ये माननीय मंत्र्यांनी म्हटले आहे की, "अशा आशयाचे निवेदन आदिवासी विकास विभागास प्राप्त झालेले नाही." हा प्रश्न आपल्याला अगोदर विचारला आहे. त्यामुळे शासनास हे पत्र मिळाले की नाही, याची माहिती मिळावी.

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाला अशा आशयाचे पत्र मिळालेले नाही. आपण जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देतो. जिल्हा परिषदेमधील आदिवासी विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती देतो. आश्रमशाळांचा यामध्ये समावेश नाही. थोडासा विलंब झाला आहे, ही गोष्ट खरी आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांकडून प्रस्ताव वेळेवर आले पाहिजेत, ते येत नाहीत. शासन या संदर्भात काळजी घेईल. वेळेवर प्रस्ताव येतील, याची दक्षता घेतली जाईल.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाकडून शिष्यवृत्ती वेळेवर जात नाही असे नाही. काल परवा आयबीएन लोकमत या वाहिनीवर दाखविले की, आता परीक्षा जवळ येऊनही दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना अजूनही पुस्तके मिळालेली नाहीत. शासकीय आश्रमशाळांत खायला वेळेवर मिळत नसेल तर पुस्तके वेळेवर मिळतील असे वाटत नाही. दहावीच्या परीक्षा आता मार्चमध्ये येणार आहेत. नंदूरबार या आदिवासी जिल्ह्यामध्ये दहावीची पुस्तके अजूनपर्यंत मिळालेली नाहीत. माननीय मंत्री त्या संदर्भात काय ठोस कारवाई करणार आहेत, वेळेवर पुस्तके दिली नाहीत, त्या संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहे ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे. प्रश्न शिष्यवृत्तीसंबंधी आहे. सर्व प्रकारच्या घटना घडत असतात. काही ठिकाणी अशा घटना झाल्या आहेत. आम्ही त्याची चौकशी करीत आहोत. शासकीय व अनुदानित आश्रमशाळा अशा 2 प्रकारच्या आश्रमशाळा आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.940.... श्री. विष्णू सवरा ....

अनुदानित आश्रमशाळांमध्ये पुस्तके किंवा शैक्षणिक साहित्य वेळेवर मिळेल, असा आमचा प्रयत्न असतो. शासकीय आश्रमशाळांमध्ये वेळेवर पुस्तके दिली जातील याची देखील पुढील काळात दक्षता घेतली जाईल. काही शाळांमध्ये असे झाले असेल तर दक्षता घेऊन वेळेवर पुस्तके मिळतील, याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात कोणत्या 7 तालुक्यांमध्ये शाळांकडून प्रस्ताव आले आणि रू.2,63,05,000/- तालुकानिहाय कशाप्रकारे वाटप केले ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात मुरूड, उरण, पनवेल, पोलादपूर, खालापूर, सुधागड, अलिबाग तालुके आहेत. आपण शिष्यवृत्ती पहिली ते चौथी पहिला टप्पा, पाचवी ते सातवी दुसरा टप्पा आणि आठवी ते दहावी तिसरा टप्पा अशा 3 टप्प्यांमध्ये देत असतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.940** ........... श्री.विष्णू सवरा........

पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना 11424, पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना 6226 अशी आकडेवारी आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रत्येक तालुक्याची माहिती विचारली आहे. ती मी पटलावर ठेवतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती संदर्भातील हा प्रश्न आहे. आदिवासी उपयोजनेचा निधी केंद्र सरकारकडून राज्य शासनाला प्राप्त होत असतो. आदिवासी, अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी, यासाठी अनेक प्रकल्प आणि अनेक योजना सरकारने सुरु केल्या आहेत.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील 7 तालुक्यांमध्ये 1055 शाळांकडून सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती संबंधीचे प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्याकडे उशिरा प्राप्त झाले. त्यानंतरही आदिवासी विद्यार्थ्यांना जून, 2014 ते ऑक्टोबर, 2014 या कालावधीत 2 कोटी 63 लक्ष 5 हजार एवढी रक्कम मंजूर करुन अदा केली आहे, असे सरकारचे म्हणणे आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी हा निधी दिला जात असताना त्यामध्ये विलंब लावला जात आहे. या विलंबाची कारणे काय आहेत ? यासाठी प्रकल्प अधिकारी जबाबदार असतील तर त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करुन वेळेत आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांचे हक्क प्राप्त होतील, अशी व्यवस्था शासन करणार आहे का ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, शिष्यवृत्तीचे वाटप वेळेवर केले पाहिजे, हे बरोबरच आहे. तसे ते करण्यात येईल. काही ठिकाणी विलंब झाला आहे, हे उत्तरात आम्ही कबूल केले आहे. त्यानंतर 2 कोटी 63 लक्ष 5 हजार रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. वाटपात काही त्रुटी राहिल्या असतील तर निश्चितपणे सुधारणा करुन वेळेत शिष्यवृत्तीचे वाटप होईल, याची दक्षता घेतली जाईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा प्रश्न विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती संदर्भातील आहे. त्याला जोडूनच मला असे विचारावयाचे आहे की, अलीकडेच मुख्यमंत्री महोदयांना लोकसत्ताच्या एका कार्यक्रमाला निमंत्रित करण्यात आले होते. त्या कार्यक्रमात त्यांनी अशी सूचना केली की,

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.940** ...........

श्री.माणिकराव ठाकरे........

इतर मागासवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी संदर्भात फेरआढावा घेण्यासाठी एक समिती नियुक्त करण्याचा विचार मंत्रिमंडळ करीत आहे. या सर्व मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी किंवा परीक्षा फी न देण्याबाबत किंवा कमी करण्याबाबत राज्य शासनाने समिती नियुक्ती केली आहे का ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला उप प्रश्न तारांकित प्रश्नाशी संबंधित नाही. मुख्यमंत्री महोदयांनी अशा प्रकारचे काही वक्तव्य केल्याचे मला तरी आठवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग हा एकमेव असा विभाग आहे की, दूरदर्शन व इतर वाहिन्यांवर सत्य परिस्थिती दाखविल्यानंतरही आदिवासी वसतिगृहे, आश्रमशाळा यांचे प्रश्न सोडविले जात नाहीत. अन्य कोणत्याही विभागाबाबत अशी बातमी दाखविल्यानंतर दुसऱ्या दिवशी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाते. नंदूरबार जिल्ह्यातील जी घटना सांगितली आहे, ती सत्य आहे व ती दूरदर्शन वाहिन्यांवर दाखविण्यातही आली आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांना अद्याप पुस्तके मिळालेली नाहीत. त्यांना देण्यात येणाऱ्या जेवणाचा दर्जा बघण्यासारखा नव्हता. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता सरकार त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करणार आहे का ? आदिवासी वसतिगृहातील दर्जाहीन वस्तू या सभागृहातही दाखविण्यात आल्या होत्या. ड्युप्लिकेट हमाम साबण कशा प्रकारे त्यांना वितरित केला जातो, हे आपण सर्वांनी पाहिले आहे. परंतु, अद्याप एकाही अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, दूरदर्शन वाहिन्यांवर आणि या सभागृहात दाखविण्यात आलेल्या घटनेच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासन कठोर कारवाई करणार आहे का ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याची आमची इच्छा नाही. आदिवासी विकास विभाग हा एक संवेदनशील विभाग आहे. त्यामुळे या विभागांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळा किंवा वसतिगृहे चांगल्या प्रकारे चालली पाहिजेत, असा आमचाही उद्देश आहे.

...3....



SRR/ प्रथम श्री.मंगेश....... 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तथापि, दोषपूर्ण काम करणारे अधिकारी निदर्शनास आल्यास निश्चितपणे त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी योग्य प्रश्न विचारला होता. परंतु, तो त्यांना पूर्ण करता आला नाही. मुख्यमंत्री महोदयांनी त्या कार्यक्रमात असे सांगितले होते की, "आदिवासी मुलांच्या नावावर संस्था पैसे घेत असून ते पैसे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे त्याची फेरतपासणी होईल." मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विचारणार आहे की, मागील काळात विद्यार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये शिष्यवृत्तीचे पैसे जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, त्याची अंमलबजावणी झाली नाही. संस्थेकडे पैसे न पाठविता थेट विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे जमा करण्याचे काम शासन करणार आहे का ? कारण, संस्था, अधिकारी या योजनेत मोठा भ्रष्टाचार करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते मान डोलावून माझ्या म्हणण्याला समर्थन देत आहेत. आम्ही बँकांमध्ये विद्यार्थ्यांचे अकाऊंट्स उघडली आहेत. त्यामुळे थेट विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे जमा करण्याचे धोरण शासन स्वीकारणार आहे का ?

श्री.विष्णू सवरा : होय.

-------------

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील जात पडताळणी समितीकडे हजारो अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(२) * ११२७ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ समित्यांचा कारभार ६ अधिका-यांमार्फत चालविला जात असून त्यातील दोघा अधिका-यांकडे ४ समित्यांचा अध्यक्षपदांचा कारभार सोपविण्यात आला असून सद्यस्थितीत येथील ८९ हजार अर्ज प्रलंबित असल्याबाबत माहे ऑगस्ट,२०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रलंबित असलेले अर्ज हे मराठा, मुस्लिम समाजातील अनेक उमेदवार प्रमाणपत्र मिळूनही सदरील लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त समित्याची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे

(५) अद्याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप कांबळे, श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

जातपडताळणी समित्यांची बहुतांशी पदे भरण्यात आलेली असून उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच माहे ऑगस्ट, २०१४ अखेर १०६९३५ इतकी जातपडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

मराठा व मुस्लिम या समाजासाठी आरक्षण माहे जुलै, २०१४ मध्ये लागू करण्यात आले होते व तद्नंतर आता मा.उच्च न्यायालयाने सादर सदर आरक्षणास स्थगिती दिली आहे.

(३) व (४) समित्यांवरील रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही सुरू असून अतिरिक्त कार्यभार देऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. समिती कार्यालयात दाखल होणा-या प्रकरणांची संख्या व अपुरा कर्मचारी वर्ग यांचा समन्वय साधून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाला दिलेल्या उत्तरात विसंगती आहे व त्यामुळे माझी उत्तरालाच हरकत आहे.

**सभापती** : मंत्री महोदयांना उत्तरात काही दुरूस्ती करावयाची आहे का ?

...5.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1127.........

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, उत्तरात सुधारणा नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपल्यासमोर तारांकित प्रश्नही आहे आणि सरकारने दिलेले लेखी उत्तरही आहे. या तारांकित प्रश्नाचे गांभीर्य मोठे आहे. राज्यातील जात पडताळणी समितीकडे हजारो विद्यार्थ्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत, असे प्रश्नात नमूद करण्यात आले आहे. शासनाने उत्तरात लाखो प्रकरणे प्रलंबित असल्याचे म्हटले आहे व मी त्याचे स्वागत करतो.

सभापती महोदय, विसंगती ही आहे की, तारांकित प्रश्नाचा भाग 1 असा आहे की, "राज्यातील 15 समित्यांचा कारभार 6 अधिकाऱ्यांमार्फत चालविला जात आहे. त्यातील दोन अधिकाऱ्यांकडे 4 समित्यांच्या अध्यक्षपदाचा कारभार सोपविण्यात आला असून सद्य:स्थितीत येथील 89 हजार अर्ज प्रलंबित असल्याबाबत माहे ऑगस्ट, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला शासनाने "हे खरे नाही", असे उत्तर दिलेले आहे. परंतु, प्रश्न भाग 4 ला दिलेल्या उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "समिती कार्यालयात दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या व अपुरा कर्मचारी वर्ग यांचा समन्वय साधून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्द पातळीवर सुरु आहे."

सभापती महोदय, अशा प्रकारे दोन्ही उत्तरात विसंगती आहे. हा मंत्री महोदयांचा दोष नाही. मी वारंवार या सभागृहात सांगितले आहे की, जरी मंत्री बदलले असले तरी अधिकारी आणि प्रशासन तेच आहे. ते अशा प्रकारची उत्तरे तयार करुन देत आहेत. ते या कामकाजाला लाईटली घेत आहेत. जवळ जवळ 1 लाख 69 हजार विद्यार्थ्यांच्या जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत. ते विविध योजनांपासून वंचित रहात आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे जे अधिकारी चुकीची उत्तरे तयार करुन देत आहेत, सभागृहाची दिशाभूल करीत आहेत, विद्यार्थ्यांना विविध योजनांपासून वंचित ठेवत आहेत, त्यांच्याविरुध्द तत्काळ कारवाई करणार आहात का ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, तारांकित प्रश्नामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "15 समित्यांचा कारभार 6 अधिकाऱ्यांमार्फत चालविता जात आहे." या प्रश्नाला उत्तर होते की, "हे खरे नाही. 15 समित्यांचा कारभार 9 अध्यक्षांमार्फत केला जात आहे."

यानंतर श्री.मा.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 12:30

ता.प्र.क्र.1127..... श्री. राजकुमार बडोले...

ज्यांच्याकडे 4 समित्यांचा कारभार आहे अशी कोणतीही समिती नाही. एका समितीच्या अध्यक्षाकडे जास्तीत जास्त 2 समित्यांचा कारभार दिलेला आहे. म्हणून "हे खरे नाही" अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे.

श्री. सुनील तटकरे : मंत्री महोदय सदनाची दिशाभूल करीत आहेत. पहिल्या प्रश्नामध्ये किती समित्या आहेत, किती अध्यक्ष आहेत, 89 हजार अर्ज प्रलंबित असल्याबाबत माहे ऑगस्ट, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय, अशी विचारणा केलेली आहे. त्या प्रश्नाला उत्तर देताना सुरुवातीला "हे खरे नाही" असे नमूद केलेले आहे. त्याच उत्तरामध्ये माहे ऑगस्ट, 2014 अखेर 106935 इतकी जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत असे नमूद केलेले आहे. दोन्ही उत्तरामध्ये विसंगती दिसून येत आहे. विसंगत माहिती दिल्याबद्दल माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये दिलगिरी व्यक्त करावी अन्यथा सुधारित उत्तर येईपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. भाई जगताप : ज्या अधिकाऱ्याने दिशाभूल करणारी माहिती दिली त्या अधिकाऱ्याला देखील जबाबदार धरले पाहिजे.

श्री. राजकुमार बडोले : प्रश्नाचे गांभीर्य माझ्या लक्षात आलेले आहे. पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात असे उत्तर आहे की, राज्यातील 15 समित्यांचा कारभार हा 6 अधिकाऱ्यांमार्फत चालविला जात नसून प्रत्यक्षात 9 अधिकारी कार्यरत आहेत. 2 अधिका-यांकडे 4 समित्यांचा कारभार नाही असे त्या प्रश्नाचे उत्तर आहे.

श्री. सुनील तटकरे : प्रश्न क्रमांक 2ला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. 106935 इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत हे मंत्री महोदयांनी कबूल केलेले आहे. असे असताना दुसऱ्या क्रमांकाच्या प्रश्नाल "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. अशी विसंगत उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभूल करण्यात आलेली असल्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. ज्यांना जात प्रमाणपत्रे मिळाली आहेत परंतु जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले नाही असे किती लोक आहेत यासंबंधीची माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1127.....

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाचा संपूर्ण अभ्यास करुन सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे. तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. राजकुमार बडोले :1 लाख 3 हजार 389 प्रकरणे प्रलंबित आहेत. मी सुधारित उत्तर देत आहे.... सभापती महोदय, मी तपासून माहिती पटलावर ठेवीन.

**सभापती** : महाराष्ट्रामध्ये जात पडताळणी हा एक अत्यंत महत्वाचा विषय आहे. या संदर्भात अनेक प्रश्न या सदनामध्ये सातत्याने विचारले जातात. आजचा प्रश्न मी राखून ठेवीत आहे. दरम्यानच्या काळात माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या दालनामध्ये प्रश्नकर्त्या सर्व सन्माननीय सदस्यांची बैठक घेऊन सुधारित उत्तर द्यावे.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, ता.प्र.क्र.1132 हा प्रश्न देखील ता.प्र.क्र.1127 शी निगडित आहे. त्या प्रश्नासंबंधी देखील चुकीची माहिती देण्यात आलेली आहे.

**सभापती** : मी तो प्रश्न पुकारल्यानंतर त्यासंबंधी बोलण्याची संधी मी सन्माननीय सदस्यांना देईन.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शासकीय व खाजगी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी पुविण्यात आलेल्या**

**संगणक व इतर साहित्य निविदांबाबत**

**(३)** * **२२३** ॲड.**जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागाअंतर्गत असलेल्या शासकीय वसतिगृहातील व खाजगी शाळा संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी संगणक व इतर साहित्य पुरविण्याकरिता **सन** २०१० ते २०१४ या कालावधीत काढण्यात आलेल्या निविदांची तसेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबतची चौकशी करण्यासाठी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजी शासनास पत्र पाठवून चौकशीची मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सामाजिक न्याय विभागामार्फत सन २०१० ते २०१४ या कालावधीत काढलेल्या निविदाबाबतची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.समाजकल्याण मंत्री आदिकडे अपंग शाळा, कर्मशाळा, सलंग्न वसतिगृहे कर्मचारी संघटनांनी माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवडयात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप कांबळे**, **श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता:** (१) व (२) या विभागात सदर निवेदन प्राप्त झाले किंवा कसे याबाबत शोध घेतला असता निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड. जयदेव गायकवाड : हा प्रश्न समाजकल्याण विभागाशी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांशी निगडित आहे. समाजकल्याण विभागामार्फत जे विद्यार्थी वसतिगृहामध्ये राहातात त्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याची योजना समाज कल्याण विभागाने राबविली होती. या प्रशिक्षणाच्या संदर्भात हिंदुस्थान कॉम्प्युटर कंपनीचे प्रकरण कोर्टामध्ये होते. त्या कंपनीचे कंत्राट रद्द करण्यात आले. त्यानंतर 3 कंपन्यांना संगणक प्रशिक्षण देण्यासंबंधीचे कंत्राट देण्यात आले. ते देताना मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे हे खरे आहे काय ? त्या कंपन्यांनी संगणकीय प्रशिक्षण देण्याआधीच त्यांना पैसे अदा करण्यात आलेले आहेत हे खरे आहे काय ? मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण न मिळता पैशाचा अपहार झालेला असून ही घटना याच सरकारच्या काळातील आहे हे खरे आहे काय ?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजकुमार बडोले : ही बाब मी तपासून घेतो.

श्री. हेमंत टकले : या प्रश्नाच्या उत्तरामध्ये आणि विचारलेल्या प्रश्नामध्ये अपंगांच्या कार्यशाळा आणि संलग्न वसतिगृहे यांचा एक प्रश्न आपणासमोर आलेला आहे. जे जे नवीन शैक्षणिक उपक्रम असतील ते या अपंग विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी विशेष प्रशिक्षण देणारी यंत्रणा समाजकल्याण खात्यामार्फत उभी करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा सर्व यंत्रसामग्री घेऊन देखील प्रशिक्षण देणारा शिक्षक वर्ग नसेल तर या अपंगांची केवळ चेष्टा केल्या सारखे होईल. हा सर्व व्यवहार ज्या पध्दतीने चालला आहे त्यानुषंगाने अपगांना संगणकीय प्रशिक्षण देण्यासाठी शासन निश्चित कोणत्या प्रकारचे धोरण घेणार आहे ?

श्री. दिलीप कांबळे : खास तज्ज्ञ वर्ग निर्माण करुन या सर्व संस्थामध्ये अपंग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था लवकरात लवकर करण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सन 2010 ते 2014 या कालावधीमध्ये संगणकीय साहित्य पुरविण्यासाठी ई निविदा काढण्यात आल्या होत्या काय आणि त्या निविदा प्रमाणे साहित्य मिळालेले आहे काय ?

..नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.223.........

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, अशा प्रकारची निविदा काढलेली नव्हती. परंतु शासनाच्या आर.सी.नुसार सर्व साहित्याची खरेदी करण्यात आली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : या प्रकरणातील घोटाळ्याबाबत बिर्ला एज्युकेशन, झेनिथ कॉम्प्युटर्स, कोअर एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजी प्रा.लि. या कंपन्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे काय, असल्यास तपासाचा निष्कर्ष काय आहे? संगणक खरेदी प्रकरणामध्ये एकूण 24 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण न देता कंपन्यांना ॲडव्हान्स दिला गेला हे खरे आहे काय, असल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करणार आहात?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सर्व प्रकारचे साहित्य त्यांनी पुरविले आहे. परंतु काही ठिकाणी अनियमितता केलेली आहे त्याबद्दलची चौकशी सुरु आहे. जे अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, ई-निविदा काढलेली नव्हती. रेट कॉन्ट्रॅक्टनुसार खरेदी करण्यात आली आहे. ज्यांच्याकडून खरेदी करण्यात आली त्या कंपन्यांची नावे काय आहेत, किती रक्कमेची खरेदी करण्यात आली आणि ज्या काही तक्रारी झालेल्या आहेत त्याची शासनाने चौकशी केली आहे काय?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, ए.सी.बी.मार्फत चौकशी सुरु आहे. त्या चौकशीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : निविदा न काढता आर.सी.नुसार खरेदी करण्यात आली. दरवर्षी किती रक्कमेची खरेदी केली आणि कोणत्या कंपनीकडून केली?

श्री.दिलीप कांबळे : साधारणत: 5 वर्षातून एकदाच विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याचा नियम आहे. शासकीय वसतिगृहांसाठी 2940 संगणकांची खरेदी झाली असून त्या खरेदीची किंमत 10.32 कोटी रुपये इतकी आहे. खाजगी संस्थांच्या वसतिगृहांसाठी 4776 संगणक खरेदी केले असून त्या खरेदीची किंमत 19.62 कोटी रुपये इतकी आहे. ही खरेदी एकाच वेळी झालेली आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, 10 कोटी रुपयांच्या खरेदीमध्ये संगणक आणि साहित्य याकरिता किती खर्च करण्यात आला याची माहिती सभागृहाला दिली जाईल काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.2

SGB/ 12:40

ता.प्र.क्र.223.....

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, संगणकाशी संबंधित जे साहित्य आहे त्याचीच खरेदी यामध्ये समाविष्ट आहे. वेगळ्या साहित्याची खरेदी केलेली नाही. त्यामुळे त्याची वेगळी किंमत सांगता येणार नाही.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, टेंडर न काढता आर.सी.नुसार 20 कोटी रूपयांची खरेदी केल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. गरीब मजूर संस्थांना काम देण्यासाठी 10 लाख रूपयांची मर्यादा 3 लाख रूपयांवर आणण्यात आली आहे. ही मर्यादा पूर्ववत करण्यात येईल काय?

(उत्तर देण्यात आले नाही)

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये दोन गोष्टींचा रेफरन्स दिलेला आहे. पहिला रेफरन्स हायकोर्टामध्ये जी याचिका दाखल केली त्या संदर्भात असून दुसरा रेफरन्स खाजगी संस्थांमार्फत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत जे पत्र दिले त्या बाबतचा आहे. पत्र प्राप्त न झाल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर दिलेले आहे. परंतु मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये या प्रकरणाची चौकशी सुरु असल्याची माहिती दिली आहे. याचा अर्थ प्रश्नाचा मूळ गाभा आहे तो दडपण्याचा प्रयत्न सुरु आहे. सभागृहाला माहिती द्यायची नाही असा त्याचा अर्थ होतो. हायकोर्टामध्ये जी याचिका दाखल झाली आणि खाजगी एनजीओकडून भ्रष्टाचाराबाबत जो उल्लेख केला आहे या बाबी सत्य असण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा आणि सुधारित उत्तरासह पुन्हा चर्चेला घेण्यात यावा.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, कोणतीही माहिती दडवून ठेवण्याचा शासनाचा हेतू नाही. कारण हा संपूर्ण विषय राज्यातील गोरगरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांशी संबंधित आहे. त्यामुळे शासनाचा स्पष्ट हेतू आहे की, राज्यातील गोरगरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे. संगणक साहित्याची आर.सी.वर खरेदी करताना कोणतीही अनियमितता झालेली नाही. परंतु शासनाने या प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अनियमितता आढळून आली तर जे कोणी अधिकारी दोषी आढळतील त्यांच्याविरूध्द कारवाई करण्यात येईल.

प्रा.जनार्दन चांदूरकर : चौकशीचे टर्म्स अँड रेफरन्सेस काय आहेत?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे : चौकशीचा अहवाल पटलावर ठेवण्यात येईल.

....3.....



ता.प्र.क्र.223..........

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, एका बाजूला मंत्री महोदय सांगतात की, या प्रकरणात अनियमितता झालेली नाही आणि दुसऱ्या बाजूला या प्रकरणाची अँटी करप्शन विभागामार्फत चौकशी सुरु असल्याची माहिती देत आहेत. त्या चौकशीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असेही सांगण्यात आले आहे. प्रश्न क्रमांक-3 व 4 च्या अनुषंगाने प्रश्न उद्भवत नाही असे उत्तर देण्यात आले आहे. जर अनियमितता झाली नसेल तर चौकशी कोणत्या कारणास्तव सुरु आहे, त्या चौकशीचा विषय काय आहे?

श्री.दिलीप कांबळे : शासनाने या प्रकरणाची दखल घेऊन चौकशी सुरु केली आहे. या चौकशीचा अहवाल आल्यानंतर तो सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, ही संगणक खरेदी 2010 ते 2012 या काळातील आहे. 2010 ते 2012 या काळातील खरेदी प्रकरणामध्ये जी अनियमितता झाली त्याची सखोल चौकशी करुन कारवाई करण्यात येईल काय?

श्री.दिलीप कांबळे : सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे ती लक्षात घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करुन तातडीने कारवाई करण्यात येईल.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, मूळ प्रश्न मी विचारला होता, परंतु माझे नाव शेवटी नमूद करण्यात आले आहे. नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक 11 नोव्हेंबर, 2014 रोजी शासनास दिलेले पत्र प्राप्त झाले नाही असे उत्तरात म्हटले आहे. मी स्वत: शासनास पत्र दिले होते. कारण दिनांक 6 नोव्हेंबर, 2014 रोजी नागपूरच्या दै.लोकमत वृत्तपत्रात एक बातमी प्रसिध्द झाली होती. त्यात म्हटले होते की, 2010 ते 2012 या तीन वर्षाच्या काळातील हे प्रकरण असून या खरेदीमध्ये 24.29 कोटी रुपयांचा अपहार झाला आहे. अँटी करप्शन विभागाने तीन कंपन्यांच्या संचालकांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणामध्ये माजी सामाजिक न्याय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे आणि त्यांचे खाजगी सचिव यांचाही उल्लेख झालेला आहे. जे अधिकारी या भ्रष्टाचार प्रकरणात गुंतले आहेत त्यांना निलंबित केले जाईल काय? श्री.शिवाजीराव मोघे आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचे खाजगी सचिव श्री.अल्लडवार यांचा या प्रकरणात संबंध आहे काय, असल्यास त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करणार आहात काय?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे त्यानुसार सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

-----

नंतर आर.1...

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अकोला जिल्ह्यातील आदिवासी विभागात विकास मंडळातर्फे जनरेटर खरेदीमध्ये**

**सुमारे ६७ लाख रुपयांचा अपहार झाल्याबाबत**

**(४) * ६५८ श्री.जयंत पाटील, श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सन २०१०-११ मध्ये विदर्भ वैधानिक विकास मंडळातर्फे आश्रमशाळा व वसतिगृहांसाठी दिलेल्या २० कोटी निधीतून जनरेटर खरेदीमध्ये सुमारे ६७ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजी निदर्शनास आणला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अमरावती भ्रष्टाचार निर्मूलन समितीने शासनाकडे तक्रार केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तक्रारीनुसार अकोला लाचलुचपत प्रतिबंधक पथकाला चौकशीचे आदेश दिले होते, त्यानुसार या पथकाने वरीलप्रमाणे अपहार उघडकीस आणून अमरावतीचे अप्पर आयुक्त तसेच अकोला, धारणी व पांढरकवडा येथील आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच पुरवठादार कंपनीचे मालक शब्बीर अली मोहम्मद अली यांच्या विरुध्द दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी दाखल गुन्ह्यानुसार चौकशी पूर्ण करुन संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. विष्णू सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी तत्कालीन अपर आयुक्त, अमरावती, आदिवासी विकास विभाग, तत्कालीन प्रकल्प अधिकारी अकोला व श्री.शब्बीर अली मोहम्मद अली यांचे विरुध्द पो.स्टे. सिटी कोतवाली, जि.अकोला, पो.स्टे. पांढरकवडा, जि.यवतमाळ व पो.स्टे. धारणी, जि.अमरावती येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

श्री. जयंत पाटील : अकोला जिल्हयात आदिवासी विभागामार्फत जी जनरेटर्सची खरेदी करण्यात आली ते जनरेटर्स 25 मेगावॅट अथवा 50 मेगावॅट अशा किती क्षमतेचे होते ? माझ्या माहितीप्रमाणे या जनरेटर्सची प्रत्येकी 1 लाख 79 हजार एवढी किंमत असताना ती 2 लाख 22 हजार 980 रुपयांना खरेदी केली आणि ज्या कंपनीमार्फत ही खरेदी झाली त्या कंपनीने आणखी कोणकोणत्या ठिकाणी जनरेटर्सचा पुरवठा केला व त्यामध्ये कोणत्या कंपनीच्या मशिन्स बसविलेल्या आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 658.......

श्री. विष्णू सवरा : महोदय, हे जनरेटर्स 10 के.व्ही. एवढ्या क्षमतेचे असून इतर जी माहिती त्यांनी मागितलेली आहे ती डिटेल्स माझ्याकडे नसल्याने नंतर पटलावर ठेवण्यात येईल. तसेच ज्या कंपनीने हा पुरवठा केला त्या कंपनीचे अंतिम देयक अद्याप देणे बाकी आहे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : महोदय, आदिवासी विकास विभागात फक्त जनरेटर्समध्येच भ्रष्टाचार झालेला नाही तर प्रत्येक खरेदीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. या विभागाने एखादी चांगल्या दर्जाची वस्तू घेतलेली दाखवा आणि एक हजार रुपये मिळवा अशी घोषणा आमच्याकडे सातत्याने होते. यासंदर्भात उच्च न्यायालयाने आदेश दिले होते की आदिवासी विकास विभागात प्रथमदर्शनी 6 हजार कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचे दिसते म्हणून या प्रकरणाची चौकशी आयोगामार्फत व्हावी म्हणून उच्च न्यायालयाच्या आदेशावरुन न्या. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला. त्या आयोगाला मुदतवाढ हवी म्हणून शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असून अद्यापही या आयोगाला मुदतवाढ दिलेली नाही, हे खरे आहे काय, आणि त्या आयोगाला आदिवासी विकास विभागातील प्रत्येक गोष्टीत झालेल्या खरेदीतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी मुदतवाढ शासन देणार आहे काय ?

श्री. विष्णू सवरा : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा सभागृहात सुरु असलेल्या प्रश्नाशी काहीच संबंध नसल्याने उत्तर देण्याचा प्रश्नच येत नाही.

**सभापती** : मंत्री महोदयांनी अचूक उत्तर दिलेले आहे. फक्त आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून असे अनेक व्यवहार होतात या व्यवहाराच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने काही स्ट्रिक्चर्स पास केलेले आहेत त्या अनुषंगाने चर्चा झाली म्हणून यासंबंधीची माहिती जरी आपणाकडे नसली तरी ती नंतर पटलावर ठेवण्यात यावी.

श्री. विष्णू सवरा : महोदय, केवळ जनरेटर्स खरेदी करण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे, सन्माननीय सदस्यांनी जनरल माहिती विचारलेली असल्याने ती माझ्याकडे उपलब्ध नाही. तरी देखील आपण निदेश दिल्याप्रमाणे माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ वर पोलदपूर पासुन सुरु होणा-या महाबळेश्वर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्याबाबत**

(५) * १३६१ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ वर पोलदपूर येथील छत्रपती शिवाजी महाराजाच्या अश्वारुढ पुतळयापासून सुरु होणा-या महाबळेश्वर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पोलादपूर बांधकाम उपविभागाकडून सन २०१३ मध्ये पूर्णत्वास गेले असले तरी या वर्षी सदरहू डांबरीकरणावर अनेक खड्डे दिसून येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव वाहनचालकांची व नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री० प्रविण पोटे-पाटील श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे.

(२) नूतनीकरण करण्यात आलेली कामे दोषदायित्व कालावधीत असल्याने डांबरी पृष्ठभागावर किरकोळ स्वरूपात पडलेले खड्डे करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार कंत्राटदाराकडून त्याच्या स्वखर्चाने भरून घेण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भाई जगताप : महोदय, गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. 17 वर पोलादपूरपासून सुरु होणाऱ्या रस्त्याच्या हा प्रश्न असून आम्ही नोव्हेंबर महिन्यात प्रश्न विचारलेला असताना देखील उत्तर बरोबर दिले जात नाही. उत्तरात पहिल्यांदा सांगण्यात आले की, "अंशत: खरे आहे" परंतु मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नाला चुकीची उत्तरे पुरविलेली आहेत. कारण आजच सकाळी या रस्त्याच्या संदर्भात मी माहिती घेतली असता सन 2013 मध्ये तयार झालेल्या या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी पुरविलेली माहिती खरी मानून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

श्री. प्रविण पोटे -पाटील : महोदय, या परिसरात पावसाचे प्रमाण खूपच जास्त असल्याने सन 2013 मध्ये जरी रस्ता तयार झालेला असला तरी अतिवृष्टीमुळे तो अंशत: खराब झाल्याचे आम्ही मान्य केले आहे. सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर हे अधिवेशन संपल्यानंतर या रस्त्याची प्रत्यक्ष

........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रविण पोटे -पाटील......

पाहणी करण्यासाठी आपण जाऊ व त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. खरे तर हा रस्ता टप्प्याटप्प्याने सहा महिन्यात तयार झालेला आहे तसेच विभागाने त्या रस्त्याचे पर्सेंटेज काढले असता ते अत्यंत कमी असल्याचे दिसून आले आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : महोदय, मंत्री महोदयांनी उल्लेख केला की या भागात पावसाचे प्रमाण जास्त आहे.पण एखादा रस्ता तयार करताना त्या भागातील भौगोलिक परिस्थिती व पर्जन्यमान याचा विचार करुनच त्याचे डिझाईन तयार करण्यात येते व त्या रस्त्याचा दर्जा कायम ठेवण्याचाही विचार केला जातो. हे सर्व निकष या रस्त्याचे डिझाईन तयार करताना पाळण्यात आले नाही, तसेच चुकीच्या पध्दतीने डिझाईन तयार केले गेले, हे खरे आहे काय ?

श्री. प्रविण पोटे-पाटील : रस्त्याचे डिझाईन चुकीचे नाही पण या भागात पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे हा प्रकार झालेला आहे आणि ज्या कंत्राटदाराने हे काम केलेले आहे त्याच्याकडेच आपण मेंटेनन्सचे काम सुध्दा दिलेले आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, कोकण प्रदेशात जास्तीत जास्त पाऊस पडतोच त्यात काही नवीन नाही. पण गोवा महामार्ग क्र. 17 या रस्त्याची परिस्थिती अत्यंत गंभीर असून सभागृहात मात्र चुकीच्या माहितीबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.

......एस-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1361...

श्रीमती विद्या चव्हाण....

या रस्त्याची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. महाबळेश्वरकडे जाणारा रस्ता हा महामार्ग क्र.17 वरूनच जातो. या रस्त्याची प्रचंड दुर्दशा झालेली आहे. येथे जे लेखी उत्तर देण्यात आले आहे ते अत्यंत किरकोळ स्वरूपाचे आहे. असे असताना देखील शासन कंत्राटदाराची बाजू घेत आहे. या मार्गावर प्रचंड प्रमाणावर खड्डे पडले आहेत.

**सभापती** : मी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना सूचित करतो की, अत्यंत महत्त्वाच्या अशा प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा करीत आहोत. गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.17 वरील पोलादपूर पासून सुरू होणाऱ्या महाबळेश्वर रस्त्यावर खड्डे पडले आहेत. त्यासंबंधी सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनात बोलावून यासंबंधी कोणती उपाययोजना करता येईल याबाबत आपण सविस्तर चर्चा करावी.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सदर रस्त्याचे डिझाईन चुकलेले नाही. अशा प्रकारच्या रस्त्यांवर खड्डे पडणे आणि ते भरणे हा काही महाराष्ट्राला नवीन विषय नाही. येथे खड्डे भरले जातात किंवा नाही असा मुद्दा आहे. आमचा असा दावा आहे की, ते खड्डे भरले गेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून तेथील खड्डे भरले गेले नसतील तर अधिवेशन संपल्यानंतर आम्ही तेथे जाऊ आणि तेथील खड्डे भरले नसतील तर कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : मंत्री महोदय, मी सूचित केल्याप्रमाणे आपण बैठक देखील घ्यावी.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपण सूचित केल्याप्रमाणे सदर रस्त्याच्या दुरवस्थेसंबंधात आपल्या दालनात बैठक देखील आयोजित करण्यात येईल.

...........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील १७० कृषि उत्पन्न बाजार समित्या बरखास्त करण्याचा घेतलेला निर्णय**

**(६) * १६७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १७० कृषि उत्पन्न बाजार समित्या बरखास्त करण्याचा निर्णय सहकार मंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच कायदयाच्या कलम ८८ नुसार कारवाई करण्यात आलेल्या परंतु स्थगिती मिळालेल्या २०० सहकारी संस्थाची स्थगिती आदेश उठविण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले हेही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील पुणे, पिंपळगाव व इतर बाजार समित्या बरखास्त करण्याच्या निर्णयास मा.उच्च न्यायालयाने दि.१४ नोव्हेंबर, २०१४ रोजी स्थगिती देवून प्रशासक नेमण्याची कार्यवाही रद्द केली हेही खरे आहे काय,

(४) असल्यास प्रश्न भाग (१) व (२) बाबत निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास प्रश्न भाग (३) प्रमाणे राज्यातील इतर बाजार समित्यांमधील प्रशासक नेमण्याची कार्यवाही रद्द करण्याबाबत शासनाचा विचार आहे काय,

(६) तसेच राज्यातील मुदत संपलेल्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका तातडीने घेण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. तथापि, स्थगिती उठविण्यासाठी प्रथम सुनावणी घेऊन, संबंधित वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल.

(३) दाखल याचिकांपैकी फक्त पिंपळगांव बसवंत व मंचर कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या बरखास्तीच्या निर्णयास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे.

(४) मुदत संपलेल्या बाजार समित्यांच्या निवडणुका निष्पक्ष वातावरणात व्हाव्यात म्हणून शासकीय प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यातील ज्या सहकारी संस्थांच्या कामकाजात आर्थिक अनियमितता आढळून आल्या अशा संस्थांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८८ अन्वये चौकशी करुन संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित केली आहे. अशा चौकशीविरुध्द संबंधित संस्थांच्या पदाधिकारी / अधिका-यांनी शासनाकडे केलेल्या अपील / पुनर्रिक्षण अर्जाबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी स्थगिती देण्यात आली असून याबाबतचे काही अर्ज शासन स्तरावर प्रलंबित आहे. अशा अर्जावर उचित निर्णय घेणे आवश्यक आहे.

(५) नाही.

(६) निवडणुकीस पात्र असलेल्या सर्व बाजार समित्यांच्या निवडणुका तातडीने घेण्याबाबत पणन संचालक, पुणे यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.167....

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, नवीन सरकार आल्यामुळे काही बाजार समित्या बरखास्त होतील असे सर्वांना वाटत आहे. जुने सरकार असताना कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये संचालकांची निवड झाली होती. नवीन सरकार आल्यानंतर त्यांनी बाजार समित्या बरखास्त केल्या आहेत ही बाब खरी आहे काय, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचा कार्यकाळ संपलेला आहे काय, तेथे प्रशासक नेमलेला आहे काय आणि तेथे निवडणूकीच्या प्रक्रिया सुरू झाल्या आहेत काय, असल्यास, तेथे प्रशासक नेमण्याची आवश्यकता आहे काय ? असे माझे प्रश्न आहेत.

श्री.चंद्रकांत पाटील : आपण 170 कृषि बाजार समित्या बरखास्त करून त्यावर प्रशासक नेमले आहेत. तसेच 135 कृषि उत्पन्न बाजार समित्या बरखास्त करण्यात आलेल्या नाहीत. याचा अर्थ कुठल्याही आकसातून हा निर्णय घेतलेला नाही. मूळ निवडून आलेले प्रशासकीय मंडळ बरखास्त करून त्या त्या ठिकाणी अशासकीय प्रशासकीय मंडळ नेमले होते तेथेच फक्त आपण ही कारवाई केली आहे. ही कारवाई लवकरात लवकर निवडणुका घेण्यासाठीच केलेली आहे. ज्यांच्या मुदती संपलेल्या नाहीत. अशा 99 आणि 36 अशा कृषि उत्पन्न बाजार समित्या बरखास्त करण्यात आलेल्या नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी सांगितले की, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीची यादी तयार आहे. जो पर्यंत बाकीच्या कृषि बाजार समितीच्या निवडणुका होत नाहीत तो पर्यंत मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक होऊ शकत नाही. जुन्या याद्या रद्द करून नव्या याद्या येतील तेव्हाच मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणुक आपण घेणार आहात काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, वाशी कृषि उत्पन्न बाजार समितीचा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आलेला आहे. ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांची मुदत संपलेली आहे त्यांच्या निवडणुका ह्या जुन्या यादी नुसारच घेतल्या जातील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, राज्यातील ज्या सहकारी संस्थांच्या कामकाजात आर्थिक अनियमितता आढळून आल्या अशा संस्थांची महाराष्ट्र

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.168...

श्री.धनंजय मुंडे....

सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या कलम 88 अन्वये चौकशी करून संबंधित दोषी वक्तींविरुद्ध संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित केली आहे." तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, अशा किती संस्था आपणाला दोषी आढळल्या आहेत व त्या संस्थेवर आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ? मराठवाडा आणि विदर्भातील तीव्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुदत संपलेल्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका दुष्काळाचे निवारण होईपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यासाठी शासनाची नेमकी भूमिका काय राहणार आहे ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, पहिला मुद्दा कृषि उत्पन्न बाजार समिती सोडून आहे. 675 संस्था अशा आहेत की, त्यांच्याविरुद्ध वेगवेगळ्या प्रकारची कारवाई सुरूआहे. त्यांनी अर्ज दिल्यानंतर त्यांच्या विरुद्धची कारवाई स्थगित करण्यात आली आहे. या 675 संस्थांबाबत स्थगिती देण्यात आली आहे. त्यांचा स्टे तातडीने उठविता येत नाही. त्यामुळे त्यांच्या सुनावण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. एका संस्थेला अर्ध्या तासाची तीन वेळा सुनावणी द्यावी लागणार आहे. ही बराच काळ प्रलंबित राहिलेली लांबलचक प्रक्रिया आहे. पण ती पूर्ण करण्यात येईल. एकेका संस्थेची अर्ध्या तासाची 3 वेळा सुनावणी घेऊन आवश्यक तो निर्णय आम्ही त्या त्या क्षणी घेणार आहोत. ही संख्या मोठी असल्यामुळे आता पर्यंत 35 संस्थांची एकदाच सुनावणी झालेली आहे. तीन सुनावणी एकेका संस्थांची घ्यायची आहे. मराठवाड्यातील दुष्काळ लक्षात घेऊन येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात अशी आता मागणी करण्यात आली आहे. सदर निवडणुका आता पुढे ढकलता येणार नाहीत. कारण आपण उच्च न्यायालयामध्ये 31 डिसेंबर पर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सहा महिन्यांची मुदतवाढ मिळण्यासाठी आपण कायद्यामध्ये बदल करणार आहोत. त्यासंबंधीचे विधेयक आज आपल्या समोर आहे. आपल्याला या निवडणुका पुढे ढकलता येणार नाहीत. त्या आपल्याला घ्याव्या लागतील.

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, बाजार समित्यांच्या संचालकांची मुदतवाढ संपल्यामुळे त्यावर प्रशासकाची नेमणूक केल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. संचालक मंडळ निवडणुकीच्या माध्यमातून निवडून आलेले आहे. असे मंडळ मुदत संपल्यामुळे बरखास्त



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.167...

श्री.दिलीप देशमुख....

करण्यात यावे अशा प्रकारच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. माझ्या लातूरचे उदाहरण घेतले तर तेथील कृषि उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक नेमण्यात आलेला आहे. त्याबद्दल माझे काहीही म्हणणे नाही. वर्तमानपत्रामध्ये अशी चर्चा आहे की, त्यांच्यामुळे मुदती संपलेल्या नाहीत. सरकारच्या अडचणीमुळे निवडणुका घेतलेल्या नाहीत. ते निवडून आलेले संचालक मंडळ आहे. ते संचालक मंडळ मुदत संपल्याचे कारण पुढे करून बरखास्त करणे योग्य नाही. मधल्या काळात तेथे इतर राजकीय लोकांची व्यवस्था करण्यासाठी संचालक मंडळ आणण्याच्या हालचाली चालल्या आहेत असे वर्तमानपत्रात आलेले आहे. त्यासंबंधी शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कुठल्याही प्रकारे राजकीय लोकांची सोय लावण्याची शासनाची भूमिका नाही. वाशीमध्ये आपण 3 जणांचे प्रशासकीय मंडळ नेमल आहे. हे तिन्ही सरकारी अधिकारी आहेत. 1 किंवा 3 सरकारी अधिकारी नेमून निवडणुका घेतल्या जातील याची आपण खात्री बाळगावी.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सर्व निवडणुका ह्या जुन्या यादीप्रमाणेच घेण्यात येणार आहेत असे सूचित करण्यात आले आहे. आता सहकारी सोसायट्यांच्या निवडणूका जाहीर झाल्या आहेत. या सहकारी सोसायट्या बाजार समितीवर देखील मतदान करतात. जिल्ह्या बँकेवर देखील मतदान करतात. त्यासाठी आपण जुनीच यादी ग्राह्य धरणार आहात काय ? असे जर असेल तर मग निवडणुका जाहीर तरी कशाला केल्यात.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, जे कृषि उत्पन्न बाजार समितीला मतदार असतात अशांच्या निवडणूका आता सुरू आहेत. प्रामुख्याने "क" आणि "ड" वर्गाच्या निवडणूका 31 डिसेंबर पर्यंत पूर्ण करावयाच्या आहेत. "अ"आणि "ब"वर्गाच्या निवडणूका 31 मार्च पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नवीन यादी करणार आहात काय असे विचारले आहे. जुनी याचा अर्थ या निवडणूका होऊन जी मतदार यादी तयार होत आहे त्याप्रमाणे निवडणूका घेणार आहोत.

...6

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प.क्र.167.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच मंत्री महोदयांनी सहकारी संस्थांसंबंधी माहिती दिली आहे. ज्याप्रमाणे सहकारी सोसायट्या आहेत त्याप्रमाणेच बऱ्याच ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत. त्या ग्रामपंचायतींच्या निवडणूका झाल्यानंतर त्यांची नावे मतदार यादीत येतील काय किंवा जुन्याच नावावर निवडणुका लढविल्या जाणार आहेत काय ?

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 167.....

श्री.सुनील तटकरे :सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीमधील मतदारसंघामध्ये एक मतदारसंघ ग्रामपंचायतीमधून येत असतो. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. फुंडकरसाहेब ग्रामपंचायतीच्या यादीबाबत विचारणा करीत आहेत.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक गट हा ग्रामपंचायत सदस्यांचा असतो. आता ज्या ठिकाणी ग्रामपंचायतीच्या निवडणुका होतील त्या निवडणुकांमधून आलेला मतदारच त्या यादीत येईल. यासंदर्भातील कटऑफ डेट ही 30 जून, 2015 राहणार आहे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, ज्या बाजार समित्यांची मुदत संपली होती अशा बाजार समित्यांवर आपण प्रशासक नेमलेला आहे. परंतु काही बाजार समित्यांमध्ये भ्रष्टाचार झाला असल्याच्या तक्रारी शासन दरबारी प्राप्त झालेल्या आहेत. नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे त्यामुळे अशा ज्या बाजार समित्यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे त्यांच्यावर शासन तत्काळ कारवाई करणार आहे काय ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, ज्या ज्या सन्माननीय सदस्यांच्या लेटरहेडवर भ्रष्टाचाराच्या संदर्भात तक्रार येईल त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. ज्या ज्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये भ्रष्टाचार असेल व त्याचे सविस्तर निवेदन लेटरहेडवर असेल तर अशा सर्व बाजार समित्यांवर कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. प्रभाकर घार्गे : सभापती महोदय, दिनांक 30 जून, ही मतदार यादीची कटऑफ डेट असणार आहे अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्याला दिलेली आहे. परंतु ही कटऑफ डेट 30 जून, 2014 राहणार आहे की, 30 जून, 2015 राहणार आहे ? राज्यामध्ये 170 मार्केट कमिट्या बरखास्त झालेल्या असून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती वर संचालक म्हणून राज्यातील सर्व कृषीबाजार समितीच्या संचालकाकडून निवड होत असते. त्यामुळे या निवडणुका कधी घेतल्या जाणार आहेत ?याही अगोदर "क" आणि "ड" मार्केट कमिटीच्या निवडणुका 31 डिसेंबर, 2014 पर्यंत पूर्ण कराव्या लागणार आहेत. त्यामुळे यातून तीन प्रश्न तयार होतात. तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकांची कटऑफ डेट काय राहणार आहे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची डेट कोणती राहणार आहे, "अ" आणि "ब" मार्केट कमिटीची कटऑफ डेट मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी कोणती राहणार आहे ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 167.....

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी निवडणूक घेण्याची कटऑफ डेट 30 जून सांगितलेली आहे. मतदार यादींची कटऑफ डेट ही त्या त्या कृषी उत्पन्न बाजार समिती प्रमाणे त्यांच्या तारखा कधी कधी संपल्या आहेत त्या प्रमाणे राहणार आहेत. दि.30 जून, 2015 पर्यंत आपल्याला या सर्व निवडणुकांचे काम पूर्ण करावयाचे असून त्यासंदर्भात शासनाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केलेले असल्यामुळे आपल्याला निवडणुकाचे काम 30 जून, 2015 पर्यंत पूर्ण करावयाचे आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : अधिवेशन सुरु झाल्यापासून आज पहिल्यांदाच प्रश्नोत्तराचा तास झाला. आजच्या प्रश्नोत्तराच्या तासात केवळ सहाच प्रश्न चर्चेला गेले आहेत. आम्ही दिलेले प्रश्न फार महत्वाचे होते.

**सभापती** : अन्य मार्गाने आपण प्रश्न उपस्थित केले तर मी आपल्या प्रश्नांना जरूर न्याय देण्याचा प्रयत्न करेन.

<u>विरोधी पक्षनेते यांच्या निवडीबाबत</u>

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, अधिवेशन सुरु झाल्यापासून म्हणजे तीन दिवसापासून विरोधी पक्षाच्या नेत्याची नियुक्ती आपल्या मार्फत केली जावी यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. यासंदर्भातील मागणीपत्रही आपल्याकडे सादर करण्यात आलेली आहेत. या विषयाच्या संदर्भात काल कामकाजात चर्चाही झाली होती. आमच्या माहिती प्रमाणे सत्ताधारी बाकाकडून सुध्दा या विषयाचा निर्णय लवकर व्हावा अशाच पध्दतीची इच्छा प्रदर्शित केली गेली.या तीन दिवसात या सभागृहात राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे विषय चर्चेला गेले.दुष्काळाचा विषयही या तीन दिवसात चर्चेला गेला.असे असताना सभागृहात विरोधी पक्ष नेत्याची नेमणूक न झाल्यामुळे या चर्चेत सहभागी होतांना मोठी कमतरता राहून गेली आहे अशा पध्दतीची भावना निर्माण झालेली आहे. त्यामुळे सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्याची निवड करण्याबाबत आम्ही पुन्हा एकदा आपल्याला विनंती करीत आहोत. या सभागृहातील विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीची घोषणा आज आपल्याकडून झाली तर सभागृहाच्या कामकाजात आम्हाला अधिक चांगल्या प्रकारे सहभागी होता येईल.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सरकारमध्ये या राज्यातील मराठा व मुस्लीमांना आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीचा प्रश्न उपस्थित केला आहे. या विषयाच्या संदर्भात काल सभागृहात चर्चा झाली होती. मी काल सुध्दा या विषयाच्या संदर्भात वस्तुस्थिती सांगण्याचा प्रयत्न केला होता. या विषयाचा निर्णय लवकरात लवकर व्हावा असे मलाही वाटते. हा निर्णय लवकरात लवकर कसा होईल यादृष्टीने मी जरुन प्रयत्न करीन.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..4..

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहात राष्ट्रवादी पक्षाची सदस्य संख्या जास्त असल्यामुळे नियमाप्रमाणे आमच्या पक्षाकडे विरोधी पक्ष नेत्याचे पद आले पाहिजे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आपल्याला जो निर्णय घ्यावयाचा आहे तो घ्यावा परंतु तो निर्णय आजच द्यावा.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भात काल मी या सभागृहात बोललेलो आहे. माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचा व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व सदस्यांच्या सहीचा अर्ज आलेला आहे. त्याच बरोबर सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनीही या विषयाच्या संदर्भात माझ्याकडे अर्ज दिलेला आहे. दोन्ही अर्जाचा मला यथायोग्य निर्णय घेणे गरजेचे असल्यामुळे यासाठी लागणारा जो वेळ आहे तो पूर्ण झाला की, मी या सदनात विरोधी पक्ष नेत्याचा निर्णय जरूर जाहीर करीन. याविषयाच्या संदर्भात मला कोणी जास्त मार्गदर्शन करण्याची आवश्यकता नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज करीत असताना ज्या प्रमाणे सरकारची गरज असते त्या प्रमाणे विरोधी पक्ष नेत्याचीही गरज असते. आम्ही या सभागृहात 11 करोड जनतेचे प्रश्न मांडीत असताना विरोधी पक्ष नेता असावा अशी गरज या सरकारला वाटत नाही. आपल्याला जशी मंत्री पदे गरजेची आहेत तेवढाच मान सन्मान विरोधी पक्षालाही असतो. परंतु या ठिकाणी ज्या पध्दतीने प्रश्न मांडले जात आहेत ते योग्य नाही.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विरोधी पक्ष नेता निवडीचा विषय या ठिकाणी उपस्थित केला आहे. त्यांचा विषय आपण ऐकून घेतला व या विषयाच्या संदर्भात लवकर निर्णय घेण्यात येईल असा निर्णय दिलेला आहे. दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांना चर्चा करावयाची आहे. त्यामुळे इतर कामकाज थाबवून दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा सुरु करावी अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्याची नेमणूक कशी होते याची एक प्रोसीजर आहे. जो पक्ष सत्ताधारी पक्षाला पाठिंबा देत नाही आणि ज्या विरोधी पक्ष सदस्यांची संख्या जास्त असते त्या पक्षाचा विरोधी पक्ष नेता असतो. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्याने सत्ताधारी पक्षाला पाठिंबा देत असल्याचे पत्र आपल्याकडे दिले आहे काय ? त्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.शरद पवार साहेब, तसेच सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आमचा सरकारला पाठिंबा असल्याचे पत्र आपल्याकडे दिले असेल तर डिस्प्यूट होऊ शकतो. पण त्यांनी तशा आशयाचे पत्र दिल्याचे माझ्या ऐकिवात नाही. त्यांनी आपल्याकडे तसे पत्र दिले असेल तर ते सभागृहाला समजले पाहिजे. या संदर्भातील माहिती जाणून घेण्याचा आम्हाला अधिकार आहे.

सभापती महोदय, हे वरिष्ठ सभागृह आहे. या वरिष्ठ सभागृहाची शान आणि मान आपण राखली पाहिजे. काँग्रेस पक्षाला इतर पक्षांनी पाठिंबा दिलेला आहे काय ? मी कालच येथे सांगितले की, इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाला शेतकरी कामगार पक्ष, लोकभारती पक्षाने किंवा सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्या पक्षाने पाठिंबा दिलेला आहे काय ? माझी आपणास विनंती आहे की, अशातऱ्हेचे चित्र महाराष्ट्राच्या जनतेसमोर जाणे योग्य नाही. हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहाला एक प्रतिष्ठा आणि शान आहे. या सभागृहाची शान राखण्यासाठी आपण सभागृहाचे कामकाज पाच-दहा मिनिटे थांबवावे व त्या कालावधीत आपल्या दालनात या प्रश्ना संदर्भातील तोडगा आजच काढावा अशी माझी आपणास विनंती आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देत असतात. )

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी कोणाचा कोणत्या पक्षाला पाठिंबा आहे असा उल्लेख केला. मला आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते यांचे काही भाष्य चॅनेलवर प्रसिद्ध झालेले आहे. तेव्हा आपण या सर्व बाबींची शहानिशा करून नंतर योग्य तो निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी येथे नव्याने युक्तीवाद करण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी येथे भूमिका मांडली. मी काल सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रदेशाध्यक्ष म्हणून आणि या सभागृहाचा सदस्य म्हणून सांगितले होते की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने सत्ताधारी पक्षाला पाठिंबा दिलेला नाही. आम्ही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या दिवशी देखील त्याचा उल्लेख केला. राज्यात अस्थिरता राहू नये म्हणून आम्ही सरकारला बाहेरुन पाठिंबा देण्याची भूमिका घेतली तसेच आम्ही विरोधी पक्षाची भूमिका बजावणार आहोत हे देखील स्पष्ट केले. शिवसेना पक्ष सत्तेत सहभागी झाला त्यामुळे सरकारच्या अस्थिरतेचा प्रश्न राहिलेला नाही. आपण आमच्या पक्षाला बसण्यासाठी ही जागा दिली असेल तर सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना हा प्रश्न विचारण्याचा अधिकार राहिलेला नाही हे मला या निमित्ताने सांगायचे आहे. आम्हाला ही आसन व्यवस्था दिलेली आहे याचा अर्थ या बाजूवर बसण्यासाठी आपल्याकडून विधानमंडळामार्फत कबुली आली असा त्याचा अर्थ आहे. या संदर्भात आपण निर्णय घ्यावयाचा आहे. संख्याबळाचे निकष स्पष्ट झाले पाहिजेत. विरोधी पक्षाची निवड कशाच्या आधारे होते हे देखील आम्हाला समजले पाहिजे. ते जर आता समजले किंवा या संदर्भात आपणास केव्हा निर्णय द्यायचा आहे ते आम्हाला समजले पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न नाही. सभागृहाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असल्यामुळे या संदर्भात तातडीने नव्हे तर आताच निर्णय होणे आवश्यक आहे अशी माझी मागणी आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात. )

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी येथे सांगितले की, विधानपरिषद सभागृहात सन्माननीय सदस्यांसाठी बसण्यासाठी आसन व्यवस्था विधानमंडळामार्फत करण्यात येते. आम्हाला बसण्यासाठी कोणती आसने दिलेली आहेत याची सूचना विधिमंडळाकडून दिली जाते. आम्हाला बसण्यासाठी विरोधी पक्षातील आसने दिलेली आहेत आणि विरोधी पक्ष नेत्याचे स्थान रिक्त ठेवलेले आहे. आम्हाला विरोधी पक्षामध्ये बसण्यासाठी आसन व्यवस्था दिली याचा अर्थ आमची विरोधी पक्षाची भूमिका विधिमंडळाला मान्य झालेली आहे आणि त्याप्रमाणे आसन व्यवस्था झालेली आहे. तेव्हा सर्व संकेताला धरुन विरोधी पक्ष नेते पदासाठी आम्ही जो विनंती अर्ज दिलेला आहे त्या संदर्भात आपण तत्काळ निर्णय द्यावा अशी माझी मागणी आहे.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी या ठिकाणी सांगितले की, आम्ही पाठिंबा दिलेला नाही. ठीक आहे ते आता तसे बोलले. परंतु दिनांक 12 नोव्हेंबर, 2014 रोजी विधानसभेमध्ये भारतीय जनता पक्षाचे 122 सदस्य असताना सरकारने कोणत्या पक्षाच्या पाठिंब्यांवर बहुमत सिद्ध केले याचे उत्तर त्यांनी द्यावे. त्यांनी त्याची शहानिशा करावी आणि मगच उत्तर द्यावे. त्यांच्या पक्षाचा सरकारला पाठिंबा होता.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी या ठिकाणी एक वेगळा मुद्दा उपस्थित केला आहे. विधानसभा सभागृहात सत्तारुढ पक्षाने विश्वासदर्शक ठराव मांडला त्यावेळी काय घडले असे त्यांनी विचारले आहे. मला वाटते या बाबतची माहिती त्यांच्यासारख्या ज्ञानी व्यक्तीला असणे मला अभिप्रेत आहे. सभागृहात काल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये बोलताना मी सांगितले की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडण्यात आलेल्या अभिनंदनाचा ठरावच असमाधानकारक आहे. या ठिकाणी शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब बसलेले आहेत. माननीय राज्यपाल ज्यावेळी अभिभाषणासाठी सभागृहात येत होते त्यावेळी शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी त्यांना येण्यास प्रत्यवाय केला होता. आज शिवसेना पक्ष सत्तेमध्ये आहे. त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव या संयुक्त सरकारला मांडता येणार नाही, अशी भूमिका मी काल मांडली होती आणि आजही त्यावर ठाम आहे. मी निदर्शनास आणून देतो की, या सरकारचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानाने पारित झाला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने त्या प्रक्रियेत कोठेही भाग घेतला नाही. ही बाब रेकॉर्डवर सुध्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या बाबत मी कालच सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने सविस्तरपणे उत्तर दिले होते. मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे हे त्यावेळी कदाचित सोयीनुसार बाहेर गेले असतील, त्यांनी ऐकून न ऐकल्यासारखे केले असेल किंवा त्यांना या बाबतची माहिती असूनही त्यांना तो मुद्दा आज पुन्हा उपस्थित करावयाचा असेल. पण या बाबतची स्पष्टता ही त्याच वेळी निश्चितपणे आलेली आहे. त्यामुळे वारंवार अशा पध्दतीची चर्चा करुन, सभागृहाच्या प्रतिष्ठेचा जो महत्त्वाचा भाग आहे तो टाळता कामा नये, अशी माझी आग्रहपूर्वक विनंती आहे. मी मघाशीच विचारले की, या बाबतचा निर्णय कोणत्या निकषाच्या आधारे घेतला जातो या बाबतची माहिती मिळावी आणि तो निर्णय आज आणि आताच येथे जाहीर करावा अशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची मागणी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, त्यांनी त्यांची भूमिका मांडलेली आहे. सभापती महोदय, आपण सुध्दा सांगितले की, हा सर्व विषय तपासून घेतो. वास्तविक पाहता सभागृहात दुष्काळासारख्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा होत असताना ती चर्चा होऊ द्यावी व माननीय सभापतींना सदरहू बाब तपासून घेण्यास थोडा वेळ द्यावा.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींच्या आसनासमोर घोषणा देतात. )

**सभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 25 मिनिटांसाठी तहकूब करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.34 वाजता 25 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

--------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून मोठ्याने बोलत असतात.)

**सभापती** : माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सभागृहात राज्यातील दुष्काळाच्या स्थितीबाबत महत्त्वाची चर्चा सुरू होती. सर्व पक्षीय सन्माननीय सदस्यांचा आग्रह होता की, माननीय मंत्र्यांनी त्या संदर्भातील उत्तर द्यावे. कारण ते उत्तर आवश्यक आहे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) साहेब दुष्काळाच्या चर्चेच्या संदर्भातील उत्तर देण्यासाठी सभागृहात आले आहेत. माझी विनंती आहे की, दुष्काळावरील चर्चेला सुरूवात करावी. परंतु, त्या चर्चेला थोडी मर्यादा ठेवावी. वेळेत चर्चा संपवून माननीय मंत्र्यांचे उत्तर घ्यावे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझी माननीय मंत्र्यांच्या बोलण्यावरच हरकत आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना बोलण्यास परवानगी दिली आहे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सभागृहाला कल्पना आहे की, वेगवेगळ्या विषय आहेत. काही विषयांवर सभागृहात चर्चा करता येत नाही म्हणून सर्व सन्माननीय गटनेत्यांना बोलावून घेऊन काही नेमणुकांच्या संदर्भात आपण आपल्या दालनात चर्चा केली आहे आणि त्या संदर्भात सभागृहात सांगितले आहे. आज दुष्काळापेक्षा आणि त्यावर मिळणाऱ्या उत्तरापेक्षा काही महत्त्वाचे आहे, असे मला वाटत नाही. महाराष्ट्रातील जनता दुष्काळाच्या चर्चेवरील उत्तराची वाट पाहत आहे. त्यामुळे अगोदर माननीय मंत्र्यांचे उत्तर होऊ द्यावे. मी कोणत्याही बाकीच्या विषयाला कमी महत्त्व देत नाही. सभागृहात आपण निर्णय दिला आहे. येत्या 2-3 दिवसांत विरोधी पक्षनेत्यांच्या निवडीचा कार्यक्रम करण्यात येईल. माझी सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांना विनंती आहे की, आपण चर्चा केली आहे. आपण त्या संदर्भात संमती दिली आहे. मी हा विषय नाकारीत नाही. सर्व सन्माननीय गटनेत्यांना बरोबर घेऊन माननीय सभापती 1-2 दिवसांत या संदर्भातील निर्णय करतील. आम्ही त्याला मान्यता दिली आहे. दुष्काळपेक्षा, त्या संदर्भातील

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिरीष बापट ....

उत्तरापेक्षा जास्त महत्त्व कोणत्याही विषयाला असू शकत नाही. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य कालपर्यंत म्हणत होते की, दुष्काळ हा विषय महत्त्वाचा आहे. माननीय मंत्र्यांचे उत्तर येऊ द्यावे. (गोंधळ) त्यानंतर विरोधी पक्षनेत्यांचा मुद्दा आहे. तो कमी महत्त्वाचा आहे. माझी आपल्याला या संदर्भात विनंती आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. गिरीष बापट साहेबांनी भावना व्यक्त केल्या आहेत. दुष्काळाचा विषय महत्त्वाचा असल्यामुळे या संदर्भातील चर्चा होऊ द्यावी, अशी विनंती केली आहे. मी त्यांना आठवण करून देऊ इच्छितो की, आपण आता जे बोललात त्याचे स्मरण काल सकाळी 11 वाजता आपल्याला असते तर बरे झाले असते. विधानपरिषदेच्या नेत्याची, उप नेत्याची निवड बाब काल आपल्याला दुष्काळापेक्षाही गंभीर वाटली. आपण कालच्या गोंधळात विधानपरिषद नेतेपद जाहीर केले. विधानपरिषद नेत्याची, उपनेत्याची निवड हा विषय दुष्काळापेक्षा गंभीर वाटला होता.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, ती निवड लहान होती.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी तुमच्या निवडीबद्दल आक्षेप घेत नाही. भाजपात अंतर्गत निवडीबद्दल आक्षेप असेल तो भाग वेगळा आहे. मी त्याबद्दल भाष्य करीत नाही. मी एवढेच बोलतो की, आपण काल गोंधळामध्ये सकाळी 11 वाजता नियम 289 अन्वये सभागृहात दुष्काळाची चर्चा झाली पाहिजे असा आग्रह विरोधी पक्षाच्या वतीने करण्यात आला, सर्वजण वेलमध्ये उतरले त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांकडून सभागृहाच्या नेत्यांची व उप नेत्यांची घोषणा करून घेतली. ती बाब जशी अत्यावश्यक होती तशी ही बाबही अत्यावश्यक आहे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, ते एकमत होते.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एकमताचा संबंध काय आहे ?

(गोंधळ)

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे ज्या विषयाची चर्चा करीत आहेत, त्या विषयी सर्वांना बरोबर घेऊन निर्णय घ्यायचा आहे. त्यामुळे चर्चेला वेळ लागणार आहे. परंतु, तरीही तो कार्यक्रम आपल्याला करायचा आहे. आपल्या उपस्थितीत त्याची

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिरीष बापट ....

चर्चा झाली आहे. विधानपरिषदेतील नेत्याची निवड हा काही वादाचा, चर्चेचा मुद्दा नव्हता. त्यामुळे तो एक मिनिटामध्ये झाला. माननीय मंत्रीच उत्तर देणार आहेत म्हणून त्यांची नेमणूक केली. आपण ज्या विषयाच्या संदर्भात मतभेद आहेत त्या विषयांवरील चर्चा नेहमी दालनात बसून करतो. त्यामुळे तेही केले आहे. आपण त्याचा निर्णय दिला आहे. मी संसदीय कार्यमंत्री म्हणून 3 दिवसांपूर्वी माननीय सभापतींना पत्र दिले आहे की, विरोधी पक्षनेत्यांची निवड सभागृहात करण्याच्या संदर्भातील विषय अजेंड्यावर घ्या. ते पत्र रेकॉर्डला आहे. आपण तपासू शकता. आम्ही त्या विषयाला प्राधान्य देत नाही असे नाही. परंतु, यापेक्षा देखील दुष्काळाचा विषय महत्त्वाचा असल्यामुळे त्याची चर्चा होऊ द्यावी. महाराष्ट्रातील जनता विरोधी पक्षनेत्यांच्या निवडीकडे निश्चित लक्ष देईल पण त्याहीपेक्षा दुष्काळाच्या संदर्भात कोणते पॅकेज मिळत आहे याकडे लक्ष देईल. माझी आपणाला पुन्हा पुन्हा या संदर्भात विनंती आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, तुम्हाला हे महत्त्वाचे वाटत नाही का ?

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, आम्हाला ही बाब महत्त्वाची वाटत आहे, म्हणून पत्र दिले आहे. विरोधी पक्षनेत्यांची निवड करण्याच्या संदर्भातील सर्व अधिकार माननीय सभापतींना दिले आहेत. ते सर्वांना एकत्र बोलावून निवड करणार आहेत. विरोधी पक्षनेत्यांची निवड शेवटी त्यांच्या माध्यमातून होत असते.

(गोंधळ)

**सभापती** : मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाचा विरोधी पक्षनेता निवडीचे सर्वाधिकार सभापतींचे असतात. मला याबाबत ज्यांच्याकडून सल्ला घ्यायचा असेल त्यांना बोलावून मी तोही घेऊ शकतो. काल सभागृहामध्ये या अनुषंगाने माझ्या काही मित्रांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मी सदनात सांगितले की, माझ्याकडे याबाबतीत दोन निवेदने आली आहेत. पहिले निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांचे आहे. सदर निवेदन सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांना सभागृहाचे विरोधी पक्षनेता करा असे आहे. दुसरे निवेदन सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी दिले आहे. सदर निवेदनही मला मिळाले आहे. सदर बाबतीत बाबी तपासणे आवश्यक असतात याची पूर्ण

..4

**सभापती** ....

जाण असणारा मी आहे. खाली बसून बोलण्याची पध्दती आपण टाळली पाहिजे. मला वाटते की, आपण याबाबतीत बोलत आहात, अशा पध्दतीने हा प्रश्न सुटण्याची शक्यता नाही. मी याबाबतीत सविस्तर चर्चा करीन, माहिती घेईन, नियम पडताळून पाहीन आणि निर्णयाप्रत येईन. माझ्याकडून एक टक्काही कोणावर अन्याय होणार नाही, एवढे मी सभागृहाला सांगतो. पण सभागृहामध्ये असेच झाले पाहिजे असे बंधन सभापतींवर टाकलेले मी कधी बघितलेले नाही. मी दोन्ही सभागृहांमध्ये जवळजवळ 37 वर्षे असणारा जुना सभासद आहे. आग्रह, अट्टाहास करा, पण त्याला काही मर्यादा ठेवा. काल मला या विषयी सांगितले त्यानंतर मी तुम्हाला सांगितलेले आहे की, आयुष्यात आतापर्यंत कोणत्याही नियमांच्या संदर्भात मी अन्याय केलेला नाही. मलाही याची खात्री आहे. तुमची अपेक्षा आहे की, याच क्षणी  करावे. पण हे ठीक नाही. मी दोन्ही निवेदनाच्या अनुषंगाने चर्चा करतो. आणखी काही माहिती लागली तर सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे यांच्याकडून घेतो आणि हा निर्णय लवकरात लवकर कसा होईल हे मी पाहतो. माझ्यावर दडपण आणणे योग्य नाही. मी बाहेर जरूर तुमचा मित्र आहे. पण ज्या क्षणापर्यंत येथे सभागृहाचा सभापती आहे, त्या क्षणापर्यंत अत्यंत शिस्तीने वागेन. माझ्याकडून कोणताही अन्याय होणार नाही, हे मी अभिवचन देतो. पण आताच हे करा, या पध्दतीने आपण आग्रह धरू  नये, अशी माझी आपणा सर्वांना विनंती आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण उभे असताना मी सभागृहात प्रवेश केला, त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण या ठिकाणी भावना व्यक्त केल्यानंतर त्या संदर्भात कोणतीही टिप्पणी करणे योग्य नाही, याची आम्हाला जाणीव आहे. आपण एक ऋषीतुल्य, ज्येष्ठ आणि अभ्यासू नेते आहात. माझ्यासारखा कार्यकर्ता आपल्या मार्गदर्शनामधूनच घडला आहे, याचाही उल्लेख मी वेगळ्या राजकीय पक्षामध्ये असलो तरी विनम्रपणे नेहमीच केला आहे.

सभापती महोदय, आज आम्ही आपल्याकडे न्याय मागतो आहोत. लोकशाहीमध्ये असे म्हटले जाते की, जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाईड. न्यायाच्या प्रक्रियेला विलंब याचा अर्थ न्याय मिळणार नाही, असे सर्वत्र म्हटले जाते. आपण आता असे म्हणाला की, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याकडून आपण काही माहिती घेणार आहात. जरूर अशा प्रकारची माहिती घेण्याचा आपल्याला अधिकार आहे. परंतु, त्यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने आमच्याकडूनही काही माहिती आपल्याला अभिप्रेत असेल तर ती आपण घ्यावी. कारण, कोणतीही माहिती ही एकांगी नसावी.

सभापती महोदय, कालपासून या सभागृहात आमच्या मित्रपक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून काही मांडणी होत आहे, आमच्या हेतू बद्दल, आमच्या विचारांबद्दल काही शंका उपस्थित केल्या जात आहेत. त्याचे आम्ही वारंवार खंडन देखील केले आहे.

सभापती महोदय, आपण जे बोलला ते विनम्रपणे मान्य करून मला एवढेच सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याकडून माहिती जाणून घेण्याचा आपल्याला नक्की अधिकार आहे. परंतु, त्याबरोबरच आमच्याकडूनही माहिती जाणून घेतली जावी, अशी विनम्र प्रार्थना मी आपल्याला करतो.

सभापती महोदय, एक नक्की आहे की, आजच निर्णय द्या, अशा भावना आम्ही मांडतो आहोत. मात्र, आपण कधी निर्णय द्यायचा, हा आपला अधिकार आहे. सन्माननीय संसदीय कार्यमंत्री

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे..........

श्री.गिरीष बापट यांनी काही विधान केले आहे. परंतु, मी त्यांना सांगू इच्छितो की, या पूर्वी त्यांनीही याच विषयावर दोन-तीन दिवस कामकाज बंद पाडलेले आहे, याचीही माहिती आमच्याकडे आहे. मी या विषयामध्ये राजकारण करु इच्छित नाही. या सभागृहात तेच घडले आहे आणि विधानसभेतही तेच घडले आहे. पण त्याची आठवण एवढ्यासाठीच करून देतो की, सोयीनुसार आपण काही विसरु नये.

सभापती महोदय, मी माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीष बापट आणि माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचा आभारी आहे. त्यांनी सत्तारुढ पक्षाच्या वतीने आपल्या भावना आपल्याकडे व्यक्त केल्या आहेत. परंतु, पुन्हा एकदा सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा उद्रेक झाल्यानंतर त्यामधून पडणारे प्रतिबिंब हे कदाचित अवमानकारक वाटू शकेल. आताही सन्माननीय सदस्यांच्या अशा भावना आहेत की, निर्णय दिल्यानंतर सभागृहातून बर्हिगमन करावे. त्यांनाही मी विनंती करतो की, बर्हिगमन करणे बरोबर नाही. सभापती महोदयांनी व्यक्त केलेल्या भावनांबद्दल आपल्या मनामध्ये खदखद असू शकेल. पण शेवटी सभापती महोदयांचा मान सर्वोच्च आहे. (गोंधळ) अशी वेळ आपल्यावर सुध्दा अनेक वेळा आलेली आहे. सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री.गिरीश महाजन हे अद्याप विरोधी पक्षात असल्यासारखे वागत आहेत. आता आपण मंत्री झाला आहात. त्यामुळे आम्हाला आमच्या भावना मांडू द्याव्यात.

सभापती महोदय, आमची एवढीच विनंती आहे की, लवकरात लवकर हे डिफाईन करावे. आम्ही वारंवार ही विनंती केली आहे की, या संदर्भातील निवडीचे निकष काय आहेत, हे एकदा सभागृहाला कळू द्या. एवढीच भावना मी व्यक्त करतो.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी मघाशीही सांगितले आणि आताही तेच सांगतो आहे. विरोधी पक्ष नेत्याच्या निवडीसंदर्भात सत्तारुढ पक्षातर्फे संसदीय कार्य मंत्री म्हणून मी 3 दिवसांपूर्वीच आपल्याला पत्र दिलेले आहे. आता या पुढील प्रोसिजर आपल्या मार्गदर्शनाखाली पार पाडली जाणार आहे. ज्या पध्दतीने आपण ही प्रोसिजर पार पाडाल त्यामध्ये आमचे सहकार्य आपल्याला राहणार आहे. तसेच, ही निवड त्वरित करावी, असाही उल्लेख आम्ही त्या पत्रात

...3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना माझी विनंती आहे की, त्यांनी गैरसमज करु घेऊ नये. मागे काय झाले, यासाठी आपण 50 वर्षे मागे जाऊ शकू. परंतु, त्यामध्ये काही अर्थ नाही. राज्यातील एका महत्त्वाच्या विषयावर सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी दोन दिवस चर्चा केली आहे आणि आता त्यांना मंत्री महोदयांच्या उत्तराची अपेक्षा आहे. त्याही परिस्थितीत आपल्या भावना महत्त्वाच्या आहेत व त्याबाबत सभापती महोदयांनी स्पष्टता केली आहे. त्यामुळे आता आपण पूर्णपणे त्यांच्यावर विश्वास ठेऊ आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला अपेक्षित असलेली नेत्याची निवड योग्य वेळी करु

सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीबाबतच्या चर्चेमध्ये एक-दोन सन्माननीय सदस्यांना अद्याप बोलावयाचे आहे. त्यांना जरूर आपल्या भावना मांडू द्याव्यात आणि नंतर उत्तराला सुरुवात करावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : राज्यातील दुष्काळी परिस्थिती संदर्भातील प्रस्तावावर आपण सकाळी 12.00 वाजेपर्यंत चर्चा केली आहे. असा एक विचार होता की, 5-6 सन्माननीय सदस्यांना अद्याप बोलावयाचे आहे, त्यांना संधी द्यावी. परंतु, आपण असेही ठरविले होते की, दुपारी 2.15 वाजता उत्तराला सुरुवात करावी. त्यामुळे आता मंत्री महोदयांनी उत्तराला सुरुवात करावी.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मघाशी ज्यावेळी या विषयावरील चर्चा आपण थांबविली होती त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन हे ऑन लेग होते. किमान त्यांना तरी त्यांचे भाषण पूर्ण करु द्यावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी आपले भाषण दोन मिनिटात पूर्ण करावे.

--------------

...4....



**पृ.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, या विषयावर सर्वश्री माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, धनंजय मुंडे, शरद रणपिसे, राजेंद्र मुळक, चंद्रकांत रघुवंशी, अमरसिंह पंडित, आनंदराव पाटील, रामहरी रुपनवर, अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु...........)

श्री राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, धान उत्पादक किसानों के संबंध में अंतिम बात मैं यही कहना चाहता हूं कि आपने सदन के सभी सदस्यों की बात सुनी है. मेरा विश्वास है कि इस राज्य के सब से ज्यादा जानकार मंत्री जी इस विषय पर उत्तर देने वाले है, जिन्हें पूरे महाराष्ट्र की जानकारी है. मराठवाडा के संबंध में कई बातें आपके सामने रखी गई है. विदर्भ के संबंध में बहुत सारी बातें हमने सदन के सामने पेश की. धान उत्पादक किसानों की क्या दशा है वह मैंने यहाँ पेश की है. मेरा इतना ही निवेदन है कि धान उत्पादक किसानों को बोनस देना बंद किया गया है. यदि आप कृषि उत्पन्न बाजार समिति के माध्यम से जानकारी लेंगे तो आपको मालूम पड़ेगा कि इस साल धान 1200 और 1300 रुपये के भाव में बिका गया है. 1200 और 1300 रुपये में यदि धान बिकेगा तो धान उत्पादक किसान आत्महत्या की ओर प्रवृत्त होगा. मेरा कहना यह है कि आघाडी सरकार ने जो बोनस दिया था वह बोनस जाहिर करना चाहिए. सरसकट सभी किसानों को बोनस मिलना चाहिए, ऐसी मेरी विनती है. किसानों पर जो कर्ज है उस कर्ज की माफी होनी चाहिए, बिजली के बिल की माफी होनी चाहिए. किसान के विद्यार्थियों को छात्रवृत्ती मिलनी चाहिए. जलसंधारण के जो अधूरे काम है, वह काम भी पूरे होने चाहिए, ऐसी मैं विनती करना चाहता हूं और इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

**--------**

...5....



श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) (महसूल, मदतकार्ये व पुनर्वसन मंत्री) : सभापती महोदय, राज्यात या वर्षी अभूतपूर्व पडलेल्या दुष्काळासंदर्भात या ठिकाणी गेल्या दोन दिवसांपासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित, चंद्रकांतजी रघुवंशी, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.अनील सोले, संदीप बजोरीया, राम हरी रुपनवार, पांडुरंग फुंडकर, राजेंद्र जैन, माणिकराव ठाकरे यांनी भाग घेतला असून काही चांगल्या सूचना देखील केल्या आहेत.

सभापती महोदय, नेमेची येतो दसरा, या प्रमाणे राज्यात गेल्या 15-20 वर्षाच्या कालखंडात सातत्याने कोणत्या-ना-कोणत्या भागात दुष्काळी परिस्थिती आहे. ही परिस्थिती राज्यकर्त्यांमुळे निर्माण होते, असे नाही. जगभरामध्ये ग्लोबल वॉर्मिंगमुळे जे काही वातावरणीय बदल होत आहेत, पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे, त्याचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष पारिणाम जगामधील अनेक देशांप्रमाणे आपल्या देशात आणि महाराष्ट्रात होत आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

यानंतर श्री.मा.शिगम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)...

कधी पावसाळा असताना उन्हाळयासारखी स्थिती असते तर कधी उन्हाळा असताना पावसाळयासारखी स्थिती असते. गेल्या 100 वर्षामध्ये जेथे कधी भरपूर पाऊस पडला नाही अशा राजस्थान सारख्या राज्यामध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली. अशा प्रकारे निर्माण होणाऱ्या दुष्काळाच्या संदर्भात कायम स्वरुपी उपाययोजना झाली पाहिजे. ही उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सदनातील सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणामध्ये काही सूचना केलेल्या आहेत. माझ्या भाषणामध्ये मी त्या सूचनांचा उल्लेख करीन.

सभापती महोदय, राज्यामध्ये आणेवारीच्या आताच्या पध्दतीनुसार 19 हजार 59 गावामध्ये टंचाईसदृश्य स्थिती आहे. आपल्या राज्यामध्ये आणेवारीची जुनी पध्दत आहे. या पध्दतीनुसार क्रॉप कटींग होते आणि त्यानुसार आणेवारी काढली जाते. या वर्षी या पध्दतीनुसार आपण आणेवारी काढली. ही पैसेवारीची जुनी पध्दत बदलली पाहिजे अशी अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे. यावर्षी आपण पुण्याचे कमिशनर श्री. विकास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली असून येत्या 3 महिन्यामध्ये त्या समितीचा अहवाल अपेक्षित आहे. तो अहवाल आल्यानंतर राज्यातील आणेवारीची ही जुनी बदलली जाणार आहे. गेल्या अनेक दिवसापासून सातत्याने ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींकडून ही जुन्या कालखंडातील आणेवारीची पध्दत शेतकऱ्यांवर अन्याय करणारी आहे, ही पध्दत सदोष असल्यामुळे ती बदलावी अशी मागणी सातत्याने करण्यात येत असल्यामुळे ही पध्दत बदलण्यात येणार आहे. हंगामी पैसेवारीच्या आधारे 39434 खरीप गावांपैकी 19059 गावामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. मराठवाड्यातील 8139 गावापैकी 8004 गावांमध्ये टंचाईसदृश परिस्थिती आहे. प्राथमिक नजर आणेवारी नुसार अमरावतीमधील 7241 गावापैकी 7241 गावामध्ये म्हणजे शंभर टक्के गावामध्ये टंचाईसदृश परिस्थिती आहे. नागपूर मधील 7796 गावापैकी 2019 गावे, नाशिक मधील 5601 गावापैकी 1882 गावे टंचाईसदृश परिस्थितीमध्ये आहेत. या आकडेवारीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. या सदनामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्यामध्ये दुष्काळ का जाहीर केला जात नाही अशी विचारणा केली. आपल्या राज्यामध्ये क्रॉप कटिंग पध्दतीनुसार वर्षानुवर्षे आणेवारी काढली जाते. पहिली नजर आणेवारी काढली जाते. त्यानंतर अंतिम आणेवारी येण्यासाठी आपल्याला

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)...

15 डिसेंबरची वाट पहावी लागते. 15 डिसेंबरच्या आधी आपण टंचाई जाहीर केली तर केन्द्राची समिती ही टंचाई परिस्थिती मान्य करीत नाही. टंचाई परिस्थिती असलेली ही गावे राज्य सरकारने केन्द्र सरकारला कळविलेली आहेत. 15 डिसेंबर पर्यंत अंतिम आणेवारीची वाट पाहून त्या अंतिम आणेवारीचे सर्टिफिकेट घेऊन पुढची वाटचाल केली जाते. हे नेहमीच ठरविलेले सूत्र आहे. 15 डिसेंबर पूर्वी केन्द्रीय समितीने पहाणी करावी यासाठी मी केन्द्रीय मंत्री महोदय श्री. राधा मोहनसिंग यांना भेटलो. तसेच केन्द्रीय वित्तमंत्री श्री. अरुण जेटली यांना देखील भेटलो. मी त्यांना विनंती केली की, महाराष्ट्रामध्ये अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे 15 डिसेंबर पर्यंत वाट पाहून नंतर मदत करण्याचे ठरविले तर या राज्यातील शेतकरी अधिक होरपळला जाईल. हे केन्द्रीय मंत्र्यांना सांगितल्या नंतर त्यांनी आमची मागणी मान्य केली आणि केन्द्राची समिती आपल्या राज्यात येऊन गेली. आता 14 डिसेंबर नंतर ही समिती आपल्या राज्यामध्ये येऊन राज्यातील विविध भागांना भेटी देऊन पाहणी करणार आहे. प्रत्यक्ष स्थितीचे अवलोकन करुन त्याचा अहवाल केन्द्रीय मंत्रिमंडळाकडे पाठविण्यात येईल आणि आपण जी मागणी केलेली आहे त्या मागणीचा विचार केला जाईल. या संदर्भात राज्य सरकार काही करत नाही असे नाही. राज्यामध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्याच्या आधी जेव्हा नजर आणेवारी आमच्या समोर आली त्यावेळी राज्यातील 138 तालुक्यामध्ये टंचाईसदृश परिस्थिती जाहीर झालेली नव्हती तरी त्या गावासाठी काही सवलती जाहीर करण्यात आल्या. या सवलती स्थायी आदेशा प्रमाणे जाहीर करण्यात आल्या. दुष्काळ पडला की, शासन नेहमीचे आदेश लागू करते हे शेतकऱ्याला देखील माहीत असते.या आदेशामध्ये आपण काही सुधारणा केली. या राज्यातील शेतकऱ्यांकडून सहकारी बँकाकडील कर्ज जबरदस्तीने वसूल केले जाऊ नये, त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन केले पाहिजे, त्याला पुनश्च कर्ज दिले पाहिजे, शेतकऱ्यांच्या कृषी पंपांचे कनेक्शन तोडले जाऊ नये, ते तोडलेले असेल तर जोडून दिले पाहिजे अशा प्रकारचे आदेश देण्यात आले. अजून आपल्याकडे टंचाईच्या संदर्भातील संपूर्ण आकडेवारी यावयाची आहे. शेतक-यांना वीज बिलामध्ये साडेतेहत्तीस टक्के सवलत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आणि तो तत्काळ लागू देखील केला. आतापर्यंत अशा परिस्थितीमध्ये 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेची फी माफ होत होती. परंतु आता या सरकारने 10 वी आणि 12 वीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सरकारने घेतलेले विविध

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)...

निर्णय तत्काळ अमलात यावेत यादृष्टीने सरकारने व्यवस्था केलेली आहे. या झाल्या तात्पुरत्या उपाययोजना. या तात्पुरत्या उपाययोजनामुळे दुष्काळग्रस्ताना दिलासा मिळेल असे नाही. दुष्काळ संपेपर्यंत किवा या वर्षीपुरत्या या तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात असल्या तरी या राज्यामध्ये दुष्काळाचे नाव पुन्हा घ्यावे लागणार नाही यासाठी कायम स्वरुपी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी वेळ लागला तरी त्या उपाययोजनांना आजपासून आपण सुरुवात केली तर पुढील 5-10 वर्षामध्ये त्या पूर्ण होतील. या दीर्घकालीन उपाययोजना पूर्ण झाल्यानंतर एखाद्या वर्षी जरी पावसाचे प्रमाण कमी झाले तरी त्याचा चटका शेतकऱ्याला बसू शकणार नाही. राज्यामध्ये टँकरची, पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात काय स्थिती आहे हे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. अनेक सन्माननीय सदस्यांनी टीका करताना माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विधानाचा उल्लेख केला. माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यामध्ये चाऱ्याची आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई आता तरी नाही, त्याची म्हणावी तशी तीव्रता नाही असे सांगितले. म्हणजे जो चटका आपल्याला पुढच्या महिन्यामध्ये म्हणजे ऊन तापल्यावर बसणार आहे तेवढी तीव्रता आता तरी नाही. पिण्याच्या बाबतीत मराठवाड्याच्या व्यतिरिक्त अन्य कोठेही टँकर लावण्यासारखी परिस्थिती नाही. मराठवाडयाच्या 8 जिल्हयातील विविध भागामध्ये 800 टँकर सुरु आहेत. त्या ठिकाणी टँकरची एक फेरी टाकली तरी ती पुरेशी आहे. नाही तर काही ठिकाणी टँकरच्या 3-4 फेऱ्या टाकाव्या लागतात इतकी पाणी टंचाई असते. म्हणून आज तरी पाण्याची म्हणावी तशी तीव्रता नाही. परंतु पुढील जानेवारी, फेब्रुवारी महिन्यामध्ये ही तीव्रता वाढेल याची शासनाला जाण आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी पाण्याची तीव्रता आज नाही असे जे सांगितले ते या संदर्भात सांगितले.

सभापती महोदय, आजच्या क्षणाला फार कमी क्षेत्रामध्ये चाऱ्याची टंचाई जाणवत आहे. पीक मोठ्या प्रमाणावर आले. हे पीक आल्यानंतर पाऊस गेला. राज्यामध्ये 99 टक्के क्षेत्रात 12 सप्टेंबर नंतर पाऊस पडला नाही. परंतु मधल्या कालखंडामध्ये ज्वारी, मका यासारखे पीक दोन महिन्यामध्ये मोठे झाले, ज्वारी मक्याला कणसे लागली, पण कणसे भरली नाहीत. सोयाबीनला शेंगा लागल्या, पण त्या शेंगामध्ये भरणा झाला नाही. मका मोठा झाला. पण कणसामध्ये बीज

..4..



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 14:20

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)...

निर्माण झाले नाही. हे ज्वारी, मक्याचे पीक चाऱ्यासाठी उपयोगात येणार आहे. म्हणजे आपल्याकडे आज तरी चारा उपलब्ध आहे. मधल्या काळामध्ये राज्यामध्ये अवकाळी पाऊस खूप मोठ्या प्रमाणावर झाला. काही ठिकाणी सलग 3 दिवस अवकाळी पाऊस झाला.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे पाटील......

अवकाळी पावसामुळे जे पीक नष्ट झाले होते ते पुनर्जिवीत झाले. हाती उत्पन्न आले असे नाही तर काही प्रमाणात त्या पिकाचा चाऱ्यासाठी उपयोग होऊ शकेल. चाऱ्याची तीव्रता जाणवणार होती ती या क्षणाला तेवढ्या प्रमाणात जाणवणार नाही. पुढील काळात तीव्रता भासणार आहे. म्हणून या चाऱ्याची तीव्रता भासू नये याकरिता राज्य सरकारने वैरण विकास कार्यक्रम हाती घेतला आहे. वैरण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून 50 कोटी रुपये तरतूद केली आहे. कारण आता चाऱ्याची लागवड केली तर हा चारा 60 ते 65 दिवसात उपलब्ध होईल. काही चारा असा आहे की, तो आपल्याला 90 दिवसानंतर उपलब्ध होईल. जेणेकरुन एप्रिल-मे व जून महिन्यामध्ये हा चारा वापरता येईल. चाऱ्याच्या संदर्भात राज्य सरकारकडून नियोजन करण्यात आले आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाची बाब म्हणजे मराठवाड्यात दुष्काळ आहे. विदर्भातील काही भागात तीव्र दुष्काळाचा चटका भासत आहे. राज्यातील अन्य क्षेत्रातील परिस्थिती चांगली आहे. जळगाव, धुळे, नंदूरबार, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुके, कोकणातील भागात पावसाचे प्रमाण बरे होते. जेथे टंचाईग्रस्त परिस्थिती नाही अशा ठिकाणी चारा उपलब्ध आहे. बाहेरच्या राज्यातून चारा आणावा अशी स्थिती आज नाही. एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयामध्ये चारा हलविला तरी तीव्रता कमी होईल. त्यामुळे चाऱ्याच्या संदर्भात यासाठी निर्धास्त आहोत की, वैरण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून 8 लाख हेक्टर क्षेत्राचे नियोजन आपल्याकडे आहे. आज आम्हाला चारा लागवड करावयाची आहे अशी मागणी करणाऱ्यांना वैरण विकास कार्यक्रमांतर्गत राज्य सरकारच्या मार्फत बियाणे मोफत दिले जाईल. आवश्यकता भासली तर जो चारा लागवड करणार असेल आणि तो चारा सरकारला देणार असेल त्याचे त्या काळातील विहिरीचे देयक सरकार भरणार आहे. म्हणजे चारा लागवड प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून चाऱ्याचा प्रश्न सुटेल.

सभापती महोदय, टँकरबाबत जसजशी आवश्यकता भासेल त्या प्रमाणात व्यवस्था केली आहे. टँकरबाबत आणखी काही व्यवस्था करण्याचा विचार आहे. चाऱ्याची आवश्यकता असल्यास राज्याच्या बाहेर चारा जाणार नाही याची सरकार काळजी घेईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : आमच्या भागातून गुजराथमध्ये चारा पाठविला जात आहे. त्यावर बंदी घालण्यात यावी.

...2...

श्री.एकनाथराव खडसे पाटील : त्याची काळजी घेण्यात येईल. जेणेकरुन राज्यातील कोणतेही जनावर किंवा गुरे चाऱ्याविना तडफडून मरणार नाही. पिण्याच्या पाण्याच्या टँकरबाबत असे लक्षात आले की, मागील काळात अनेक ठिकाणी टँकर लॉबीकडून कृत्रिम टंचाई दाखविली जाते. म्हणून या वर्षी जीपीएस सिस्टीमच्या माध्यमातून किती फेऱ्या मारण्यात आल्या, कोणत्या भागात फेऱ्या झाल्या याची बायोमेट्रिक पध्दतीने गावामधील प्रतिनिधींचे अंगठ्याचे ठसे घेऊन नोंदणी करणे, ऑनलाईन माहिती पोहोचवून आवश्यकता असेल तेथे टँकर लावण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी देणे, त्याच्यापुढील टप्प्यामध्ये प्रांत अधिकारी आणि त्यानंतर तहसीलदार अशा तीनही ठिकाणी टँकर लावण्याची परवानगी देणार आहोत.

सभापती महोदय, चाऱ्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की, सरकारच्या माध्यमातून चारा उपलब्ध करुन दिला जाईल. परंतु मागील काळातील या संदर्भातील अनुभव चांगला नव्हता. चारा छावणीमध्ये किंवा छावणीतून दावणीमध्ये आणि दावणीतून छावणीमध्ये अशा प्रकारची चर्चा सभागृहात केली गेली. चारा उपलब्ध झाला पाहिजे, परंतु गैरव्यवहाराला आळा बसला पाहिजे या दृष्टीने राज्य सरकारच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. ज्या ठिकाणी विहिरींना काही प्रमाणात पाणी उपलब्ध आहे तेथे चारा लागवड करु शकतील. काही विहिरी पिण्याच्या पाण्यासाठी अधिग्रहित करण्यात येतील. असे निदर्शनास आले की, 2013 व 2014 मध्ये ज्या विहिरी आणि बोअरवेल अधिग्रहित केल्या होत्या त्या ठिकाणची बिले दिली गेली नव्हती. त्यांच्याकडून दररोज 400 रुपये भाडे या दराने विहिरी घेतल्या होत्या. त्याचे पैसे विहिरीच्या मालकांना दिले नाहीत. एक वर्ष गॅप पडल्यानंतर टंचाई भासली. मागील वर्षाचे पैसे न देता पुन्हा आमची विहीर का अधिग्रहित करीत आहात असे विहीर मालकांचे म्हणणे होते. म्हणून 2013 व 2014 चे थकलेले पैसे देण्याकरिता पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली आहे. त्यामुळे मागील वर्षात राज्यामध्ये ज्या विहिरी अधिग्रहित केल्या होत्या त्याचे पैसे थकित राहणार नाहीत. त्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येईल.

सभापती महोदय, गावामध्ये रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. दुष्काळ ही जशी आपत्ती आहे तशी ती इष्टापत्ती सुध्दा असू शकते. परंतु या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहिले पाहिजे.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे पाटील......

कामांना वेग आला पाहिजे. म्हणून 3-4 कामे हाती घेण्याचा राज्य सरकारने विचार केला आहे. मरेगा, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, नरेगा आणि राज्याची स्वत:ची रोजगार हमी योजना आज बंद केली असली तरी त्या योजनेंतर्गत काही प्रमाणात कामे सुरु आहेत या योजनांच्या माध्यमातून 40:60 रेश्यो लागू आहे त्यात काही प्रमाणात बदल करुन 49:51 करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारकडे त्या दृष्टीने अनुमती मागितली आहे. त्यापूर्वीच केंद्र सरकारने आम्हाला कळविले आहे की, दुष्काळी भागामध्ये 49:51 ऐवजी 50:50 रेश्यो लागू करण्यास आम्ही अनुमती देऊ. ज्या ज्या गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती आहे त्या गावामध्ये अशा स्वरुपाची परवानगी केंद्र सरकारकडून मागितली आहे. आम्हाला अपेक्षा आहे की, पुढील 8 दिवसात परवानगी प्राप्त होईल. हेतू एकच आहे की, दुष्काळ ही इष्टापत्ती ठरावी आणि त्या माध्यमातून गावाच्या 5 कि.मी.परिसरामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी.

सभापती महोदय, आज शेल्फवर बरीच कामे उपलब्ध आहेत. नवीन कामे घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देणार आहोत. ग्रामपंचायतीने परिसरात कोणते काम घ्यायचे हे ठरवावे आणि प्लॅन मंजूर करावा. पैसे डायरेक्ट ग्रामपंचायतीच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात येतील. आता बीडीओ किंवा तहसीलदार यांच्याकडे निधी जाणार नाही. ग्रामपंचायतीच्या खात्यामध्ये पैसे गेले पाहिजेत. किती कामे आहेत त्या दृष्टीने पैसे दिले जातील. 50:50 रेश्योच्या माध्यमातून सर्वात प्रथम प्राधान्य गावातील शौचालयाच्या बांधकामासाठी असणार आहे. गावामधील इन्फ्रास्ट्रक्चर 60:40 प्रमाणात बसेल अशा टंचाईग्रस्त गावातील कॉंक्रिटचा रस्ता, ग्रामपंचायत कार्यालय, समाज मंदिरचे काम घेता येईल आणि मजुरांना घराजवळ बांधकाम करता येईल. दगड फोडला पाहिजे, गिट्टी उपलब्ध झाली पाहिजे, जॉब कार्ड घेतले पाहिजे. मजुरीचा पैसा हाती न देता ऑनलाईन खात्यामध्ये जमा झाला पाहिजे आणि त्याला खात्यामधून तो काढता आला पाहिजे. त्यात भ्रष्टाचाराला वाव असता कामा नये.

सभापती महोदय, दुसरे प्राधान्य जलसंधारण आणि शेतामधील कामांना असणार आहे. गावतळ्याची निर्मिती, नालाबंडिंग, शेतचाऱ्या, नाला सरळीकरण, नाला खोलीकरण आदी सॉईल

..4...



SGB/ 14:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे पाटील......

कन्झर्व्हेशनच्या कामांना या योजनेंतर्गत 50:50 रेश्योमध्ये प्राधान्य देण्याचा विचार आहे. सरकारने तसा निर्णय घेतला आहे. गाळ वाहून न्यायचा असेल, तलावातून गाळ काढायचा असेल, एखाद्या नाल्यामधून गाळ काढायचा असेल आणि तो शेतापर्यंत न्यायचा असेल तर यापुढे रॉयल्टी लावणार नाही. पाणी साठविण्यासाठी उपयोग होत असेल तर त्या संदर्भात रॉयल्टी घेतली जाते त्या ठिकाणी ती माफ करण्यात येईल.

सभापती महोदय, पाटबंधारे आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील मेकॅनिकल विभागाकडे मोठया प्रमाणात जेसीबी यंत्रे आणि अन्य मशिनरी उपलब्ध आहे.

नंतर 2ए.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ प्रथम श्री. भागले....... 14:40

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) ............

पाकलेन सारखी मशिनरी आजही जलसंपदा विभागाकडे जवळपास 300 च्या वर पडून आहे. अशा प्रकारे कृषी आणि पाटबंधारे विभागाकडील मशिनरीचा उपयोग दुष्काळी भागासाठी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी कृषी विभागाकडून डिझेल पुरविणे आणि जलसंपदा विभागाचे पोकलेन सारखी उपकरणे यांचा वापर करुन त्याचे क्रॉस व्हेरिफिकेशन त्या त्या भागातील तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत करण्यात येईल.

माझ्या शेजारच्याच जिल्ह्यात शिरपूर पॅटर्न यशस्वी झालेला आहे. त्यासंदर्भात मी माननीय श्री. अमरिशभाई पटेल यांच्याशी चर्चा केली. अशी कामे करताना पूर्वीची अडचण होती ती म्हणजे 60:40 रेश्योसंबंधीची पण यासंदर्भात आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, एखाद्या रस्त्याच्या बाजूने चर खोदला तर त्याचे पाणी जमिनीत जिरेल व त्याचा शेतकऱ्याला विहिरीसाठी फायदा होईल अशा छोट्या कामांसाठी करता येईल. ज्या ठिकाणी अशी कामे नियमात बसत नसतील त्यासाठी नियम बाजूला करुन केवळ शेतकऱ्याच्या फायद्यासाठी शासनाची मशिनरी आणि डिझेल वापरुन अशी कामे करण्यात येतील. ही कामे करण्यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यातील काही गावांचा कोटा निश्चित करण्यात येईल. त्यासाठी तहसीलदार, जिल्हाधिकारी आणि लोकप्रतिनिधींना सुध्दा अधिकार देण्यात येतील. तसेच एखाद्या गावात 50:50 टक्के रेश्योमध्ये रस्ता घ्यावा, एखादे ग्रामपंचायतीचे कार्यालय बांधावयाचे असेल तर त्या त्या ग्रामपंचायतींना 25 लाखापर्यंतचे अधिकार देण्यात येतील व ती कामे 50:50 टक्क्यात बसत नसतील पण रेश्यो मेंटेन करण्याच्या दृष्टीने उरलेली 2-5 टक्क्याची कामे धरुन तेवढा पैसा ग्रमपंचायत, एनजीओ इ. नी दिला आणि 50 टक्क्याचा रेश्यो मेंटेन होत असेल तर तशी परवानगी देण्यात येईल. यामागे हेतू एवढाच आहे की, त्या त्या गावातील तरुणांना रोजगार मिळावा. याचे कारण असे की, दुष्काळसदृश परिस्थितीत 10-20 एकर जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्याला सुध्दा मजुरी करावी लागते. मग त्याच्याकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड नसते मग अशा वेळी संपूर्ण राज्यात ज्यांना काम पाहिजे असेल त्याने ग्रामपंचायतीकडे काम पाहिजे अशी नोंदणी करावी व ग्राम पंचायत त्यांना त्या त्या क्षेत्रात काम उपलब्ध करुन देईल. बऱ्याच वेळा बोगस व्यवहार देखील यामध्ये होतात. काही ठिकाणी मागच्या काळात असेही निदर्शनास आले की, हेमामालिनीच्या किंवा ऐश्वर्या रॉयच्या नावाने बोगस कार्ड काढली जातात. पण सरकारी कर्मचारी सोडून जो त्या गावात राहत असेल अशा

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ............

प्रत्यक व्यक्तीला ग्रामपंचायतीमध्ये नोंदणी करुन काम उपलब्ध करुन दिले जाईल व तसे बंधन त्या त्या ग्रामपंचायतींवर त्या शिवारात जलसंधारण अथवा अन्य कामे देण्याचेही बंधन घातले जाईल.

महोदय, ज्या ठिकाणी मजूर आला त्याच्या पोटा-पाण्याची व्यवस्था केलीच पाहिजे म्हणून धान्याची व्यवस्था स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून करण्यात येईल. जो मजूर जॉब कार्ड घेऊन प्रत्यक्ष मजुरीवर गेलेला आहे अशा प्रत्येक मजुराला धान्य देण्याची व्यवस्था करण्यात येईल. यापुढे मी असे सांगू इच्छितो की, राज्यात अन्न सुरक्षा अभियान किंवा स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून जॉब कार्ड अथवा आधार कार्डाच्या मदतीने प्रत्यक्ष मजुराची हजेरी बायो-मेट्रिक पध्दतीने घेण्यात येईल व त्यांनाच धान्य पुरवठा करण्यात येईल. प्रत्यक्ष मजुरांची बायो-मेट्रिक पध्दतीने घेतलेली हजेरी ही त्या त्या तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनाही त्यांच्या कार्यालयात दिसेल, अशा पध्दतीने यील 50 टक्के गैरप्रकाराला आळा बसण्यास मदत होईल.

महोदय, राज्यातील जलाशयांची परिस्थिती पाहिली तर संपूर्ण राज्यातील जलाशयांची पातळी दिवसेदिवस खोल जात आहे. नाशिक भागातील जलाशयाची पातळी सर्वात जास्त असून कोकणातील जलाशयांची 83 टक्के, मराठवाड्यातील सर्वात कमी म्हणजे केवळ 30 टक्के म्हणजेच आपण मृत साठा ठेवतो तेवढीच आहे आणि ती देखील उन्हाळ्यात संपूर्ण आटून जाणार आहे. त्यानंतर नागपूरमध्ये 40 टक्के, अमरावती 64 टक्के अशी असून ही जलाशये मजबूत करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या वर्षी त्यात पाणी राहणार नाही पण अशी कोरडी झालेली जलाशये असतील त्यांची यादी तयार करुन त्यातील गाळ काढण्यासाठी प्राधान्य दिले जाईल. तसेच खोल करण्याच्याही सूचना त्या त्या विभागांना देण्यात येतील. अशा काही प्राथमिक व्यवस्था आपण केलेल्या ओत.

महोदय, ही संपूर्ण कामे करण्यासाठी शासनाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून 3950 कोटी रुपयाची मागणी केली असून तसा मेमौरंडम केंद्राकडे आपण दिलेला आहे. या सभागृहात असाही मुद्दा उपस्थित झाला की, केंद्राच्या मदतीवरच आपण अवलंबून राहणार आहात काय, पण तशी परिस्थिती नसून राज्याकडे जी उपलब्ध साधनसामुग्री आहे ती तर आपण देणारच आहोत पण आपणास कल्पना आहे की, राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असून अशा परिस्थितीत अन्य ठिकाणाहून मदत मागण्याचाही शासनाचा प्रयत्न आहे.

.....3



PFK/ प्रथम श्री. भागले....... 14:40

श्री. एकनाथराव खडसे ...........

महोदय, पाणी टंचाईच्या बाबतीत सन 2015 पर्यंतचा कृती आराखडा शासनाने तयार केला असून त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना संपूर्ण विभागाचे अधिकार देण्यात आले आहेत. समजा ऊर्जा विभागाचा वायरमन काम करीत नसेल किंवा अन्य विभागाच्या अधिकाऱ्याने कामचुकारपणा केला असेल तर त्याला तत्काळ निलंबित करण्याचे अधिकार सुध्दा या दुष्काळी परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, त्यामुळे आमच्या विभागाचा नसल्याने ऐकत नाही अशी अडचण येणार नाही.

.......बीबी-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)......

त्या अनुसार एका व्यक्तीचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. अनेकांकडे नियंत्रण सोपविले की, ते एकमेकांकडे बोट दाखवतात. त्यामुळे समन्वयाचा अभाव राहतो. त्याचा परिणाम कामावर होतो. त्यामुळे हे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत. त्यांना त्या पथकाचे प्रमुख केलेले आहे. पाणी टंचाईसंबंधी 24 तास हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. ज्या भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे अशा भागात लिस्ट कॉस्ट सोल्यूशन या तत्त्वावर टँकरचा खर्च अधिक येत असल्यास अशा भागात दुरूस्तीची कामे अधिक घेण्यात येतील. टंचाईच्या काळात टँकर लावल्याने अधिक खर्च येत आहे असे निदर्शनास आले आणि नवीन पाईप लाईन टाकली किंवा जुनी पाईप लाईन दुरूस्त केली तर कमी खर्च होत आहे असे निदर्शनास आले तर तेथे सर्वोच्च प्राधान्य आपण दुरूस्तीला देणार आहोत. यासाठी लागणारा पैसा हा टंचाईच्या निधीतून खर्च करणार आहोत. त्यामुळे आपण दुरूस्ती योजना हाती घेणार आहोत.

टंचाई निवारण्यासाठी आपण मंत्रिमंडळ उप समितीची स्थापना केलेली आहे. ही समिती वारंवार या कामांचा आढावा घेईल. राज्य टंचाई निवारण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येईल. या योजना 10 वर्षाच्या असतील. केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून शॉर्ट,मिड व लाँग टर्म योजना करण्यात येतील. नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून या राज्यातील दुष्काळ कायमस्वरूपी मिटला पाहिजे असे प्रयत्न करण्यात येतील. यासाठी राज्यात उपलब्ध असलेल्या पाण्याचे नीट नियोजन करावे लागेल. आपणा सर्वांना कल्पना आहे की, राज्यात उपलब्ध असलेले सर्व पाणी पूर्णपणाने वापरले तरी 40 टक्क्याच्यावर सिंचन करू शकत नाही. आपली सिंचन क्षमता वाढली पाहिजे. कारण शेवटी पाणी आपण निर्माण करू शकणार नाही. आपल्याला बाहेरून पाणी आणावे लागेल व त्याचा उपयोग अत्यंत बारकाईने करावा लागणार आहे. जे पाणी उपलब्ध आहे ते सूक्ष्म सिंचनाद्वारे म्हणजे ठिबक सिंचन, मायक्रो इरिगेशन, स्प्रींकलरच्या माध्यमातून वापरले पाहिजे. अशाने सिंचनाची क्षमता वाढू शकेल. त्यामुळे ठिबक सिंचनासाठी अनुदान वाढवून दिले पाहिजे,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)......

यासाठी आमचा प्रयत्न आहे. पुढील आठवड्यामध्येच आम्ही ठिबक सिंचनासंबंधातील निर्णय घेत आहोत. आम्हाला केंद्र शासनाकडून अपेक्षा असल्यामुळे काही दिवसच वाट पाहणार आहोत. यासंबंधात कालच रात्री आमचे बोलणे देखील झाले आहे. राज्य व केंद्र शासनाच्या अनुदानातून ठिबक सिंचनाची योजना करण्यात येईल.

सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून शेतकऱ्यांना सिंचनाच्या संबंधातील अनुदान मिळालेले नाही. हे अनुदान या महिन्याच्या अखेर पर्यंत शेतकऱ्यांना देण्यात येईल. हे अनुदान पंचायत समिती, जिल्हा परिषदेकडे पाठविले जाईल. महाराष्ट्रात कायम स्वरूपी दुष्काळ पडतो. मी मघाशीच सांगितले की, आपण पाणी निर्माण करू शकत नाही. त्यासाठी आपल्याला बाहेरून पाणी आणावे लागेल. या राज्यात अशी स्थिती आहे की, वेगवेगळ्या आयोगाने, न्यायालयाने त्या त्या खोऱ्यांमधील पाणी वापरावर निर्बंध घातले आहेत. त्या पाण्याचे वाटप केलेले आहे. कृष्णा, तापी, गोदावरी या खोऱ्यांमध्ये जेवढे पाणी आहे त्याचे त्यांनी वाटप केलेले आहे. इकडचे पाणी तिकडे देणार नाही अशा प्रकारची भूमिका प्रत्येक खोरे घेत आहे. मराठवाड्याला लागणारे पाणी आम्ही देणारच नाही अशाप्रकारची भूमिका देखील कधी कधी असते. नगरचे पाणी जायकवाडीला देण्यासाठी विरोध केला जातो. हे सर्व अंतर्गत प्रश्न आहेत. खोरे निहाय नियोजन करून परवानगी देणे हे महत्त्वाचे आहे. दुसऱ्या राज्यातील पाणी आपल्या येथे आणणे हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. केंद्र सरकारने नद्या जोड प्रकल्प हाती घेतला आहे. त्याच्या नकाशामध्ये आपल्या खोऱ्यांचा समावेश करावा लागणार आहे. तो प्लॅन 25-30 वर्षांनी होईल. त्याची सुरूवात आता होते आहे. राष्ट्रीय जल आयोगाने नद्या जोड प्रकल्पांतर्गत दोन कार्यक्रम हाती घेतले आहेत. राज्यांतर्गत पाण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. दुसरे म्हणजे बाहेरच्या राज्यातील पाणी राज्यात आणणे याचे नियोजन केलेले आहे. अशा प्रकारे दोन कार्यक्रम त्यांनी घेतलेले आहेत. मागील 15 दिवसांपूर्वी दिल्ली येथे सर्व राज्यातील माननीय मुख्यमंत्र्यांना बोलाविले होते, माननीय

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)......

पाटबंधारे मंत्र्यांना बोलाविले होते. त्या बैठकीला मला देखील बोलावले होते. मी देखील त्या मिटींगमध्ये होतो. जल मंथन असे त्या कार्यक्रमाचे नाव होते. या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती उमा भारती यांनी केले होते. आपल्या राज्यातील 18 प्रकल्पांचा प्रायमरी प्रोजेक्ट रिपोर्ट करण्यास जल आयोगाला परवानगी दिली आहे. त्याची माहिती मी आपणास देत आहे. विदर्भातील वैनगंगा नदी आणि बुलढाणा येथील नळगंगा नदी एकमेकांना जोडण्यात येणार आहे. या नद्यांचे अतिरिक्त पाणी वापरासाठी आणण्यात येणार आहे. विदर्भातील सिंचन व्यवस्था मजबूत करण्यासाठी, या पहिल्या प्रकल्पाचा सुस्थापना अहवाल तयार करण्यासाठी त्यांनी परवानगी दिली आहे. आपला नळगंगा ते वैनगंगा प्रकल्पाचा प्रायमरी अहवाल तयार झालेला आहे. अप्पर कृष्णा ते भिमा असा दुसरा प्रकल्प आहे. अप्पर घाट ते गोदावरी खोरे असा तिसरा प्रकल्प आहे. अप्पर वैतरणा ते गोदावरी खोरे असा चौथा प्रकल्प आहे. पाचवा प्रकल्प उत्तर कोकण ते गोदावरी खोरे असा आहे. उत्तर कोकणातील पाणी समुद्राला जाऊन मिळते. आज तेथे नियोजन करायला कुठेही वाव नाही. आम्ही कोकणाचे पाणी पळवत आहोत असे देखील नाही. कोकणासाठी जेवढे 100 टक्के पाणी लागणार आहे ते आम्ही ठेवणारच आहोत. पण जे 100 टक्के पाणी समुद्रात वाहून जाते त्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी केंद्रीय जल आयोगाने हिरवा कंदील दाखवला आहे. उत्तर कोकण ते गोदावरी खोरे म्हणजे नगरच्या वरून, नगर, नाशिक असे वळवून ते पाणी परत मराठवाड्याकडे आणण्याचा एक प्रकल्प आहे. मध्य कोकण ते भिमा खोरे हा एक प्रकल्प आहे. कोयना नदी ते मुंबई शहर असा एक प्रकल्प आहे. पोलादपूर, सांगली, सांगोला येथील ज्या नद्या किंवा कॅनॉल आहेत त्यांना सर्वोच्च प्राधान्य देऊन ते एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. आज सांगोला भागात बिलकूल पाणी नाही. नारपाड ते गिरणा नदी असा प्रकल्प आहे. जळगाव जिल्हा अंतर्गत नदी जोड प्रकल्प आहे. नर्मदा ते तापी नदी प्रकल्प आहे. आताच सरदार प्रकल्पाचे पाणी येथे आणणार काय असा देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. नर्मदा नदी ते तापी खोऱ्यामध्ये 11 टीएमसी पाणी या मार्गाने घेण्यात आलेले आहे. खारिया घुटी ते तापी नदी, जिगाव ते तापी नदी ते

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)......

गोदावरी-तापी नदी, वैनगंगा ते मांजरा नदी, दमणगंगा नदी ते पिंजाळ नदी या लिंकमधून मुंबईसाठी पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी 60 टीएमसी पाणी देण्यात येणार आहे. नर्मदा नदी ते तापी नदी मधून 7 टीएमसी पाणी देण्यात येणार आहे. राज्यामधून देखील काही प्रकल्पांची माहिती मागविण्यात आलेली आहे. या योजनेचे प्रायमरी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) .......

यामध्ये स्थानिक परिस्थिती, स्थानिक गरजांचा विचार करुन विवक्षित भागातील अतिरिक्त ठरणारे पाणी गरज असलेल्या क्षेत्राकडे वळविण्यात येणार आहे. सदर प्रकल्प राबवितांाा पर्यावरणाचा समतोल,स्थानिक लोकसंख्या व पाण्याची गरज या सर्व बाबीचा शास्त्रोक्त पध्दतीने विचार करण्यात येणार आहे. सदर पाणी मोठ मोठया डोंगरातून बोगदे काढून वळवावयाचे असल्यामुळे या प्रकल्पाला फार मोठा खर्च येणार असून हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी पैसा उपलब्ध झाला तर जवळपास 20 ते 25 वर्षे लागणार आहेत. प्राथमिक स्तरावरील कामाला सुरुवात झाली असून या प्रकल्पाला राज्य आणि केंद्र सरकारने त्यांना चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिलेला आहे. पुढील कालखंडात हे पाणी महाराष्ट्रात आले तर आपल्याला अधिकचे व कायमस्वरुपी पाणी उपलब्ध होऊ शकेल.

सभापती महोदय, आपल्या राज्याला कायमस्वरुपी पाणी मिळावे यासाठी गंगा कावेरी प्रकल्पाच्या धर्तीवर नद्याजोड प्रकल्पात आपला भाग येत नाही तर यामध्ये विदर्भातील काही भाग येतो. नद्या जोड प्रकल्पामध्ये आपला भाग वरच्या बाजूला येत असल्यामुळे आपला भाग बसत नाही. त्यामुळे नर्मदेचे जे पाणी आहे त्यातील 14 टिएमसी पाणी खालच्या बाजूला द्यावयाचे असून त्यातील 11 टिएमसी पाणी खरिया-घोटीया आणि नावथा हे तापी नदीच्या उगमस्थानाजवळील पाणी मध्यप्रदेशकडे वळून नर्मदेकडे जाते त्या पाण्याचाही यामध्ये उल्लेख आहे.

सभापती महोदय, आपण 100 टक्के डीपीआर पर्यंत आलेलो असलो तरी त्याला अद्यापि मान्यता मिळालेली नाही. परंतु प्रायमरी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यास मान्यता मिळाली असून तो आपण तयार केलेला आहे. पुढील दोन चार महिन्यात डीपीआरला मान्यता मिळणार असून हे काम दीर्घकालीन आहे. या कामाला सुरुवात झाली हे सुध्दा काही कमी नाही.

सभापती महोदय, आपत्तीग्रस्तांना बँकेद्वारे आरटीजीएसच्या माध्यमातून थेट पैसा दिला जाणार आहे. मागच्या कालखंडात शासनाने शुध्द हेतूने पैसा दिला होता परंतु तो पैसा लाभधारकांपर्यंत पोहचलाच नाही. आरटीजीएसच्या माध्यमातून लाभधारकाच्या अकाऊंटमध्ये पैसा जमा झाला तर तो पैसा लाभधारकाला दुसऱ्याच दिवशी हातात मिळणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) .......

आरटीजीएसची सिस्टीम कायमस्वरुपी संगणकामध्ये संकलित करुन ठेवण्यात येईल व यामध्ये सर्वांचे अकाऊंट नंबर ठेवले जाणार आहेत. राज्यातील अल्पभूधारक, भूधारक,अतिअल्प भूधारकांची संख्या तसेच बँकेचे अकाऊंट नंबर सुध्दा येणार आहेत. अशी परिस्थिती केव्हाही उद्‌भवली तर पुन्हा पुन्हा माहिती संकलित करण्याची गरज पडणार नाही असाही उद्देश त्यामागे आहे.

सभापती महोदय, मंडलस्तरावर हवामान केंद्राची उभारणी करणे. पीक आणेवारी ठरवित असताना केंद्रबिंदू तालुका घेत असतो. तालुक्यात किती पाऊस झाला त्यावरुन आणेवारी घोषित केली जात होती. परंतु तालुक्यातील काही भागात पाऊस होतो तर काही भागात पाऊस होत नाही. तालुक्यातील काही भागात दुष्काळी परिस्थिती असतांना दुष्काळ जाहीर केला जात नाही. त्यामुळे या पुढे मंडलनिहाय पर्जन्यमापक यंत्र बसवून त्याची आकडेवारी घेतली जाणार आहे. काही ठिकाणी पर्जन्यमापक यंत्रे बसविलेली आहेत परंतु त्याचा आधार घेतला जात नाही. परंतु या पध्दतीची टंचाईसाठी आधार धरला जात नाही. मंडलस्तरावर 100 टक्के पर्जन्यमापक बसविले नसल्यामुळे त्याचा आधार धरला जात नाही. पीक विमा काढताना विमा कंपन्याही या आधाराला नाकारतात. त्यामुळे शासनाने असे ठरवले आहे की, येणाऱ्या जून महिन्यापर्यंत महाराष्ट्रातील सर्व मंडलांना पर्जन्यमापक यंत्रे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे या माध्यमातून पुढील पावसाळयात तरी विमा कंपन्यांना किंवा अन्य कंपन्यांना आधार म्हणून पर्जन्यमापक यंत्राची नोंद घेऊन निर्णय घेणे सोपे जाईल.

सभापती महोदय, राज्यामध्ये सर्व ठिकाणी पीक विमा योजना राबविण्यासाठी एक कार्यक्रम सुरु करण्यात यावा असा शासनाचा विचार सुरु आहे. जलसंधारण विभागामार्फत सन 2014-2015 मध्ये गतीमान पाणलोट व गतीमान योजना असून गतीमान पाणलोटासाठी दुष्काळी भागासाठी 39 कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहे. गतीमान पाणलोट आदिवासी विभाग व डीपीडीसीसाठी 59.81 कोटी रुपये राखून ठेवण्यात आले असून गतीमान पाणलोट विशेष घटक योजनेसाठी 59.93 कोटी रुपये व पडीत जमिनीचा विकास करण्यासाठी 9 कोटी रुपये, नाबार्डच्या कर्जासाठी 22.40 कोटी रुपये,101 ते 250 हेक्टर क्षमतेच्या योजनांना गती देण्यासाठी 38 लाख रुपये ठेवण्यात आलेले

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) .......

आहेत. ट्रिपल आरची ही योजना केंद्र सरकारची असून त्यामधून आपल्या राज्याला काही पैसा उपलब्ध झालेला आहे. मला वाटते मोठया धरणांबरोबर लहान लहान जलसंधारणाची कामे होणे आवश्यक आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर ट्रिपल आरच्या माध्यमातून मामा तलाव, कोल्हापूर धरणांचे नूतनीकरण करणे, दुरूस्ती करणे,छोटया तलावांची दुरूस्ती करण्यात येणार आहेत. आपल्याकडे छोटया धरणांच्या दुरूस्तीसाठी पैसे मिळत नाहीत. केंद्राच्या माध्यमातून आपल्याला हा पैसा काही प्रमाणात उपलब्ध झाला आहे परंतु हा पैसा देखील आपल्याला वाढवून घ्यावयाचा असून दुष्काळी भागातील कामांना प्राधान्य देऊन ते काम आपल्याला पूर्ण करावयाचे आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा राज्याच्या दृष्टीने चिंतेचा व गंभीर विषय आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात वेगळी चर्चा उपस्थित केली जाणार असून त्यामध्ये सविस्तर माहिती दिली जाणार आहे. परंतु प्राथमिक स्तरावर पॅकेजची अंमलबजावणी केली जाणार आहे. आत्महत्या थांबविण्यासाठी अनेक समित्या नियुक्त करण्यात आल्या असून त्यामाध्यमातून अनेकांचे सजेशन्स घेण्यात आले. माननीय श्री. शरद पवार साहेबांनी त्या कालखंडात कर्जमाफी दिली होती. कर्जमाफी देऊन तरी आत्महत्या थांबाव्यात हा त्यामागचा उद्देश होता. त्यावेळेस शेतकऱ्यांचे पूर्ण कर्ज माफ केले तर आत्महत्या थांबतीत अशी मागणी आम्ही करीत होतो. त्यानुसार शेतकऱ्यांचे कर्जही माफ झाले तरी आत्महत्या थांबल्या नाहीत. मग कोणी सांगितले की, शेतकऱ्यांचे विजेचे बिल माफ करा. मागच्या सरकारने विजेचे बील माफ करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्याने सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. आत्महत्या करण्याचे नेमके कारण काय आहे याची माहिती घेण्यासाठी काही समित्यांची स्थापना करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात समित्यांनी जे जे काही सुचवले होते त्या सर्व सूचनांचा मागच्याही सरकारने अवलंब केला होता.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या 100 टक्के थांबविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. परंतु आत्महत्या थांबविणे हे तुमच्या माझ्या हातात नाही. आत्महत्या थांबविण्यासाठी कोणते उपाय केले पाहिजेत यासाठी शेतकऱ्याला सधन केले पाहिजे, त्याच्या हाताला काम मिळाले पाहिजे,आधार मिळाला पाहिजे, त्याचा आत्मविश्वास वाढला पाहिजे, त्याच्या मनातील नैराश्य दूर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) .......

झाले पाहिजे यासाठी एकटया सरकारने प्रयत्न केले तर या आत्महत्या थांबतील असे चित्र नाही. आत्महत्या थांबविण्यासाठी साऱ्या समाजाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. एनजीओने सुध्दा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी मी केवळ मागच्या समित्यांचे निष्कर्ष सांगतो आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये असे आवाहन सारेच लोकप्रतिनिधी करीत असतात, एनजीओ करीत असतात. खरे म्हणजे नैराश्यातून बाहेर येण्याचा आत्महत्या हा मार्ग नाही. जीवन हे अमूल्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आत्मबल वाढविण्यासाठी शेतकऱ्याला आणखी काही मदत करण्याची आवश्यकता आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात सविस्तर माहिती घेण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या 100 टक्के थांबण्यासाठी आपण हे हे करा असे सांगितले तर त्या प्रमाणात सरकारने पावले उचलली पाहिजे. आपण शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करुन पाहिले, शेती कर्ज 100 टक्के माफ करण्यात आले परंतु हे केले असतानाही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. आत्महत्या रोखण्यासाठी आपण ज्या उपाययोजना केल्या त्यापेक्षा नवीन काय उपाययोजना केल्या म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकतील ? यासंदर्भात आपण राज्य सरकारला मार्गदर्शन केले तर त्याचा फायदा राज्य सरकारला होऊ शकेल.

सभापती महोदय, कुटुंबातील कर्त्या पुरुषाने आत्महत्या केली तर कुटुंब उद्ध्वस्त होते. त्यामुळे 75 टक्के आत्महत्या 2 एकर ते 12.5 एकर जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्याच्या आहेत. जो अतिअल्प भूधारक आहे, जो शेतमजूर आहे अशांच्या आत्महत्येचे प्रमाण 75 टक्के आहे. आत्महत्येचे प्रमाण इतर मागासवर्गात जास्त आहे. इतर मागासवर्गाच्या प्रमाणात अनुसूचित जाती/जमातीमध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण कमी आहे. सिंचनाची कामे वाढवली पाहिजेत अशाही सूचना समित्यांनी केलेल्या आहेत. आत्महत्या करणाऱ्यांचे तत्कालीन कारणामध्ये कर्जबाजारीपणामुळे 93 टक्के,आर्थिक दुरवस्था 74 टक्के, कौटुंबिक कलहामुळे 55 टक्के, नापिकीमुळे 41 टक्के, समाजात स्थानाला लागलेला धक्का यामुळे 36 टक्के, मुली अथवा बहिणीचे लग्न करण्यात येणाऱ्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) .......

अडचणीमुळे आत्महत्येचे प्रमाण 34 टक्के, व्यसनाधिनता 28 टक्के,आरोग्य विषयक प्रश्नाच्या कारणामुळे 21 टक्के शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. हा जो रिपोर्ट आहे तो या सरकारचा नसून मागील सरकारने यासंदर्भात जी समिती नेमली होती त्या समितीचे हे निष्कर्ष आहेत.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.एकनाथराव खडसे (पाटील).....

मागील सरकारने जी समिती नेमली होती त्या समितीने दिलेला हा अहवाल आहे. त्या अहवालाशी शासन सहमत आहे असेही नाही. मागील कालखंडात कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या ते मी सांगितले.

सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय आपत्ती निवारण समितीच्या अभ्यासनुसार कोणतीही आपत्ती ही नैसर्गिक नाही असे मी मघाशी सांगितले. पूर असेल, गारपीट असेल अशा संकटाच्या निवारणासाठी मागील सरकारने 8 हजार 377 कोटी रूपयांची आर्थिक मदत केलेली आहे. मात्र मागील सरकारने कृषी विकासावर 2 हजार 692 कोटी रुपये खर्च केले आहेत. अशाप्रकारच्या उपाययोजनांमुळे दुष्काळी भागातील संकट कायम स्वरूपी कमी झाले नाही. त्यासाठी आपणास दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ज्या भागात दुष्काळ पडला, गारपीट झाली त्या भागाला सरकारने पॅकेज दिले. परंतु पॅकेज देऊनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज द्यावे अशी मागणी विरोधी पक्षाकडून करण्यात आली. त्यांच्या जागी आम्ही असतो तर आम्ही देखील तीच मागणी केली असती. फक्त आपण मला कोणत्या उपाययोजना कराव्यात यासंबंधी विचारले नाही. आपण फक्त माझे भाषण ऐकून घेत होता. पण कोणत्या उपाययोजना कराव्यात हे विचारत नव्हता. विरोधी पक्षाकडून 10 हजार कोटी रूपयांचे पॅकेज देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. आपण शेतकऱ्यांसाठी पॅकेजची मागणी केली पाहिजे. कारण आपण दोन्ही बाजूचे सदस्य शेतकऱ्यांना मदत करण्याच्या भूमिकेचे आहोत. परंतु मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, पॅकेज हा त्यावरील तात्पुरता उपाय आहे. आपण सर्वांनी कायम स्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आम्ही शेतकऱ्यांना पॅकेज देणारच आहोत. मागील सरकारने दिले त्याच्यापेक्षा अधिकचे देणार आहोत. परंतु पॅकेज दिल्यामुळे प्रश्न सुटतील असा दावा आपण करु शकता काय ? आम्ही दोन पट, तीन पट, पाच पट पॅकेज दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील असे आपण दाव्यानिशी सांगू शकाल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

यापूर्वी ज्या उपाययोजना करण्यात आल्या त्या व्यतिरिक्त आपण नवीन उपाययोजना सांगाव्यात. यापूर्वी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात आले, वीज देयक माफ करण्यात आले अशाप्रकारच्या उपाययोजना करुन देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. मी अगोदर सांगितले की, आपण यापूर्वी 8 हजार 377 कोटी रुपये खर्च केले.

सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे की, काही ठिकाणी 102 तर काही ठिकाणी 110 टक्के पेरण्या झाल्या. शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या पण त्यांच्या हाती काही आले नाही अशी स्थिती नंतरच्या कालखंडात निर्माण झाली. तेव्हा आपणास दुष्काळावर मात करण्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. याचा एक भाग म्हणून मी मघाशी नद्याजोड प्रकल्पाचा उल्लेख केला. त्याच बरोबर 50 लाख हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत 6 हजार 437 कोटी रुपये आहे. पुढील एक वर्षात जवळपास 5 हजार दुष्काळग्रस्त गावांना दुष्काळमुक्त करण्याचा शासनाचा निर्धार आहे. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत 5 हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार केलेला आहे त्यामध्ये मराठवाडा अग्रक्रमावर आहे. या 5 हजार गावांमध्ये अशी कामे करायची आहेत की, पुढील एका वर्षी पाऊस पडला नाही तरी त्या भागातील भूगर्भातील पाण्याची पातळी दोन-तीन मीटरने वर आलेली असावी. त्याशिवाय प्रत्येक शेतामध्ये नालाबंडींग करणे, चर खोदणे, गाळ काढणे, नाल्याचे रुंदीकरण करणे, गाव तळ्याला प्लास्टिकचे आवरण करणे, पावसाचे पाणी अधिकाधिक साठविण्याचा प्रयत्न करणे त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन मातीमध्ये ओलावा निर्माण करणे. आपणास या 5 हजार गावांतील पाण्याची पातळी वर आणायची तर आहेच, पण मातीतील ओलावा वाढला पाहिजे. मातीच्या ढेकळामध्ये पाणी दिसले पाहिजे अशाप्रकारची कामे आपणास उभी करायची आहेत. या सर्व कामांसाठी 6 हजार 437 कोटी रुपयें खर्च अपेक्षित आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे दुष्काळग्रस्त 5 हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचा शासनाचा निर्धार आहे. पुढील पाच वर्षामध्ये अडीच लाख शेततळे व 50 हजार सिमेंट

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

नालाबंधारे घेण्याचा शासनाचा मानस आहे. विकेन्द्रित साठ्याद्वारे 10 लक्ष हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. राज्यात या कार्यक्रमाची सुरुवात झालेली आहे. या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर मदत मिळणार आहे. हा देशभरातील कार्यक्रम आहे. या देशभरातील कार्यक्रमामध्ये हा कार्यक्रम आमच्या राज्यात मोठ्या प्रमाणावर राबविण्यात यावा आणि तो दुष्काळी भागामध्ये राबवावा अशी आम्ही केंद्र सरकारला विनंती केलेली आहे. या कामांची राज्यात प्राथमिक स्वरुपात कामास सुरुवात झालेली आहे.

सभापती महोदय, पुढील काळात शेतकऱ्यांना 5 लक्ष सोलर पंप उपलब्ध करुन देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे. राज्यात विजेची टंचाई आहे. वीज टंचाईचा प्रश्न लगेच सुटू शकणार नाही कारण अनेक वर्षाचा बॅकलॉग आहे. वीज निर्मितीसाठी कोळसा नाही. काही ठिकाणी पूर्ण क्षमतेने प्लान्ट सुरु नाहीत. जनरेशनचा पीएफएल दिवसेंदिवस कमी होत आहे. कधी काळी 80 टक्क्याच्यावर पीएफएल होता तो आता 50 टक्केच्या आत आलेला आहे. वीज निर्मितीचे बरेचसे संच जुने झालेले आहेत. त्यांचे पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता आहे. आपण पुनर्निर्माणचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. तो लवकर पूर्ण होईल अशी अपेक्षा नाही. तो भार आपण कमी केला पाहिजे. आपल्याकडे कोळसा नव्हता म्हणून केंद्रीय कोळसा मंत्री श्री.पियुष गोयल यांच्याशी दोन बैठका घेतल्या. आम्ही त्यांना विनंती केली की, आम्हाला जवळचा कोळसा मिळाला पाहिजे. आम्हाला खापरखेडा व चंद्रपूर भागातील जवळचा कोळसा द्यावा. जवळच्या खाणी उपलब्ध करुन द्याव्यात. आमच्या विनंतीवरुन त्यांनी आम्हाला जवळच्या तीन खाणी दिलेल्या आहेत. तेथून आपल्याला कोळसा आणता येईल. आपली सर्व व्यवस्था झाली तर आपण काही महिन्यांमध्ये पीएफएलमध्ये 18 टक्क्यांची वाढ करु शकू. आपला तसा प्रयत्न आहे. पण 100 टक्के यशस्वी होऊ शकत नाही.

सभापती महोदय, राज्यातील जो अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे विहिरीतून पाणी उपसा करण्यासाठी वीज नसल्यामुळे किंवा लोडशेडींगमुळे त्याच्या उत्पन्नात भर पडत नाही म्हणून तो आत्महत्येकडे वळतो. अशा सर्व गोष्टींचा अभ्यास करुन शेतकऱ्यांना 5 लक्ष सोलरपंप उपलब्ध

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

करुन देण्याचा धोरणात्मक निर्णय या सरकारने घेतलेला आहे. 5 हॉर्सपॉवर्सच्या सोलर पंपाची किंमत साधारणत: पाच लाख रुपये आहे. माननीय केंद्रीय अपारंपारिक ऊर्जा मंत्री यांचेशी आमची चर्चा झालेली आहे. त्यांनी आम्हाला सांगितले की, केंद्र सरकार 50 टक्के सबसिडी देण्यास तयार आहे. 5 लाख शेतकऱ्यांना हे पंप देण्यात येणार आहेत आणि त्यातही दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना प्राधान्य देणार आहोत. या वर्षी शेतकऱ्यांच्या विहिरीला पाणी नसले तरी पुढील वर्षी विहिरीमध्ये पाणी आल्यावर त्या शेतकऱ्यांनी काही तरी बागायती शेती करता येईल. वीज नसल्यामुळे शेतकरी मागे पडला असे होता कामा नये. शेतकऱ्यांना सुरुवातीचा कनेक्शनचा 30-35 हजार रुपये खर्च करायचा आहे. त्यांना ही रक्कम हप्त्याने किंवा एकाच वेळी भरता येईल. उर्वरित रक्कम त्यांना 100 टक्के सबसिडीने देण्यात येईल. शेतकऱ्यांना या सोलर पंपाचा उपयोग गावामध्ये असलेल्या शेततळ्यासाठी करता येईल. कारण त्या ठिकाणी शेतकऱ्यांना वीज कनेक्शन घेणे शक्य नसते आणि त्याला ते परवडत देखील नाही. तसेच त्याच्या शेताच्या बाजूने पाट जात असेल तर पाटातील पाणी शेततळ्यामध्ये किंवा विहिरीमध्ये त्याला घेता येईल. लोडशेडींग असेल तर त्याचा जनरेटर म्हणून उपयोग करता येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

महोदय, मागील तीन वर्षांपासून सूक्ष्म सिंचनाचे 332 कोटी रुपये देण्यात आलेले नव्हते. त्यामुळे ही रक्कम तातडीने उपलब्ध करुन देण्यात येईल. नाबार्ड आणि आर.आय.डी.एफ.कडून 450 कोटी रुपयांचे कर्ज प्रलंबित होते. त्यामुळे सरकार ते पैसे भरुन, त्या माध्यमातून सर्व अनुदान देत आहे. या वर्षी सूक्ष्म सिंचनासाठी 300 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करीत आहोत. पुढील पाच वर्षात किमान 10 लाख हेक्टर जमीन सूक्ष्म सिंचनाखाली यावी म्हणून आम्ही आग्रहपूर्वक प्रयत्न करणार आहोत. त्यासाठी क्रॉपिंग पॅटर्न सुध्दा बदलविणार आहोत. शिवाय ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडे आग्रह धरणार आहोत की, त्यांनी सूक्ष्म सिंचनाखाली ऊस लागवड करावी. तसेच कारखान्यांना सुध्दा सूचना करणार आहोत की, त्यांनी कारखान्यामध्ये अधिकाअधिक सूक्ष्म सिंचनाचा वापर करावा. त्यासाठी आवश्यकता पडल्यास कारखान्यांनी हमी घ्यावी. कारण सरकार 5 एकरपर्यंत अनुदान देणार आहे. त्यावरील क्षेत्रासाठी अनुदान देणार नसल्यामुळे अतिरिक्त क्षेत्राची हमी कारखान्यांनी घ्यावी.

महोदय, आमचे सरकार 20 हजार सामूहिक शेततळी घेण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेणार आहे. अपूर्ण राहिलेले 10 हजार शेततळे येत्या दोन-तीन वर्षात पूर्ण करणार आहोत. पाण्याची साठवण क्षमता वाढविण्यासाठी त्यातील गाळ काढण्यासाठी 50 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. राज्यात कोरडवाहू शेती अभियान अंतर्गत 500 गावांना दुष्काळमुक्त करण्यासाठी 300 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. चालू वर्षात अतिरिक्त 150 कोटी रुपये अन्य 1000 गावे दुष्काळमुक्त करण्यासाठी द्यावयाचे आहेत. जलसंधारणाच्या बाबतीत बीबीएफचा अत्यंत चांगला अनुभव आला आहे. चालू वर्षात 10 हजार बीबीएफ उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा उद्देश आहे. दुष्काळाची झळ बसलेल्या 92 लक्ष हेक्टर बाधित शेतकऱ्यांना 3925 कोटी रुपयांची मदत देण्याचा शासनाचा निर्धार आहे. नुकसान झालेल्या 2.44 लाख फळ बागायतदार शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी 884 कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलेला आहे. केंद्र सरकारने या संदर्भात दर हेक्टरी 35 हजार रुपये प्रमाणे दुष्काळी भागातील 2.50 लाख हेक्टर बागा वाचविण्यासाठी 15 टक्के रक्कम राज्य सरकारने द्यावी आणि उर्वरित 85 टक्के





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

रक्क्म केंद्र सरकार देईल अशा प्रकारची सूचना केली असून, त्यानुसार राज्य सरकार कागदपत्रांची पूर्तता करीत आहे.

महोदय, राष्ट्रीय फलोत्पादन योजनेंतर्गत पुनरूज्जीवनासाठी प्रति हेक्टर 20 हजार रुपये, एकात्मिक जैविक व कीड व्यवस्थापनासाठी प्रति हेक्टर 1200 रुपये, तसेच प्लास्टीक आच्छादनासाठी प्रति हेक्टर 16 हजार रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. वैरण विकास कार्यक्रमासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. दुष्काळग्रस्त भागात शेती पंपाना वीज पुरवठा करण्याचे तिमाहीचे 215 कोटी रुपये वीज बिल अपेक्षित आहे. शेतकऱ्यांचे तिमाहीचे वीज बिल माफ करण्यात येईल. आपण 33.5 टक्के माफी देण्याबाबत मागणी केली होती. आम्ही तिमाहीचे 100 टक्के वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. या पुढचा निर्णय पुढील अर्थसंकल्पात करण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांना या महिन्यापासून वीज बिल आले आहे त्यांना शून्य रकमेचे वीज बिल देण्यात येईल. पण ते बिल अगोदरच्या सरकारसारखे देणार नाही. अगोदरच्या सरकारने शून्य रकमेचे वीज बिल पाठविले आणि नंतर ते वसूल केले. परंतु आमचे सरकार त्या सरकारसारखे वागणार नाही. कारण आम्हाला राज्यातील जनतेने 5 वर्षे काम करण्याची संधी दिली आहे. म्हणूनच शेतकऱ्यांचे तिमाहीचे 100 टक्के वीज बिल आम्ही माफ करणार आहोत. उर्वरित वीज बिलाच्या बाबतीत नंतर विचार करण्यात येईल. वास्तविक पाहता आम्हाला शेतकऱ्यांचे सर्वच वीज बिल 100 टक्के माफ करायचे होते. परंतु वित्त विभागाचे सचिव ऐकत नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की, हे राज्य दिवाळखोर आहे, राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे. नाही तर आम्हाला पूर्ण वीज बिल माफ करण्यास काहीच हरकत नव्हती. मी तर तुमच्यापेक्षा उदार आहे. आपल्याला सांगतो की, मी पैठणचा 'नाथ महाराज' आहे. मी गाढवाला पाणी पाजले आहे, तर तुमच्यासारख्याचे काय ?

सभापती महोदय, दुष्काळी भागात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. राष्ट्रीयकृत बँकाचे सुमारे 8 हजार कोटी रुपये पीक कर्ज थकीत राहण्याची शक्यता आहे. त्यांच्या थकीत कर्जाच्या व्याजाचे 480 कोटी रुपये शासनाच्या मार्फत अदा करण्यात येणार आहेत. पण हे व्याज केवळ सहकारी बँकांचेच माफ होणार आहे. कारण शेतकऱ्यांनी थकीत कर्जाचे व्याज भरले नाही

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

तर त्यांना पुढील कर्ज मिळत नाही. त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करायचे ठरविले तरी त्यावर व्याज द्यावे लागते. यामध्ये उलट शेतकऱ्यांचे नुकसान आहे, कारण त्याला डॉ.पंजाबराव देशमुख अनुदान योजनेचा फायदा मिळत नाही. आम्ही 480 कोटी रुपये थकीत कर्जाच्या व्याजापोटी देणार आहोत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या थकीत कर्जाचे रुपांतर मध्यम मुदत कर्जामध्ये करण्यासाठी 2900 कोटी रुपये थकीत कर्जापोटी राज्य हिश्श्याचे 15 टक्के नुसार 435 कोटी रुपये कर्ज स्वरुपात बँकांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

महोदय, मराठवाडा आणि विदर्भात 4500 परवानाधारक सावकार आहेत. आमच्या असे लक्षात आले आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येला सावकारी कर्ज हे एक महत्त्वाचे कारण आहे. विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये सावकारांनी कर्ज वसुलीसाठी तगादा लावल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत हे जाणवते किंवा त्या बाबत तक्रारी येतात. असे कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सुमारे 5 लाख आहे. या बाबतची माहिती आम्ही असिस्टंट रजिस्ट्रार किंवा सहकार विभागाकडून घेतली आहे. राज्यभरात 5 लाख शेतकरी असे आहेत की, ते कर्ज घेण्यासाठी सावकारांकडे जातात. कारण सहकारी बँकांचे कर्ज थकले की, त्या बँका त्यांना कर्ज देत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजास्तव सावकारांकडे जावे लागते. शेतकऱ्यांनी नोंदणीकृत सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम 100 टक्के सरकार भरेल. राज्यातील शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून बाहेर काढण्यासाठी शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले 373 कोटी रुपये कर्ज शासनाकडून माफ करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांची छाननी करुन त्यांनी घेतलेल्या कर्जाचे 373 कोटी रुपये हे त्या अधिकृत सावकारांना देणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे आपण या गोष्टीचे टाळ्या वाजवून स्वागत केले पाहिजे. आमचे सरकार शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून मुक्त करण्यासाठी 373 कोटी रुपये देत आहे. मग तो सावकार काँग्रेस पक्षाचा आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आहे याचा विचार आम्ही करणार नाही. ज्या सावकारांनी सहकार विभागाकडे नोंदणी केली आहे आणि अशा नोंदणीकृत सावकारांकडून ज्या शेतकऱ्यांनी कर्ज घेतले आहे ते 373 कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात येईल. आपली इच्छा

..4..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 15:20

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

नसेल तर कर्ज वसुलीसाठी तगादा लावतो. माजी विधानसभा सदस्य श्री.दिलीपकुमार सानंदा हे नोंदणीकृत सावकार आहेत. त्यांच्यासारख्या सावकाराला तेवढे पैसे मिळतील ना. सहकार विभागाकडे नोंदणी न केलेल्या सावकारांकडून शेतकऱ्यांनी कर्ज घेतले असेल तर त्यांनी तसे आम्हाला सांगावे. नोंदणी न केलेल्या सावकारांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे कर्ज तर माफ करु, पण अगोदर त्या सावकाराला जेलमध्ये टाकू. अवैध सावकारी का केली अशी सुध्दा त्याच्याकडे विचारणा करण्यात येईल.

महोदय, पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी सहा महिन्यांसाठी 400 कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे. त्या माध्यमातून 3 हजार टँकरमार्फत पाणी पुरवठा होणार आहे.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ....

सन 2014-15 च्या हंगामात 47 लाख शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला. हवामानावर आधारित पीक विमा योजनेत 13 लाख शेतकरी सहभागी झाले. हवामानावर आधारित पीक विमा योजनेसाठी राज्य शासनाकडून 45 कोटी रूपयांचे विमा अनुदान उपलब्ध आहे. अंदाजित 230 कोटी रूपयांची भरपाई 11 लाख शेतकऱ्यांना उपलब्ध होणार आहे. अशा स्वरूपाचे हे साधारपणपणे साडे सहा हजार कोटी रूपयांच्या वरचे पॅकेज आहे. आम्ही दीर्घकालीन उपाययोजनांसाठी 36 हजार कोटी रूपयांच्या आसपास खर्च करणार आहोत. राज्यामध्ये दुष्काळाचा सामना करण्यासाठी ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत त्या सरकार निश्चित करीत आहे. शेतकऱ्यांना जरूर मदत करण्यात येईल. भावी कालखंडात दुष्काळाचा सामना करण्याची वेळ येऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणार आहोत. माझे सर्व शेतकऱ्यांना या माध्यमातून आवाहन आहे की, दुष्काळ आहे. पण अशा स्थितीत नैराश्येपोटी किंवा अन्य कारणांसाठी आत्महत्या करू नये. सरकार तुमच्या पाठीशी आहे. शासनाकडे पैसा नसला तरी काळजी करू नका. मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, तुम्ही सागितले आहे की, कर्जाची मर्यादा संपलेली नाही. आम्ही कर्ज काढू आणि पैसा उभा करू. केंद्र शासनाकडून पैसा आणू. परंतु, दुष्काळात शेतकऱ्यांना मदतीसाठी पैसा कमी पडू देणार नाही, एवढेच सांगतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आम्ही दुष्काळात शेतकऱ्यांना पॅकेज देण्याच्या संबंधी चर्चेसाठी प्रस्ताव आणला, त्यासंबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविणे आमच्या हातात नाही. आम्ही नाकर्ते आहोत. आम्ही कोणतीही मदत शेतकऱ्यांना देऊ शकत नाही. माननीय मंत्र्यांनी कोणतीही मदत, पॅकेज शेतकऱ्यांना सरळ हाताने दिलेले नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला भाव, पॅकेज, कोरडवाहू शेतकऱ्यांना 25 हजार रूपयांची मदत, ओलिताखालील शेतकऱ्यांना 50 हजार रूपयांची मदत, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पॅकेज, धान उत्पादक शेतकऱ्यांना पॅकेज, दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला अधिक भाव या संदर्भात शासनाने कोणतीही मदत दिलेली नाही. मका, ज्वारी, कांदा अशा कोणत्याही पिकाला पॅकेजसाठी एक पैसा सुध्दा या सरकारने जाहीर केलेला नाही. राज्यामध्ये शेतकऱ्यांकडून प्रचंड आत्महत्या होत आहेत. विदर्भात अधिवेशन सुरू असताना शेतकरी शासनाकडे आशेने पाहत आहेत. नवीन सरकार आम्हाला कोणते तरी नवीन पॅकेज देणार आहे, याकडे शेतकरी पाहत आहे. शेतकऱ्यांनी नवीन सरकारकडून आशा ठेवल्या होत्या. त्या सर्व शेतकऱ्यांचा भ्रमनिरास करण्याचे काम सरकारने केले आहे. आताच माननीय मंत्र्यांनी वाचन केले. सुरूवातीपासून एक तासाचे भाषण केले. त्यामध्ये त्यांनी सरकार दुष्काळाच्या संदर्भात काय करीत आहे यासंबंधी कोणताही शब्द काढला नाही. मागच्या सरकारने काय केले, हे आम्हाला सांगण्याची गरज नाही. मराठवाड्यातील सर्व लोकप्रतिनिधींना हे माहीत आहे. राज्यातील लोकप्रतिनिधींना माहीत आहे की, आपण दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करतो त्यावेळी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, शाळेची फी माफ करण्याचा प्रश्न, 33 टक्के विजेच्या संदर्भातील माफीचा प्रश्न सर्व अंतर्भूत आहे. आज आपण पाहत आहोत की, शासनाने दुष्काळाच्या संदर्भात कोणताही निर्णय घेतलेला नाही. शासन काय करीत आहे ते सांगितलेले नाही. सावकारांच्या संदर्भातील निर्णय घेतला आहे.

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी नाकर्ते असे शब्द वापरले, ते योग्य नाही. मी राजकीय भाषण केले तर अंगावर कपडे ठेवणार नाही. मी राजकीय दृष्टीने दुष्काळाकडे पाहिले नाही किंवा भाषण केले नाही. भाषण जसे तुम्हाला येते तसे मलाही येते. सभागृह सुरू झाले पण साधा विरोधी पक्षनेते पदाचा प्रश्न आपण सोडवू शकला नाहीत. राज्याचे प्रश्न काय सोडविणार आहात ?

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ....

सभापती महोदय, मी परत एकदा सभागृहाचा वेळ घेतो. मी या ठिकाणी 7707 कोटी रूपयांचे पॅकेज वाचून दाखविले. केंद्र शासनाच्या निकषांवर रोख मदत द्यायची आहे, त्यासाठी 76 लाख लाभार्थी आहेत, त्यांना 3925 कोटी रुपयांचा लाभ देणार आहोत. फळबागांच्या पुनरूज्जीवनासाठी अडीच लाख शेतकरी आहेत, त्यांना 752 कोटी रुपये अधिंक 132 कोटी रुपये देणार आहोत. (गोंधळ) नॅशनल हॉर्टिकल्चर मिशनकडून 1 लाख शेतकऱ्यांना 45 कोटी रुपयांची मदत करणार आहोत. आम्ही त्याची तरतूद केली आहे. वैरण विकास योजनेसाठी 50 लाख, वीज बिलाची माफीच्या संदर्भात 215 कोटी रुपये अशी तरतूद आहे, हे फक्त तीन महिन्यांसाठी आहे. पीक कर्जाच्या पुनर्गठनावरच्या व्याजाची माफी 480 कोटी रुपये आहे आणि त्याचा 14 लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. पीक कर्ज पुनर्गठनासाठी 15 टक्के व्याज या संदर्भात 435 कोटी रुपये असून त्याचा 10 लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. सावकारी कर्जाची माफी या संदर्भात 373 कोटी रुपये असून त्याचा 5 लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तात्पुरत्या स्वरुपाच्या पाणीपुरवठा योजनांसाठी 425 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत. अपूर्ण विहिरी पूर्ण करणे याचा धडक कार्यक्रम, नरेगाचा धडक कार्यक्रम आहे. दीर्घकालीन उपाययोजनांसाठी आयडब्ल्यूएमपी अंतर्गत 50 लाख हेक्टरवर जलसंधारणाची कामे उपलब्ध करुन 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अपेक्षित तरतूद 4 हजार कोटी रुपयांची आहे, ती करायची आहे. एकंदर 50 लाख शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. 50 हजार सिमेंटचे नाला बांध बांधायचे आहेत, त्यासाठी 250 कोटी रुपयांची तात्पुरती तरतूद आहे. कायमस्वरुपी योजना 5 वर्षांसाठी असून 5 लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. 2.50 लक्ष शेततळ्यांचे बांधकाम करायचे आहे, त्यासाठी 1500 कोटी रुपयांची तरतूद आहे. 5 लाख सौर ऊर्जा पंप द्यायचे आहेत. 10 लाख हेक्टरवर सूक्ष्म सिंचन कार्यक्रम करावयाचा आहे. सामुदायिक शेततळी यासाठी 100 कोटी रुपये आहेत. आरकेव्हीवायमधून 50 कोटी उपलब्ध होणार आहेत. कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी 32,600 कोटी रुपयांचा दीर्घकालीन कार्यक्रम आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ....

(गोंधळ) विरोधी पक्षाचे सदस्य म्हणतील ते करायला आम्ही तयार अहोत. पण राज्य सरकारवर 3 लाख 25 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. सरकार कर्जाखाली दबलेले आहे. 26 हजार कोटी रुपये महसुली तूट आहे. तत्कालीन सरकारने राज्य गहाण ठेवले आहे. राज्याच्या तिजोरीत उंदीर पळत आहेत आणि अशा स्थितीत आम्ही एवढा पैसा उपलब्ध करून दिला आहे. मी केंद्र शासनाचे आभार मानेन की, त्यांनी मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे आम्हाला एवढा पैसा आला. हे कोणाचे पाप आहे ? सव्वा तीन लाख हजार कोटी रुपयांचे कर्ज तुम्ही कधी पाहिले आहे का ? 26 हजार कोटी रुपयांची महसूली तूट आहे. महिन्याभरात हे सर्व आम्ही केले. आम्ही तुमचे पाप फेडत आहोत. हे तुमचे आहे. मी मघाशी सांगितले की, मी राजकारण करीत नव्हतो. तुम्ही बोलायला लागलात म्हणून मी बोललो. मी तर 5 वर्षे विरोधी पक्षातच भाषणे करीत होतो. आपण परिस्थिती सुधारावी. तुम्हाला आम्ही मदत करू मदत जास्त देत आहोत ते मान्य करा. विरोधी पक्षनेते निवडण्यास एवढा वेळ लावणे योग्य नाही. बहुमताचा तुम्ही अवमान करीत आहात. बहुमताचे सरकार इकडे आले, तसे बहुमताने तिकडे झाले पाहिजे. तुम्ही तुमचे दोघांचे प्रश्न सोडवा आणि मग आम्हाला सल्ला द्या. मी तुमच्याकडून सल्ला घेण्यास तयार आहे. पहिल्यांदा आपसातील भानगडी मिटवा.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सुरुवातीला ज्यावेळी माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब सभागृहात मंत्री म्हणून आले, त्यावेळी आम्ही त्यांना पाहिले. तसेच त्यांना विरोधी पक्षनेते म्हणून सुध्दा पाहिलेले आहे. आम्ही त्यांची बॉडी लँग्वेज, बोलण्याची पध्दत पाहत होतो. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब सभागृहात आल्यानंतर भाषणाला उभे राहिले, नंतर संपूर्ण भाषण होईपर्यंत आम्ही त्यांना पाहिले, त्यांच्या बॉडी लँग्वेजवरून आम्हाला समजले की, ते शेतकऱ्यांना कोणतेही पॅकेज देऊ शकणार नाहीत. आज त्यांनी 7 हजार कोटी रुपये, 10 हजार कोटी रुपये, 25 लाख कोटी रुपये असा उल्लेख केला.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.........

केंद्र सरकारच्या वेगवेगळ्या योजना कशा पध्दतीने मिळणार आहेत, हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु, त्या पूर्वी पासून मिळत होत्या. राज्य सरकारने दुष्काळग्रस्त परिस्थितीमध्ये कोणत्या योजना आहेत, त्याचे किती पैसे होतात, हे सर्व जोडून अशा प्रकारची मांडणी आपल्यासमोर केलेली आहे. सरकारने शेतकऱ्यांना काहीही दिलेले नाही. आमची एकच मागणी आहे, फार काही आम्हाला चर्चा करावयाची नाही आणि बोलावयाचेही नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी किती मदत जाहीर करणार आहात, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी किती मदतीचे पॅकेज दिले आहे, धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी किती आर्थिक मदत करणार आहात, दूध उत्पादक शेतकऱ्यांना किती रुपयांचा फरक देत आहात, कांदा आणि मका उत्पादक शेतकऱ्यांना किती मदत देत आहात, हे मंत्री महोदयांनी सांगावे. त्याऐवजी नदी जोड प्रकल्प 50 वर्षानंतर करणार आहोत, त्यासाठी एवढे हजार कोटी रुपये लागणार आहेत, 5 लाख सौर पंप देणार आहे, 5 लाख पंप एका वर्षात देणार आहोत, असे मंत्री महोदय सांगत आहेत. शेतकऱ्यांना या सरकारने एक रुपयाचेही पॅकेज दिलेले नाही, हेक्टरी एक रुपयाचीही मदत या सरकारने केलेली नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्याला काहीही दिलेले नाही. धान उत्पादक शेतकऱ्याला दिलेले नाही आणि आज आपण पहातो आहोत की, सोयाबीन उत्पादक शेतकरी मरत असताना, आत्महत्या करीत असताना सरकार म्हणत आहे की, आत्महत्या थांबविणे हे आमच्या हातात नाही, आम्ही हे करु शकणार नाही, शेतकऱ्यांना मदत देऊ शकणार नाही. अशा प्रकारचा विचार करुन हे सरकार वागावयास लागले आहे. सरकारने काहीही मदत केलेली नाही. सातत्याने आम्ही अनेक समस्या या सरकारपुढे मांडल्या आहेत. कशा प्रकारे शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत, हे एकदा पहावे. यावेळी आत्महत्या करण्याचा प्रकार काय होता, हे एकदा पहावे. एका शेतकऱ्याने डी.पी.ला कवटाळून आत्महत्या केली तर एका शेतकऱ्याने विजेची तार गुंडाळून आणि एका शेतकऱ्याने तर चिता पेटवून त्यात उडी मारुन आमहत्या केली आहे. अशा प्रकारे रोज 10-15 शेतकरी आत्महत्या करीत असताना संपूर्ण राज्यातील शेतकरी या सरकारकडे नजर लावून बसले होते. आमच्यासाठी हे सरकार काही तरी मदत जाहीर करील,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.........

असे त्यांना वाटत होते. परंतु, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी लोकांना, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. लोकांकडून मते मागून हे सरकार सतारुढ झाले आहे. नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर येत असताना यवतमाळच्या एका सभेत असे सांगितले होते की, 50 टक्के शेतकऱ्यांना लाभ मिळाला पाहिजे. आज शेतकऱ्यांना....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी एक-दोन प्रश्न विचारावेत.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना भाषणाची संधी मिळालेली आहे. त्यावेळी त्यांनी हे सर्व मुद्दे मांडावयास हवे होते. आता मागावून यांना शहाणपण का सुचले ? त्याऐवजी त्यांनी प्रश्न विचारावेत, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास आम्ही तयार आहोत. माझे हे वारंवार उत्तर राहणार आहे की, तुम्ही म्हणता आहात ते सर्व देण्याची आमची तयारी आहे पण आपण भ्रष्टाचारात सर्व बुडवून ठेवले आहे. आम्हाला काय ठेवले आहे ? काय आहे आमच्या जवळ ? संपूर्ण महाराष्ट्र आपण गहाण ठेवला आहे. कर्ज काढून गहाण ठेवला आहे. कोणालाही काही देण्यासाठी पैसाच नाही. कसे तरी आम्ही 7700 कोटी रुपयांचे पॅकेज देत आहोत. तुम्ही ठेवले असते तर आम्ही दिले असते. सगळे बुडाले आहे. आपण 15 वर्षात महाराष्ट्राचा सत्यानाश केलेला आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी संधी देत आहे. त्यांनी केवळ दोन-चार प्रश्न विचारावेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी मागणी केली की, शेतकऱ्याला हेक्टरी मदत जाहीर करावी. शासन हेक्टरी मदत किती देणार आहे ?

**तालिका सभापती** : प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्याला संक्षिप्त निवेदन करण्याचा अधिकार असतो. आता आपण आपले संक्षिप्त निवेदन संपवावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, हा प्रस्ताव दोन्ही पक्षाच्या वतीने सभागृहात मांडला गेला आहे. राईट टू रिप्लायची संधी जशी सन्माननीय सदस्य





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...........

श्री.माणिकराव ठाकरे यांना आपण दिली आहे त्याप्रमाणेच आम्हाला सुध्दा दोन मिनिटे बोलण्याची संधी आपण द्यावी.

**तालिका सभापती** : आपल्यालाही एक-दोन प्रश्न विचारण्याची संधी नक्की मिळेल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या सभागृहात अद्याप विरोधी पक्षनेत्याची निवड झालेली नाही. विरोधी पक्षनेत्यांना राईट टू रिप्लायचा अधिकार असतो. तरी सुध्दा आपण त्यांना संधी दिली. राईट टू रिप्लायमध्ये केवळ प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. भाषण देण्याचा अधिकार नसतो. राईट टू रिप्लायच्या नावाखाली आम्हाला आपण 15 मिनिटे भाषण ऐकत आहात, हे बरोबर नाही. त्यामुळे आपण त्यांचे भाषणे थांबवा आणि एक-दोन प्रश्न विचारण्याची संधी त्यांना द्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा आणि संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी या चर्चेकडे आणि शासनाच्या उत्तराकडे डोळे लावून बसला आहे. परंतु, मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात कोठेही कापूस उत्पादक, धान उत्पादक, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना, कोणत्याही कृषी मालाला हेक्टरी पॅकेज दिलेले नाही, याचा मी निषेध करतो. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचे बोलणे झाल्यानंतर आम्ही शासनाचा निषेध म्हणून सभागृहातून बर्हिगमन करणार आहोत. सभागृहातील पुढील कामकाज करणे आम्हाला मान्य नाही. त्यामुळे आम्ही कामकाजावर देखील बहिष्कार घालणार आहोत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्याचे माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी दुष्काळासारख्या अतिशय गंभीर समस्येच्या संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेला जे उत्तर दिले आहे, त्यामुळे केवळ विरोधकांचाच नव्हे तर महाराष्ट्रातील 12 कोटी जनतेचा अपमान झ ाला आहे. या सरकारकडून हेच अपेक्षित होते.

यानंतर श्री.मा.शिगम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील वेलमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

माननीय मंत्री महोदयांनी केवळ राजकीयदृष्टया प्रेरित होऊन राज्यावर किती कर्ज आहे यासंबंधीचे वक्तव्य केले. जे साडेसहा हजार कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले त्यातील 90 टक्के योजनांचा नियतव्यव हा आधीच निश्चित झालेला आहे. यामध्ये नवीन काही नाही. खाजगी सावकाराचे कर्ज सोडून अशी एखादी योजना मंत्री महोदयांनी दाखवावी की ती मूळ योजनेमध्ये नाही.

श्री. एकनाथराव खडसे : जनावरांच्या चाऱ्याची तरतूद पुरवणी मागण्यामध्ये केलेली आहे. 3-3 महिन्याची तरतूद आम्ही केलेली आहे. जनावरांच्या चाऱ्याची चिंता अजिबात करु नका. जनावरांना सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी माझी आहे. घोषणा केल्यानंतर तरतूद पुढच्या बजेटमध्ये येते.

श्री. सुनील तटकरे : दुष्काळग्रस्त शेतक-याला वेगळे पॅकेज जाहीर करण्याची भूमिका सरकार घेईल अशी अपेक्षा होती. राज्य सरकारकडे पैसे नाहीत असे खोटे सांगून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणाऱ्या सरकारचा आम्ही निषेध करतो. दुष्काळी परिस्थितीमध्ये सरकार विविध उपाय योजना करील अशी आमची अपेक्षा होती. कापसाच्या संदर्भात, धान उत्पादक शेतकऱ्याच्या संदर्भात, दुधाच्या संदर्भात, सोयाबीनच्या संदर्भात सरकारने काहीही सांगितलेले नाही. ज्या उपाययोजना मंत्री महोदयांनी सांगितलेल्या आहेत त्या उपाययोजना आधीच्या सरकारने केलेल्या आहेत. यापेक्षा आम्हाला दुसरे काही एक ऐकायचे नाही. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला हे सरकार 5 लाख रुपये मदत जाहीर करील अशी आमची अपेक्षा होती. आत्महत्या केलेल्या शेतक-यांना दिलासा देणारे एकही वाक्य मंत्री महोदयांच्या सव्वा तासाच्या भाषणात आलेले नाही. राज्यातील शेतक-यांच्या संदर्भात शासनाने जी भूमिका घेतलेली आहे त्याबाबत आम्ही तीव्र निषेध व्यक्त करतो. सरकारने दुष्काळी परिस्थितीशी सामना करण्याच्या बाबतीत पळपुटेपणा दाखविलेला आहे. तिजोरीची स्थिती आजची नाही. देशातील सर्व राज्याच्या तिजोरीची हीच स्थिती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येता कामा नये. हे 15 वर्षाचे पाप नाही काय ? 15 वर्षात किती लोक वर गेले ? तुमचे हे पाप मी महिनाभरात कसे फेडू ? 15 वर्षे तुमच्या हाती सत्ता होती. 15 वर्षामध्ये तुम्ही खाऊन फस्त केले, महाराष्ट्र लुटला. महाराष्ट्राच्या तिजोरीवर दरोडे घातले. जनावरांना चारा ठेवला नाही. जनावरांचा चारा खाल्ला, शेणही खाले आणि दरोडेही घातले. तिजोरीत पैसा शिल्लक ठेवला नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करून आपल्या जागेवर बसावे.प्रस्तावावरील चर्चा संपलेली आहे.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुढील 25 वर्षासाठी मराठी भाषा विषयक धोरणासंबंधी नियम 289 अन्वये प्रस्तावाची दिलेली सूचना**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : आज दिनांक 11 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 9.00 वाजता सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री आनंद ठाकूर, प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, रामराजे निंबाळकर, प्रभाकर घार्गे, ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी "पुढील 25 वर्षासाठी मराठी भाषा विषयक धोरण" या अनुषंगाने म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे.

या सूचनेच्या संदर्भात आजच्या कामकाज पत्रिकेत कोणताही विषय नसल्याने सभागृहाचे कामकाज स्थगित करुन या विषयावर चर्चा घेण्याची बाब ही तांत्रिकदृष्टया अमान्य ठरते.

तरी महाराष्ट्र राज्य व तिची राज्यभाषा हिचे संरक्षण व संवर्धन करणे व सर्व व्यवहार मराठी भाषेत व्हावेत ही सर्वांचीच इच्छा आहे. त्या दृष्टीने हा विषय सार्वजनिक महत्वाचा ठरतो. त्यामुळे या विषयाला न्याय देण्यासाठी मी नियम 97 अन्वये अल्पकालीन सूचनेला दीड तास वेळ देत आहे. ही चर्चा केव्हा घ्यावी हे मी नंतर ठरवीन.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होईल.

(दुपारी 3.57 ते 4.27 पर्यंत मध्यंतर)

---

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य माननीय सभापतीच्या आसनासमोर येऊन घोषणा देत असतात)

**पृ.शी.**: संकेतस्थळ चलित टॅक्सी सेवा बंद करणे

**मु.शी.**: संकेतस्थळ चलित टॅक्सी सेवा बंद करण्यासंबंधी परिवहन मंत्र्यांचे निवेदन

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

दिल्ली येथे उबर कंपनीमार्फत चालविण्यात येणाऱ्या संकेतस्थळ चलित (वेब बेस्ड) टॅक्सीमध्ये नुकत्याच घडलेल्या दुर्घटनेच्या प्रकरणावरुन सदर कंपनीच्या टॅक्सी सेवेवर दिल्ली शासनाने बंदी घातलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर, केंद्र शासनाने सर्व राज्यांना राज्य शासनाचे परवाने नसलेल्या संकेतस्थळ चलित टॅक्सी कंपन्यांनी राज्य शासनाकडे नोंदणी करेपर्यंत, त्यांची टॅक्सी सेवा बंद करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या संदर्भात राज्यातील सर्व प्रकारचे फ्लीट टॅक्सी आणि संकेतस्थळ चलित टॅक्सी कंपन्यांची परिवहन आयुक्त यांनी दिनांक 10.12.2014 रोजी बैठक घेऊन, राज्यातील प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत आणि त्यांच्यामार्फत कार्यरत असलेल्या सर्व चालकांची माहिती तत्काळ देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे प्रवासी सुरक्षिततेबाबत काटेकोर कारवाईचा आराखडा दिनांक 31.12.2014 पर्यंत सादर करण्याचे सर्व कंपन्यांना सूचित केले आहे.

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य माननीय सभापतीच्या आसनासमोर येऊन घोषणा देत असतात)

-------

नंतर 2 जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर व संमत करणे

श्री. अपूर्व हिरे (समिती सदस्य) : शुक्रवार, दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता बुधवार, दिनांक 10 डिसेंबर, 2014 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे.

तीन अशासकीय विधेयके पुन:स्थापनार्थ दर्शविण्यात येणार असून बॅलटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार तीन अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

**<u>पुर:स्थापनार्थ</u>**

| | | |
|---|---|---|
| 1. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 11 - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2014 श्री. अमरसिंह पंडित वि.प.स. | 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 2. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 12 - महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, 2014 श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. | 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 13 - बियाणे (सुधारणा विधेयक, 2014 श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. | 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही |

**<u>बॅलटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>**

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 91 | 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 2. | श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 44 | 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 3. | श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 2 | 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही |

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा, अशीही शिफारस समितीने केली आहे.

1A.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री. अपूर्व हिरे (समिती प्रमुख) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात )

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्री. भाई जगताप (समिती सदस्य) : मी आपल्या अनुमतीने आश्वासन समितीचा एकशे पंच्याऐंशी व एकशे शहाऐंशीवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहास सादर झाला आहे. अहवालाच्या चक्रमुद्रित प्रती सभागृहाच्या पटलावर ठेवल्या आहेत. मुद्रित प्रती उपलब्ध झाल्यानंतर त्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

**------**

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : महोदय, राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे, आत्महत्यांचे प्रमाण दिवसागणिक वाढतच आहे. यासंदर्भात आमची सर्वांची अपेक्षा होती की, सभागृहात या विषयावर चर्चा होऊन चांगल्या प्रकारचे पॅकेज दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिले जाईल. तशा प्रकारच्या भावना देखील आम्ही सभागृहात चर्चेच्या माध्यमातून व्यक्त केल्या. ज्याप्रमाणे संविधानिक मार्गाने आणि संसदीय आयुधांचा वापर करता कामकाजात सहभागी होण्याचा आणि आमची भूमिका मांडण्याचा आम्हाला नक्कीच अधिकार आहे तशा आम्ही व्यक्तही केल्या आहेत. आपल्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे, पण मंत्री महोदयांचे उत्तर संपल्यानंतर आम्हाला काय म्हणावयाचे हे ऐकून घेण्याची तसदी आपण घेतली नाही. याचा अर्थ असा नव्हे की आमचा आवाज अशा प्रकारे शासन बंद करु शकेल ? कदाचित आमचा आवाज येथे बंद करु शकाल पण शासनाच्या नावाने टाहो फोडणाऱ्या दुष्काळी भागातील लाखो जनतेचा आवाज मात्र आपण बंद करु शकणार नाही. अशाच प्रकारे आवाज बंद करुन सभागृहाचे कामकाज चालवावयाचे असेल तर शासनाच्या या प्रवृत्तीचा आम्ही तीव्र निषेध व्यक्त करतो आणि यापुढील कामकाजात भाग न घेता मुकपणे वेलमध्ये बसून राहतो.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसतात )

**तालिका सभापती** : राईट ऑफ रिप्लायच्या वेळेस सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आपल्याला संधी दिली होती, त्यामुळे आपण अशी भूमिका घेणे योग्य नाही.

........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



PFK/ प्रथम श्री. भोगले....... 16:30

**पृ.शी.**: संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**:संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयकाला अनुसमर्थन देण्याची विनंती करणारा महासचिव, राज्यसभा यांच्याकडून आलेला संदेश पटलावर ठेवणे

अतिरिक्त सचिव : मी महाराष्ट्र विधान परिषद नियम 155 (1) अनुसार आपल्या अनुमतीने महासचिव, राज्यसभा यांचेकडून प्राप्त झालेला संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयक, 2014 यांसह संविधानाच्या सुधारणेस अनुसमर्थन देण्याची विनंती करणारा संदेश विधेयकाच्या प्रतीसहित सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयक, 2014 यांसह संविधानाच्या सुधारणेस अनुसमर्थन देण्याची विनंती करणारा संदेश विधेयकाच्या प्रतीसहित सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. विधेयकासह संदेशाच्या प्रती सर्व सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात आल्या आहेत.

------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना राईट ऑफ रिप्लाय वर बोलण्याची संधी मिळाली नाही अशी त्यांची भावना झाली आहे. माझी अशी विनंती आहे, सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करावी आणि आपल्या दालनात याबाबत त्यांना चर्चेसाठी बोलावून घ्यावे. तसेच सन्माननीय सदस्यांना त्यांच्या आसनावर जाऊन बसण्याची विनंती आपण करावी.

**तालिका सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 37 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली )

केके-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य पीठासीन अधिकाऱ्याच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देतात.)

**तालिका सभापती** : सभागृहातील गोंधळाच्या परिस्थितीत कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 12 डिसेंबर 2014 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4 वाजून 48 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 12 डिसेंबर 2014 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

......................................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही